# माणूस

शनिवार । १२ फेब्रुवारी १९७७ । साठ पैसे

जगजीवनरामांनी राजीनामा दिला
आणि
दिल्लीतील राजकीय हालचालींना
भलताच रंग चढला.
या हालचाली टिपण्यासाठी

**माणूस प्रतिनिधी**

**दिल्लीदाखल आहे.**

पुढील अंकापासून प्रसिद्ध होत आहेत
दिल्लीची खास वार्तापत्रे.
यामुळे पृष्ठसंख्येत थोडी वाढ करावी
लागत आहे. त्यामुळे थोडी किंमतवाढही.
पुढील अंकाची किंमत पंचाहत्तर पैसे.
पृष्ठसंख्या सुमारे ३६ ते ४०
विक्रेत्यांनी। वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.
( पुढील अंकासोबत एक खास ठाणे पुरवणी )

**साप्ताहिक माणूस**

वर्ष सोळावे – अंक सदतिसावा

१२ फेब्रुवारी १९७७

मूल्य साठ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९

# मा. यशवंतराव चव्हाण यांची जागा मोकळी सोडावी

जगजीवनराम यांचा घाव तर अगदी मर्माबर पडलेला दिसतो. किरकोळ मेळाव्यांसमोर पंतप्रधानांना खुलासे करीत राहण्याची पाळी आली. नभोवाणीवरून जगजीवनरामांच्या कृत्याचे, चिल्लर पुढाऱ्यांकडून केले गेलेले निषेध सतत ऐकवले जावेत, इतकी पाळी एरव्ही राज्यकर्त्यांवर येतीना निवडणुका जाहीर केल्यानंतर पंतप्रधानांना बसलेला हा दुसरा मोठा धक्का म्हणावा लागेल. सर्व विरोधी पक्ष इतक्या त्वरेने आणि मजबुतीने एक होऊन निवडणुकीचे आव्हान स्वीकारतील अशी बाईंची कल्पना नव्हती. पण तुरुंगातून सुटून आल्यावर पंधरवडा उलटायच्या आतच हा चमत्कार घडून आला. बाईंना बसलेला हा पहिला धक्का होता.

पाठोपाठ जगजीवनरामांचा राजीनामा हा दुसरा धक्का. याचे निवडणुकीवर काय परिणाम होतील, किती जागा काँग्रेसला यामुळे गमवाव्या लागतील, याचे अंदाज आताच बांधणे कठीण आहे. कारण सत्तेची आणि पैशाची दडपणे अगदीच दुर्लक्षून चालणार नाहीत. पण बाईंचा वचक या एका राजीनाम्यामुळे एकदम कमी झाला; युवक काँग्रेसच्या तथाकथित नेत्यांची मस्ती जिरली; बाईंच्या एकमुखी सत्तेला तडा गेला; त्यांच्याबद्दल वाटणारी भीती कमी झाली; देशातील दहशतीचे वातावरण थोडेफार निवळले यात काही संशय नाही.

बाईंना आता पक्षातील जुन्या व निष्ठावंत सहकाऱ्यांवर अधिक अवलंबून राहावे लागणार हे उघड आहे. हे जर झाले नाही तर सत्ता हळूहळू विशिष्ट टोळक्याकडे आपोआप जात राहील आणि बाईंनाच हे टोळके, हा भस्मासुर डोईजड झाल्याशिवाय राहणार नाही

बाई जर लोकशाहीवादी असतील तर पहिला पर्याय पसंत करतील. म्हणजे ओघानेच यशवंतराव चव्हाण वगैरे ज्येष्ठ व निष्ठावंत सहकाऱ्यांचे अवमूल्यन थांबेल आणि त्यांचा सल्ला अधिकाधिक घेतला जाईल, मानला जाईल. घेतलेले निर्णय त्यांना फक्त ऐकवण्याची गेल्या दीडदोन वर्षातली प्रक्रिया बंद पडेल.

या मंडळींचे हे स्थान अधिक बळकट कसे होईल, हे नव्या जनता पक्षानेही पाहिले पाहिजे. कारण यामुळे लोकशाहीची परंपरा खंडित न होता सत्तांतराकडे जाता येईल व जनता पक्ष हा खरोखरच लोकशाही मूल्यांची बूज राखणारा पक्ष आहे, ही प्रतिमा जनमानसावर कोरली जाईल.

यासाठी अशा निवडक व्यक्तींच्या जागा मोकळ्या ठेवण्याचा निर्णय जनता पक्षाने घेणे सर्वतोपरी उचित ठरेल. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांच्याविरुद्ध उमेदवार उभा करण्याचा अट्टाहास जनता पक्षाने कशासाठी धरावा?

महाराष्ट्राचे सर्वमान्य नेते म्हणून यशवंतरावांचे असलेले स्थान वादातीत आहे. सर्व थरात, सर्व पक्षोपपक्षात त्यांच्याविषयी आपुलकी व आदरभाव आहे. जनताही त्यांना फार मानते. त्यांच्या लोकशाही–समाजवादी प्रवृत्तीबद्दलही संशयाला जागा नाही. कशासाठी अशा जनतामान्य व्यक्तीला विरोध करायचा? कुठल्याही पक्षातल्या असोत, अशा निवडक व्यक्तींचा अपवाद केला जावा, विशेष सन्मानपूर्वक त्यांना निवडले जावे. यामुळे कर्तृत्वाची, सेवेची बूज राखण्याचे समाजालाही शिक्षण मिळेल आणि राजकीय जीवनाची एकूण उंची वाढण्यासही असे निवडक अपवाद कारणीभूत ठरू शकतील.

श्री. ग. मा.

# इथे मिसाचिये नगरी

## □ बलसागर भारत होवो !

बने ! गेल्या अठरा महिन्यांत भारत अधिक बलवान झाला हे तुला कळले का? नाही ना ? तू पुण्यात राहतेस त्याचा हा परिणाम बरं. जगात सगळ्यांना पटतं ते पुण्यातल्या लोकांना शेवटी उमगतं. बने, भारत बलवान झाला असे आपल्या महामंत्री इंदिराजी यांनी राजधानीत सांगितले. उगाच माना वेळावू नकोस. त्या म्हणाल्या, ही गोष्ट विरोधी पक्ष आणि परदेशांनीही मान्य केली आहे. ज्याअर्थी इंदिराजी म्हणतात, आकाशवाणी म्हणते, दूरचित्रवाणी म्हणते, संजय म्हणतो, त्याअर्थी हे खरे असले पाहिजे हे नीट लक्षात घे.

लहानपणी तू, बने, सेवादलात जायचीस, तेव्हा मोठमोठ्याने काय म्हणायचीस–'बलसागर भारत होवो ! विश्वात शोभुनी राहो !!' सानेगुरुजींचे हे गाणे भारत बलवान नव्हता. तेव्हादेखील तू म्हणायचीस आणि आता तू अशी गप्प का ? आणि तो परकर नीट वर घे आणि शेंबूड पुसून टाक. बलवान भारताची नागरिक ना तू ! तू आता मुळीच रडू नकोस. तुझे वडील अजून तुरुंगात आहेत, मावशी अजून तुरुंगातच आहे. सरकार लायकअल्लीच्या बायकोला देते तसा तनखा तुम्हाला देत नाही. म्हणून तू दुःखी होऊ नकोस. देश बलवान झाला कारण इथले तुरुंग बलवान आहेत. लाखो लोक तुरुंगात पडले–हजारो तुरुंगात आहेत. देश बलवान व्हायचा तर तुरुंग बलवान लागतात हे लक्षात घे.

बने, देशात बलवान झालेल्या काही गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय तुझी खात्री पटणार नाही. तेव्हा माझ्याबरोबर चल. देशातील बलस्थाने आपण पाहू.

आणि नीट चल. छाती पुढे काढून चाल. छाती नसताना पुढे काढण्यातच कौशल्य असते. चपलांचा फटकफटक आवाज करू नकोस. नाहीतर आपण आल्याची चाहूल लागून बलवान लोक दचकतील.

बने–बने, ही पहा आपली महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटी. आणीबाणीमुळे ही फार बलवान झाली. मुंबईची काँग्रेस कमिटी या कमिटीत विलीन झाल्याने ही बलवान झाली हो ! कचेरीत बसलेले ते गृहस्थ युवक काँग्रेसचे पदाधिकारी आहेत, त्यांचे चेहरे तिकिटे न मिळाल्याने पडलेले असले तरी ते सर्व बलवान आहेत हे विसरू नको. इथे आपण फार थांबायचे नाही. नाही तर इथे जमणाऱ्या बलवान कार्यकर्त्यांपैकी आपण आहोत असे ते धरून चालतील आणि सक्तीने बैठकीला बसवतील, तेव्हा पळ. पाय लवकर उचल.

हे समोरून येणारे पुण्याचे पोलीस पाहा. गेल्या अठरा महिन्यांत हे सर्वात बलवान झाले. पुण्यात खून पडले तर त्याचे गुन्हेगार शोधण्याचे क्षुल्लक काम आता त्यांना जमत नाही–पण वीस वीस वर्षांपूर्वी संघात कोण जात होता याची ते माहिती जमवतात. या भयंकर देशद्रोही लोकांना मिसाखाली पकडतात. वेळी अवेळी घरी जाऊन आसपासच्या लोकांना ही किती भयंकर माणसे आहेत हे समजण्यास फार मदत करतात. पाहा कसे बिल्ल्या-बटनांना पॉलिश करून सपासप चालले आहेत. बने, हे कुणाचेही राज्य आले तरी नेहमी बलवानच होतात हो ! कारण ते आहेत नोकर. अंगावर सोडण्याची खोटी, की नागरिकांना सळो की पळो करून सोडतात.

बने, या प्रसंगी जोशी-अभ्यंकर विषय काढू नकोस. देश बलवान झाल्यावर खुनी बलवान झाल्याशिवाय राहतील का ? ते बलवान झाल्यामुळेच अजून सापडत नाहीत हे लक्षात घे.

बने, हे पाहा सरकारी कार्यालय. तो बघ बलवान झालेला सरकारी अधिकारी तावातावाने बोलत आहे. त्याच्यासमोर लटपटत उभे असलेले ते सर्व सरकारी कामासाठी आलेले नागरिक वा कंत्राटदार आहेत. या सर्वांना सक्तीची बचत करण्यासाठी हा अधिकारी वाटेल ते करील. कारण तो आता बलवान आहे.

बने, तो बघ शाळामास्तर. कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी माणसे जमा केली नाहीत तर त्याची पगारवाढ थांबणार आहे. तो पोलिसांची जीप घेऊन माणसे गोळा करायला निघाला आहे. जी मिळतील ती बायामाणसे तो जवळच्या खेड्यातून खेचून आणणारच. कारण आता हा शाळामास्तरही बलवान झाला आहे.

जगजीवनराम हे तुरुंगाला घाबरून इतके दिवस पंतप्रधानांच्या मागे उभे होते. त्यामुळे अर्थात राज्य बलवानच होते, कारण जगजीवनराम ही साधी असामी नाही. दलितांचे ते पुढारी आहेत. सत्तेवर जास्तीत जास्त राहाण्याचा जागतिक विक्रम त्यांनी केलेला आहे. १९४७ पासून ते मंत्री आहेत. परंतु परवा त्यांनी काँग्रेस सोडली आणि देशात सर्वत्र एकच आवाज येऊ लागला–

'यापुढे सत्ताधारी काँग्रेस अधिक बलवान झाली !'

तेव्हा बने, गल्लीपासून दिल्लीपर्यंतचे हे बलवान भारताचे चित्र डोळ्यापुढे आण आणि पुनः एकदा ते सानेगुरुजींचे गाणे म्हण–

बलसागर भारत होवो।
दिल्लीत शोभुनी राहो ॥

*

## □ संशयकल्लोळ 'अंक सहावा'!

स्थळ : फाल्गुनरावाचे घर

वेळ :– कृत्तिका घर सोडून गेल्याच्या दुसऱ्या दिवसाची सकाळ.

(काही पत्रकार प्रवेश करतात.)

एक पत्रकार : हृदयी धरा हा बोध खरा।
'इलेक्शनी' शांतिचा झरा ॥
संशय खरा झोटिंग महा।
देऊ नका त्या ठाव जरा ॥
निशाचरी कल्पना खुळी।
कवटाळिल ही भीती धरा ॥
बहुरूपा ती जनवाणी।
खरी मानता घात पुरा ॥

फाल्गुनराव : (पडद्यात) जा येथून. चालते व्हा.

पत्रकार : अहो, असे उगीच अंगावर का येता ? बाईसाहेब तुम्हाला सोडून गेल्याचे कळले, म्हणून मुलाखत मागायला आलो.

फाल्गुनराव : ( पडद्यात ) नुसते ढोंगी तिला काय महत्त्व देता ?

पत्रकार : तुम्हाला मुलाखत द्यायची नसेल तर देऊ नका, पण उगीच संशय का घेता ? ही संशयाची वृत्ती मुलाखतींच्या आड येऊन अंतराय करते. नका सांगू काही. आम्ही जातो.

फाल्गुनराव : ( बाहेर येऊन ) असंच होणार हे मी जाणून होतो. चंगी, भंगी, छत्तीसरंगी अशा लोकांचा सुळसुळाट अलीकडे तर अनावर झाला आहे. रामदास, हरदास, पुराणिक, समाजवादी, वेदांती, भालोदी, कुणी नुसतेच जनसंघी ब्रह्मचारी ! एकापेक्षा एक विलंदर !

पत्रकार : बाईसाहेबांनी गृहत्याग का केला ? अशा कशा बुवा गेल्या ?

फाल्गुनराव : भादव्या म्हणतो मागल्या दारानं कार्तिकनाथाच्या देवळाकडे जाते सांगून गेली. कार्तिकनाथाचे नुसते निमित्त! ती गेली. त्या टोळभैरवांकडेच ! आजपासून नियम. दोन दरवाजांच्या घरात राहायचं नाही ! अशा सतरा दारं आणि तेहतीस खिडक्यांच्या घरात शंभर डोळे असले तरी पुरणार कसे ?

भादव्या : ( प्रवेश करून ) बाईसाहेबांचा निर्णय दुःखद आहे. मी त्यांचा धिक्कार करतो ! बाईसाहेबांचे आरोप निराधार आणि तत्त्वहीन आहेत. त्यांनी साहेबांच्या पाठीत सुरा खुपसला आहे. साहेबांशिवाय दुसरा पर्याय नाही. फाल्गुनराव झिंदाबाद !

पत्रकार : ( भादव्याकडे दुर्लक्ष करीत ) जाताना काहीच सांगून गेल्या नाहीत बाईसाहेब ?

फाल्गुनराव : तिची भुणभुण एकच असे घराची दारं सताड उघडी ठेवा ! आणि खिडक्यातून वारा येऊ द्या ! काल रात्री पाचच मिनिटे हाच हट्ट धरून होती.

पत्रकार : मागणी अगदी साधी होती. आपली तरी बाईसाहेबांवर इतराजी का ?

फाल्गुनराव : इतराजी झाली असती तर तिने इतके देव्हारे कशाला माजवले असते ? मी भुंग्याप्रमाणे तिच्याभोवती पिंगा घालायला लागलो, असे लक्षात येताच तिने मर्यादेचा बुरखा दिला झुगारून आणि लागली मागण्या करायला हवी तशी ! मीच जर तिला वेळच्यावेळी मिसाची लाथ आणि डी. आय. आर. चा खुराक चालू केला असता तर चांगली कह्यात राहिली असती. पण म्हटलं दलित असली तरी शिकलीसवरलेली आहे. भलतीच खोड असायची नाही. पण वरच्या अंगानं आतलं रूप थोडंच पालटतं —

पत्रकार : माफ करा फाल्गुनराव. बाईसाहेबांना नावं ठेवायला आम्हाला तिळमात्र जागा दिसत नाही. दारं-खिडक्या सतत बंद ठेवल्याने त्या गुदमरल्या असतील. आपण भलतीच खोड कोणती म्हणता ती भगवानाला ठाऊक !

फाल्गुनराव : तिने माझ्या काळजाला घरे पाडली आहेत. माझ्या तोंडाला काजळ फासायचा घाट घातला आहे ! हे विष एकदाचे बाहेर पडले ते छान झाले. लग्न झाल्यावर कितीतरी दिवस इतकी चोख वागली, की, पिंजारलेल्या मोरपंखाच्या डोळ्याप्रमाणे पैरपक्षाच्या डोळ्याला डोळा ठरायचा नाही! पण अलीकडे तो सभ्यपणा, ती मर्यादा, ती लज्जा सारी नाहीशी झाली. इतकं कशाला ? याचवेळी ती मला सोडून का गेली ? असा पाठीत सुरा का खुपसला ?

पत्रकार : खास नियमआहे हा फाल्गुनराव ! मघा नायकिणीच्या गुर्जर कन्येला आपण जवळ केलीत तो मात्र तुमच्या टोपीतला तुरा आणि तुमची बायको गेली की, मात्र पाठीत सुरा कसा काय ? वाटलं जावं— म्हणून गेल्या असतील. त्यात काय आहे ?

फाल्गुनराव : त्यात काय ? तुम्ही पागल आहात. तिला खुणा करणारे सोदे बाहेर जमा झालेले आहेत, त्यांना दर्शन द्यायला ती गेली आहे.

पत्रकार : फाल्गुनराव आपण अन्याय करता आहात बाईसाहेबांवर !

फाल्गुनराव : अरे चोरांनो ! माझी मुलाखत आणि अखेर तिचीच तरफदारी हं ! चालते व्हा सगळे. जाता की घालू कमरेत लाथा —

( पत्रकार धूम पळत सुटतात. ) □

---

# चक्रमचक्री— पहिली गिरकी

दीर्घस्मृती विश्वनाथ

सध्या मोठी धामधूम उडून गेली आहे. एकाएकी निवडणुका घेण्याचे बाईंनी ठरवून फार मोठा धक्का सगळ्यांना दिला. एक वर्षाने लोकसभेची मुदत वाढविण्याचा ठराव २–३ महिन्यांपूर्वीच झाला असताना निवडणुका कशासाठी घेतल्या असतील ?

या प्रश्नाचा विचार करण्यात फारसे हशील नाही. राज्यकर्त्यांच्या कृतीमागील हेतूंचा अंदाज घेणे आणि लाडावलेल्या पोराच्या निरनिराळ्या हट्टांची संगती लावणे, या एकाच कोटीतल्या गोष्टी आहेत. 'मी म्हणेन ते करून दाखवीन,' या हट्टापलीकडे त्यात तथ्य नाही.

पण पुण्याचा 'केसरी' तर म्हणतो की, निवडणुका घेण्याचा निर्णय घेऊन बाईंनी आपली लोकशाहीवरची निष्ठा सिद्ध केली आहे. त्यांना हुकूमशहा म्हणणाऱ्यांचा मुखभंग झाला—म्हणजे थोबाड फुटले—असे अगदी पहिल्या पानावरच्या अग्रलेखात केसरीने म्हटले आहे.

'केसरी 'वरून राजकारण शिकणे आणि गाईडावरून गीतारहस्याचा अभ्यास करणे, या दोन्ही गोष्टी सारख्याच उथळपणाच्या आहेत. 'केसरी 'ची मते आपली मानण्याचे दिवस मराठी माणसाच्या दृष्टीने केव्हाच संपले आहेत— 'केसरी 'ने काँग्रेसचा आश्रय करून मेषावतार धारण केल्यापासून !

म्हणजे, निवडणुका घेतल्याने बाईंची लोकशाहीवरची निष्ठा सिद्ध होत नाही की काय ?

आपले परराष्ट्रमंत्री, पंतप्रधानांचे निकटचे सहकारी आणि महाराष्ट्राचे थोर नेते

यशवंतरावजी यांनी मागेच सांगून टाकले आहे की, निवडणुका म्हणजेच काही लोकशाही नव्हे. तो लोकशाहीचा एक बारकासा आणि कदाचित बिनमहत्त्वाचा–भाग आहे. यशवंतराव मान्यवर विचारवंत आहेत. त्यांचे मत चुकीचे असणारच नाही. मग असा बारकासा भाग बाईंनी अंमलात आणला, एवढ्यावरून त्यांची लोकशाहीवरची निष्ठा प्रकट झाली आहे, हे म्हणणे असमंजसपणाचे आहे.

हुकूमशहा नसणे आणि निवडणुका घेणे, यात काही कार्यकारण भाव आहे, असे नाही. याह्याखानानेसुद्धा पाकिस्तानात निवडणुका घेतल्या होत्या. तेवढ्याने तो काही लोकशाहीनिष्ठेचा पुतळा ठरला नाही. याचा अर्थ बाई हुकूमशहा आहेत, असे नव्हे; त्यांनी निवडणुका घेतल्या, एवढ्याने त्या हुकूमशहा नाहीत, असे ठरत नाही, इतकेच.

मग काय केले म्हणजे बाई आणि त्यांचा पक्ष लोकशाहीनिष्ठ ठरतील ?

लोकशाहीनिष्ठा ही अशी एकट्यादुकट्या प्रसंगात व्यक्त करून भागत नाही–प्रत्येक प्रसंग आणि प्रत्येक क्षण हा तुमच्या लोकशाहीवरील श्रद्धेची परीक्षा करत असतो. विज्ञानाचा सिद्धान्त जसा प्रत्येक प्रयोगात खरा ठरावा लागतो आणि एकाही प्रयोगात तो खोटा ठरला तरी टाकून द्यावा लागतो, तसेच मनुष्याच्या लोकशाहीवरील श्रद्धेचे आहे. मी एका प्रसंगी लोकशाही आचार पाळले, एवढ्याने मी लोकशाहीनिष्ठ ठरत नाही. उलट, एखाद्या निकराच्या वेळी जरी माझी लोकशाहीवरील निष्ठा चळली तरी तेवढ्याने मी कायमचा अपात्र ठरतो. बाईंच्या टाळकऱ्यांना त्यांना लोकशाहीनिष्ठ ठरविण्याची ही जी आच लागली आहे, त्यावरून केव्हा तरी बाई परीक्षेत उतरल्या नव्हत्या, असे बाईंच्या अनुयायांना वाटत असावे, असा संशय येतो.

बाईंची निवडणूक अलाहाबाद हायकोर्टाने रद्द ठरविली तेव्हा बाईंनी सुप्रीम कोर्टात अपील केले आणि दरम्यान आणीबाणी पुकारून विरोधी नेत्यांना कैद केले...

पण हे सर्व कायद्यानेच झाले. आपल्या घटनेतच आणीबाणीची तरतूद आहे ना ?

मला बोलू तर द्या–मी आणीबाणीविषयी काही म्हणत नाही. नंतर हुडहुडी भरलेल्या काँग्रेसपक्षीय खासदारांच्या आणि विरोधी पक्षीयांनी बहिष्कार टाकलेल्या संसदेकडून त्यांनी घटनेत आणि निवडणूक कायद्यात पूर्वकाल–परिणामी दुरुस्त्या करून घेतल्या.

यात तरी काय बिघडले ? संसदेला घटनेत आणि कायद्यात भविष्यकाल परिणामी तसेच पूर्वकाल परिणामी दुरुस्त्या करण्याचा अधिकार आहे की नाही ?

बिघडले असे की, या दुरुस्त्या सार्वजनिक चर्चेनंतर व लोकमत प्रकट झाल्यानंतर केल्या गेल्या नाहीत. सार्वजनिक चर्चेतून निर्णय घेणे, हा लोकशाही राजकारणाचा गाभा आहे. ४२ व्या घटनादुरुस्तीवर सार्वजनिक चर्चा व्हावी, त्यासाठी सभा भरवू द्याव्यात, असे बाईंनी सांगितले होते की नाही ? कायदामंत्री गोखले यांनी ४२ वी घटनादुरुस्ती संसदेपुढे मांडताना यावर पुरेशी चर्चा झाली आहे, असे अभिमानपूर्वक सांगितले आणि संसदेत झालेली चर्चाही वर्तमानपत्रांतून सविस्तर प्रसिद्ध झाली. यापैकी कोणत्या गोष्टी निवडणूक कायद्यातील दुरुस्ती आणि त्याच्याशी संबंधित घटनादुरुस्ती यांच्याविषयी होऊ दिल्या गेल्या ? जर ४२ वी घटनादुरुस्ती करण्याचे मार्ग लोकशाही–संस्कारांनी पूनीत झालेले आहेत, असे मानले तर त्या मापात निवडणूक कायद्यातील दुरुस्ती कोठे बसेल ?

पण असे तर्काच्या आणि उपचारांच्या कचाट्यात बाईंसारख्या असाधारण व्यक्तींचे कर्तृत्व कसे पकडता येईल ? संसदीय संकेत आणि औचित्य–विवेक या गोष्टी कमी वकुबाच्या सामान्य माणसांसाठी आहेत. पंतप्रधानांसारख्या काळाला कलाटणी देणाऱ्या व्यक्ती नवे संकेत आणि औचित्याचे नवे मानदंड तयार करीत असतात. युगपुरुषांच्या तात्कालिक वर्तनाचा विचार अशा संकुचित आणि चाकोरीबद्ध दृष्टीने करणे कितपत योग्य आहे ? की आपण महापुरुष ही कल्पनाच अमान्य करणार आहोत ?

महापुरुष ही कल्पना इतिहासाच्या दृष्टीने मान्य करण्यात काहीच हरकत दिसत नाही. पण इतिहासात ' महापुरुष ' किंवा ' युगप्रवर्तक पुरुष ' ही कल्पना विशिष्ट अर्थाने वापरली जाते. इतिहासाचा अभ्यास करताना आपण काही प्रवाहांचा विचार करतो. कारण आपण असे मानलेले असते की, काही घटना जरी योगायोगाने किंवा प्रमुख व्यक्तीच्या लहरीने झाल्यासारख्या भासल्या तरी तो योगायोग किंवा ती लहर इतिहासाच्या दृष्टीने फारशी महत्त्वाची नाही. म्हणून अभ्यासक व्यक्तीच्या लहरी किंवा वागणुकीतील विसंगती बाजूला ठेवतो आणि ती प्रमुख व्यक्ती इतिहासातील कुठल्या प्रवाहाचे प्रतिनिधित्व करीत आहे, ते पाहून त्या व्यक्तीला महापुरुषत्व देतो.

असे उदाहरण कोणत्या महापुरुषाचे आहे ?

इंग्लंडचा राजा आठवा हेन्री याचे ॲन बुलिन नावाच्या बाईवर प्रेम होते. पहिली बायको सोडून त्याला ॲन बुलिनशी लग्न करावयाचे होते. पोप परवानगी देईना. तेव्हा त्याने इंग्लंडच्या धर्मपीठाचे पोपशी असलेले नाते तोडले आणि पहिल्या बायकोशी घटस्फोट घेतला. हे त्याचे वर्तन लंपटपणातून निघाले असेही म्हणता येईल. पण तेवढ्याने इतिहासातील प्रवाहाचे ज्ञान होत नाही. इंग्लंडमध्ये जो नवा राष्ट्रवाद उदयास येत होता; धर्मकल्पनांवरचा विश्वास उडून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार केला जात होता, वगैरे ऐतिहासिक प्रवाहाकडे आपले दुर्लक्ष होईल. हेन्रीचा लंपटपणा बाजूस ठेवून इंग्लंडमधील नवोदित विचारांचा पुढारी म्हणून त्याच्याकडे पाहाणे श्रेयस्कर ठरते. याच दृष्टीने इतिहासकार हेन्रीला युगप्रवर्तक पुरुष म्हणून ओळखतात.

महापुरुषाची कल्पना जर आपल्याला मान्य असेल, तर पंतप्रधान महापुरुष आहेत की नाहीत ?

पंतप्रधान महापुरुष आहेत किंवा नाहीत, हा महत्त्वाचा मुद्दा नाही; तर आपण समकालीन त्यांना महापुरुष ठरविण्यात अधिकारी आहोत किंवा नाही, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. इतिहासकार जेव्हा एखाद्या व्यक्तीला युगपुरुष ठरवितो तेव्हा तिचे संपूर्ण कर्तृत्व इतिहासकाराला माहीत असते; तिचे निर्णय किती दूरगामी परिणाम करणारे होते आणि कोणत्या ऐतिहासिक प्रवाहाचे ते प्रतिक होते, याचा अंदाज इतिहासकार घेऊ शकतो. आपण समकालीन याबाबतीत पूर्ण अज्ञानी असतो. तेव्हा बाई युगपुरुष आहेत की, केवळ एक वादळी राजकारणी आहेत, हे आपण कसे ठरविणार ? म्हणून, महापुरुष ही कल्पना

एतिहासिक दृष्टीने उपयोगाची असली तरी समकालीन राजकारणात टाकाऊ आणि धोकेबाज आहे. आताच त्यातील धोके आपल्याला दिसू लागले आहेत.

असे कोणते धोके आपल्याला दिसले आहेत ?

६९ सालापासून बाईंच्या भोगेवाल्यांनी बाई या महानेत्या आहेत; 'नयी रोशनी' आणणाऱ्या आहेत; सर्व संकटनाशककालीच्याच अवतार अशी त्यांची प्रतिमा तयार करण्यास सुरुवात केली होती. यामुळे झाले असे की, दारिद्र्य दूर करण्यासाठी दीर्घ परिश्रमाची आवश्यकता आहे, शिस्तीची आवश्यकता आहे, याही गोष्टी ध्यानात येईनाशा झाल्या. खुद्द बाईंनी कॉंग्रेसच्या मुखपत्राला दिलेल्या मुलाखतीत एकदा म्हटले होते की, 'I am searching for a financial wizard.' म्हणजे, प्रत्येक गोष्टीवर तात्काल परिणाम करील असा 'इलम' आहे, अशी हवा सगळीकडे पसरली.

परिणाम काय झाला ?

परिणाम असा झाला की जेव्हा खरा 'इलम' म्हणजे दीर्घोद्योग आणि सतत श्रम याची शिकवण देण्याची वेळ आली तेव्हा स्वप्नभग्न जनतेला तोंड देता येईल असे राज्यकर्त्यांना वाटेना ! आणीबाणीच्या घोषणेची एक कारणमीमांसा अशीही करता येईल. खुद्द बाईंनी परदेशी वार्ताहरला दिलेल्या मुलाखतीत हे एकदा अर्धवट मान्य केले. अशी कोणती गोष्ट तुम्ही आणीबाणीत केली, की जी तुम्ही एरवी करू शकला नसता; असे विचारल्यावर बाई म्हणाल्या, 'बोनस कायद्यातला बदल !' म्हणजे समकालीनांनी लादलेले महापुरुषत्व त्या व्यक्तीची कोंडी करणारे ठरते. पण जनतेच्या दृष्टीने यातील धोका दुसराच आहे.

तो कोणता ?

महापुरुष म्हणवून घेणारा राजकारणी तत्कालीन नीतिनियम आणि कायदेकानू यांची बंधने झुगारून देण्याचा प्रयत्न करू पाहतो. मी राजकारणाचे नवे संकेत आणि औचित्याचे नवे मानदंड निर्माण करणारा आहे, माझे कर्तृत्व संकुचित नीतिनियमांचे जोखड सहन करणार नाही, असा भाव तो आणतो. युगपुरुष आणि बेबंद व्यक्ती यांच्यात या बाबतीत फार साम्य आहे. तेव्हा आपण असा विचार केला पाहिजे की, एखादा राजकारणी रोशनी आणणारा ठरेल, असा भरंवसा बाळगून त्याच्या बेबंदपणाला वाव देण्याचा जुगार लोकशाहीला परवडणारा आहे का ?

फ्रान्सने द गॉलला सर्वाधिकार देऊन असा जुगार यशस्वी केला होता की नाही ?

नुसते फ्रान्सचे उदाहरण घेऊन काय उपयोग ? त्या देशाला मुक्त राजकारणाची परंपरा होती. या उलट ब्रह्मदेशाचे उदाहरण पाहा. पूर्वी त्या देशाच्या संसदेने सहा महिन्यांसाठी 'ने विन' या लष्करी अधिकाऱ्याला सर्वाधिकार दिले. सहा महिन्यांनंतर त्याने संसदेला ते अधिकार परत केले, तेव्हा सर्वत्रांस अचंबा जाहला ! पण त्यानंतर काय झाले ? सहाच महिन्यांत संसद रद्द करून राजश्री सर्वाधिकारी झाले ! तेव्हा जुगार तो जुगारच !

संख्याशास्त्रात 'जुगारी धुळीलाच मिळायचा' अशा अर्थाचे प्रमेयच आहे !

काहीजण यापेक्षा निराळा युक्तिवाद पंतप्रधानांच्या बाजूने करतात. ते म्हणतात की, आमची लोकशाही निराळ्या प्रकारची आहे. एखादी कृती लोकशाहीशी सुसंगत आहे की नाही, हे ठरविण्याचे आमचे निकष निराळे आहेत. म्हणून इंग्लंड, ऑस्ट्रेलिया अगर कॅनडा येथील दाखले आमच्या उपयोगाचे नाहीत. परवाच इंग्लंडमधील आपले वकील बी. के. नेहरू म्हणाले की, लोकशाहीच्या परदेशी व्याख्यांशी आमची लोकशाही सुसंगत असावी असा आग्रह नको ! बॅ. अंतुल्यांनीही हेच ठणकावले. ते म्हणाले की, आम्ही लोकशाहीवादी आहोत, अशी परक्यांची सर्टिफिकिटे आम्हाला नकोत !

हे खरे आहे की, लोकशाहीची काल-स्थिती-राष्ट्र-निरपेक्ष अशी दृढ व्याख्या नाही. तिचे संकेत निरनिराळे असणार हेही मान्य. त्यामुळे भारतीय लोकशाहीचे निकष अगर संकेत स्वतंत्र असावेत, यालाही हरकत नाही. पण ते संकेत कोणते, हे तर सांगाल की नाही ? नुसतेच आपले आमची लोकशाही निराळी असे म्हणून कसे भागेल ?

पण हे संकेत निश्चित स्वरूपात मांडावेत असा आग्रह तरी काय कामाचा ? हे पायंडे देशाच्या लोकशाही राजकारणातूनच स्पष्ट होत जाणार आहेत !

तसे जर असेल तर निदान हे तरी मान्य केले पाहिजे की, जे कोणते आपल्या लोकशाहीचे संकेत आहेत, ते परदेशी लोकशाही-संकेतांपेक्षा निराळे असले, तरी विरोधी तर असू नयेत ? इंग्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इथून आपण लोकशाहीची कल्पना घेतली. तेथील लोकशाहीचे निकष आणि आपली लोकशाही-संकेतांची कल्पना जर परस्परविरोधी ठरल्या तर मूळ लोकशाहीची कल्पनाच अंतर्विरोधी आहे, असे म्हणावे लागेल आणि मग त्या कल्पनेचा गंभीरपणे विचार करता येणार नाही. एकाच गणितात त्रिकोणांच्या कोनांची बेरीज १८० ठरली आणि ३६० ही ठरली तर ते गणित मूर्खपणाचे आहे, असेच मानले पाहिजे.

मग तुमच्या म्हणण्याचा रोख काय ?

रोख असा की, आपले लोकशाहीचे नियम इंग्लंडमधील लोकशाहीच्या नियमांपेक्षा निराळे असले तरी विरोधी असून चालणार नाहीत. हे जर मान्य केले, तर ज्या कोणत्या स्पष्ट शब्दात न मांडलेल्या- संकेतांच्या आधारे राज्यकर्ता पक्ष निवडणूक कायद्यातील दुरुस्तीचे समर्थन करीत असेल ते संकेत इंग्लंडमधील संकेतांच्या, विरुद्ध आहेत हे स्पष्ट असल्याने, निवडणूक कायद्यातील दुरुस्ती आणि त्याच वेळी झालेली घटनेतील दुरुस्ती संशयास्पद आहेत असे म्हणावे लागेल; आणि हीच गोष्ट राज्यकर्त्यांना खवखवते आहे ! निवडणुका पुढे ढकलल्या तेव्हा 'जनतेलाच निवडणुका नको आहेत,' असे म्हणायचे. निवडणुका घ्यायच्या ठरल्यावर 'बघा, आहे की नाही आमची लोकशाहीवर निष्ठा' असा दावा करायचा, या विसंगतीचा जन्म या बीजभूत अपराधीत्वाच्या जाणियेतून झालेला आहे ! ही विवेकाची टोचणी असह्य होऊन कॉंग्रेसमधले काही लोक फुटले आहेत !

पण ही मंडळी सत्तेला दुरावल्यामुळे कॉंग्रेसमधून फुटली, असे पुण्याचा 'केसरी' म्हणतो.

म्हणजे, कॉंग्रेसमध्ये असलेली मंडळी सत्तेवर असल्यामुळे त्या पक्षात आहेत, अशी शंका घेणे वाजवी ठरेल ! थोडक्यात, कॉंग्रेस हा ध्येयधोरण नसलेला पक्ष असून केवळ सत्तालालसा असणाऱ्या लोकांचे टोळके आहे,

पृष्ठ ३१ वर

आणिबाणिला विरोध आणि मूलभूत हक्कांचे रक्षण हाच या निवडणुकीतील मुख्य प्रश्न आहे

# मतपेटीचे शस्त्र

वा. दा. रानडे

भारतीय लोकसभेसाठी सहाव्या सार्वत्रिक निवडणुका येत्या मार्च १९७७ मध्ये होत आहेत. स्वातंत्र्यातील पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५२ साली झाली. आता १९७७ च्या निवडणुकीने निवडणुकांना पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. त्या अर्थाने निवडणुकांचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे असे म्हणता येईल. त्या निमित्ताने निवडणुकांच्या या प्रयोगाचे सखोल वस्तुनिष्ठ विश्लेषण लोकशाहीवाद्यांनी करायला हवे. अशा अभ्यासाला चालना मिळावी या उद्देशाने माझे या संबंधीचे काही विचार व निष्कर्ष विचारविनिमयासाठी मांडीत आहे.

## मतदानाचे प्रमाण

निवडणुका हे आधुनिक प्रातिनिधिक लोकशाहीचे एक अविभाज्य अंग आहे. निवडणुका लोकशाहीचे अधिष्ठान आहे. सरकार निवडण्याचे व बदलण्याचे सामर्थ्य मतपेटीत आहे. शांततेच्या मार्गाने सत्तांतर घडवून आणण्याचे मतपेटी हे प्रभावी साधन आहे. मतदाराला याची कितपत जाणीव आहे? गेल्या पाच लोकसभा निवडणुकांत ही जाणीव कितपत वाढत गेलेली आहे? भारतीय घटनेने एकवीस वर्षांवरील सर्व प्रौढांना मतदानाचा हक्क दिला. पण मतदार हा हक्क कितपत जागरूकपणे बजावतात? गेल्या पाच लोकसभा निवडणुकांचा या दृष्टीने अभ्यास केला तर काय दिसून येते? निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढणे, जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करणे हे मतदारांच्या वाढत्या जागरूकतेचे एक गमक म्हणता येईल. गेल्या पाच लोकसभा निवडणुकांतील मतदानाचे आकडे पाहिले तर काय दिसून येते?

**लोकसभा निवडणुका : मतदानाचे शेकडा प्रमाण**

| वर्ष | मतांची टक्केवारी |
|---|---|
| १९५२ | ४५·७ |
| १९५७ | ४७·७४ |
| १९६२ | ५५·७२ |
| १९६७ | ६१·३३ |
| १९७१ | ५४·८१ |

या आकड्यांवरून असे दिसते की, मतदानाचे प्रमाण १९६७ पर्यंत वाढत गेले, पण १९७१ च्या निवडणुकीत ते १९६७ पेक्षा ६·५१ टक्क्यांनी घटले. मतदानाचे प्रमाण १९७१ मध्ये वाढले का नाही? निदान टिकून का राहिले नाही? मतदारांमध्ये उदासीनता वाढत असल्याचे हे निदर्शक आहे का? १९६७ आणि १९७१ च्या निवडणुकांतील लोकसभा मतदानाचा राज्यवार तुलनात्मक विचार केला तर मतदानाच्या प्रमाणात कोठे घट किंवा वाढ झाली, याचे चित्र अधिक स्पष्ट होते.

**लोकसभा निवडणुकांतील मतदान**

| राज्ये | १९६७ | १९७१ |
|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ६८·६७ | ५९·१२ |
| आसाम | ५९·२८ | ५०·६८ |
| बिहार | ५१·५३ | ४८·९५ |
| गुजराथ | ६३·७७ | ५५·४९ |
| हरियाना | ७२·६१ | ६४·३५ |
| काश्मीर | ५५·१६ | ५८·११ |
| केरळ | ७५·६४ | ६४·५२ |
| मध्य प्रदेश | ५३·४६ | ४५·०० |
| तामिळनाडू | ७६·५६ | ७१·८२ |
| महाराष्ट्र | ६४·७५ | ५९·९४ |
| म्हैसूर | ६२·९५ | ५७·४१ |
| ओरिसा | ४३·७० | ४३·१९ |
| पंजाब | ७१·१३ | ५९·८९ |
| राजस्थान | ५८·२७ | ५४·०४ |
| उत्तर प्रदेश | ५४·५१ | ४६·१० |
| पश्चिम बंगाल | ६६·०३ | ६१·९४ |
| **केन्द्र प्रदेश** | | |
| अंदमान-निकोबार | ७८·४५ | ७०·५४ |
| चंदीगड | ६५·३६ | ६२·९१ |
| दादरा-नगरहवेली | ७८·२८ | ६९·७८ |
| दिल्ली | ६९·४९ | ६५·१६ |

| | | |
|---|---|---|
| गोवा, दीव, दमण | ६८·३७ | ५५·९१ |
| हिमाचल प्रदेश | ५१·२० | ४१·१८ |
| लखदीव | ८२·०२ | ...... |
| मणिपूर × | ६७·२४ | ४८·८५ |
| पाँडिचरी | ७४·८५ | ७०·०९ |
| त्रिपुरा × | ७४·८४ | ६०·८४ |
| नागालँड × | ...... | ५३·७७ |
| एकूण | ६१·३३ | ५५·२६ |

× नागालँड, त्रिपुरा, मणिपूर यांना आता राज्याचा दर्जा मिळाला आहे.

यावरून सर्वच राज्यांत व केंद्रप्रदेशांत मतदानाच्या प्रमाणात घट झालेली दिसते. बिहार, मध्य प्रदेश, ओरिसा, उत्तर प्रदेश ही राज्ये आणि हिमाचल प्रदेश, मणिपूर येथे तर पन्नास टक्क्यांपेक्षाही कमी मतदान झालेले आहे. मतदानाच्या प्रमाणात घट ही याप्रमाणे एक-दोन राज्यांपुरती अपवादात्मक नव्हे तर सार्वत्रिक प्रवृत्ती आहे. पण तिचा फारसा कोणी गंभीरपणे विचार केला असल्याचे माझ्या तरी पाहण्यात आलेले नाही. मतदानाचे प्रमाण १९७१ च्या निवडणुकीत का घटले ? मतदान न करणारा मतदार विशिष्ट थरातला किंवा वर्गातला होता याबद्दल निश्चितपणे सांगणे कठीण आहे. संशोधकांनी पाहणी करून संशोधन करण्यासारखा हा विषय आहे. माझ्या मते मतदान न करणारा हा मतदार मध्यमवर्गीय थरातला आणि एकंदर राजकारणाबद्दल निराशा, वैफल्य, उदासीनता बाळगणारा असला पाहिजे. १९७१ च्या निवडणुकीत मतदानाचे प्रमाण ६-५१ टक्क्यांनी घटले. एवढे मतदान कमी झालें म्हणून काय बिघडले ? त्यांना कोणी सक्तीने तर घरी बसविले नाही ना ? मतदानाच्या हक्कात मत न देण्याचा हक्कही समाविष्ट आहे. कोणताच उमेदवार पसंत नाही म्हणून त्यांनी मत दिले नसेल तर त्यांचे चुकले कोठे ? असा युक्तिवाद या मतदारांच्या बाजूने करता येण्यासारखा आहे. पण थोडा अधिक विचार केल्यास त्यातील फोलपणा लक्षात येईल. साडेसहा टक्के मते कमी पडणे याचा अर्थ प्रत्येक मतदारसंघात साधारणपणे सरासरी ३२,५०० मतदान कमी होणे. हा आकडा लहान व दुर्लक्षणीय नाही. एवढ्या मतांनी निकाल बदलू शकतो. काँग्रेसने १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत दोन तृतीयांश जागा जिंकून मोठे यश मिळविले हे खरे, पण निवडणुका लढविताना निर्णायक बहुमताची सुद्धा खात्री काँग्रेस नेत्यांना वाटत नव्हती म्हणूनच काँग्रेसने त्यावेळी एकट्याच्या बळावर निवडणुका न लढविता काही राज्यांत कम्युनिस्ट, तामिळनाडूत द्र. मु. क. अशा पक्षांशी समझोता केला होता. निर्णायक बहुमताची खात्री नसल्याने आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त मतदान झाले पाहिजे, याबद्दल काँग्रेसचे कार्यकर्ते जागरूक होते. तेव्हा मतदान न करणारे मतदार मुख्यत: काँग्रेसविरोधी मताचे होते. या साडेसहा टक्के मतदारांनी मते दिली असती तर इंदिरा गांधींच्या पक्षाला एवढा दणदणीत विजय निश्चितच मिळाला नसता. साडेसहा टक्केच काय, तीन टक्के मतेसुद्धा चित्र बदलून टाकू शकतात. काँग्रेसला १९६७ च्या निवडणुकीत ४०·७३ टक्के व १९७१ च्या निवडणुकीत ४३·६४ टक्के मते मिळाली. अवघी तीन टक्के मते जास्त मिळाली असता काँग्रेसच्या जागांची संख्या मात्र २८३ वरून ३५२ पर्यंत गेली, म्हणजे ६९ नी वाढली. अवघ्या तीन टक्के मतवाढीने हा चमत्कार घडवून आणला. काँग्रेसविरोधी साडेसहा टक्के मतदारांनी आपली मते नोंदविली असती तर निवडणूक निकालाचे चित्र निश्चित बदलले असते. या मतदारांची गैरहजेरी काँग्रेसच्या यशाला साहाय्यभूत झाली.

## मतदारांची मनोवृत्ती

मतदानाबद्दल बेफिकीर किंवा उदासीन राहणारी मतदाराची मनोवृत्ती मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून समजावून घेणे आवश्यक आहे. माणसाला स्वभावत:च संघर्षाची आणि त्यातही चुरशीच्या संघर्षाची विशेष आवड असते. चुरशीने लढलेल्या कुस्त्या, क्रिकेटचे सामने पाहण्यात तो रंगून जातो. निवडणूक हीं एक प्रकारची लढाई किंवा संघर्षच आहे. त्यात एक पक्ष भारी असून दुसरा दुबळा असेल तर सामना एकतर्फी होतो, त्यात रंग भरत नाही. असा एकतर्फी सामना पाहण्यात गंमत वाटत नाही. निवडणुकीत सुद्धा एकच पक्ष प्रभावी असेल आणि त्यालाच विजय मिळणार हे निश्चित असेल तर सर्वसामान्य मतदार बेफिकीर व उदासीन होतो. 'निकाल ठरलेलाच आहे. आपल्या एका मताने त्यात काय फरक पडणार आहे ? मग कशाला मत द्यायचे ?' अशी त्याची मनोवृत्ती बनते व तो घरी बसतो. उलट दोन उमेदवार तुल्यबळ असतील, कोण निवडून येणार हे शेवटपर्यंत अनिश्चित असेल तर आपल्याला पसंत असलेल्या उमेदवाराला मत देऊन निवडून आणले पाहिजे. कुणी सांगावे, आपल्या एका मतानेसुद्धा विजयाचे पारडे त्याच्या बाजूने झुकेल, असे मतदाराला वाटावे व तो मत देतो तेव्हा जास्त मतदान होण्यासाठी चुरशीची निवडणूक हवी आणि त्यासाठी दोन तुल्यबळ पक्ष हवेत. काँग्रेसला तुल्यबळ विरोधी पक्ष स्वातंत्र्याच्या २९ वर्षांत देशात निर्माण होऊ शकला नाही, ही वस्तुस्थिती आहे, मग त्याची कारणे काहीही असोत. या कारणांचा विचार पुढे येईलच. येथे फक्त मतदारांच्या प्रतिसादाचे संदर्भात त्याचा उल्लेख केलेला आहे.

आपले मत गुप्त राहील का ? सत्तारूढ पक्षाविरुद्ध आपण मत दिले तर त्याबद्दल पुढे आपल्याला काही त्रास होईल का, अशी भीती काही मतदारांना वाटते व ते आपले खरे मत न नोंदविता उगाच कटकट नको म्हणून सत्तारूढ पक्षालाच मत देतात. असे प्रकार काही प्रमाणात घडतात हे खरे आहे, पण मतदारांनी मनातील भीती टाकून देऊन निर्भयपणाने मतदान केले पाहिजे. विशिष्ट उमेदवारालाच मत देण्याबद्दल दडपण आल्याच्या, दमदाटी दिल्याच्या तक्रारी प्रत्येक निवडणुकीत काही ठिकाणी झालेल्या आहेत. त्याबाबत निवडणूक कायद्याखाली दाद मागता येते व अशी दमदाटी करणाऱ्या उमेदवाराची निवडणूकही रद्द होऊ शकते. तेव्हा मतदारांनी अशा दमदाटीला भिऊन घरी बसणे किंवा दमदाटी करणाऱ्या उमेदवाराच्या बाजूने मत देणे हे खऱ्या अर्थाने खुले मतदान नव्हे. भारतीय मतदारांमध्ये ही निर्भयता किती प्रमाणात आलेली आहे ? पैसा, सत्ता, जात यांच्या दडपणास बळी न पडता निर्भयपणाने मतदान खरोखर किती होते, याची वस्तुनिष्ठ पाहणी केली जाणे आवश्यक आहे. निवडणुकीत दहशत आणि दडपणाविरुद्ध कायदेशीर कारवाई करता येण्यासारखी असली तरी सर्वसामान्य मतदारास

या गोष्टी करण्यासाठी वेळ नसतो आणि पैसाही नसतो. मतदाराचे शिक्षण करून त्याला निर्भय बनविणे हे कार्य लोकशाहीवादी कार्यकर्त्यांनी लोकशिक्षणाचा एक भाग मानूनच केले पाहिजे.

## हरिजन, गिरिजन व स्त्रियांची मते

गेल्या दोन लोकसभा निवडणुकांतील मतदानाची छाननी करताना असे दिसते की, सर्वसाधारण मतदार संघापेक्षा हरिजन आणि आदिवासींसाठी असलेल्या राखीव मतदार संघात मतदान कमी होते आणि पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांचे मतदान सर्वच मतदारसंघात कमी आहे.

लोकसभा निवडणुका

हरिजन मतदारसंघातील मतदान

| वर्ष | शेकडा मतदान |
|---|---|
| १९६७ | ६१·०४ |
| १९७१ | ५१·४३ |

१९६७ च्या निवडणुकीत सर्वसाधारण मतदारसंघातील मतदान ६२·६७ टक्के होते हरिजन मतदारसंघातील त्यावेळचे ६२·०४ टक्के हे मतदान त्यामानाने फारसे कमी नव्हते. फरक फक्त १·३३ टक्के मताचा होता. पण १९७१ च्या निवडणुकीत हे अंतर वाढलेले दिसते. त्यावेळी सर्वसाधारण मतदारसंघात ९५·९८ टक्के व हरिजन मतदारसंघात ५१·४३ टक्के मतदान झाले. याचा अर्थ हरिजन मतदारसंघातील मतदान ५·५५ टक्क्यांनी कमी झाले. हे मतदान कमी का झाले, याच्या कारणाचा शोध घ्यावयास हवा. सर्वसाधारण मतदारसंघातील मतदानात १९६७ पेक्षा जवळजवळ ५ टक्के घट झाली तर हरिजन मतदारसंघात ही घट १० टक्के आहे.

लोकसभा निवडणुका

आदिवासी मतदारसंघातील मतदान

| वर्ष | शेकडा मतदान |
|---|---|
| १९६७ | ४८·९६ |
| १९७१ | ४३·४२ |

आदिवासी मतदारसंघात हरिजन मतदारसंघापेक्षाही मतदानाचे प्रमाण कमी आढळते. ते वाढविण्यासाठी अधिक प्रयत्न करावयास हवेत. पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मतदार मतदानास गैरहजर असणे ही खऱ्या अर्थाने प्रतिनिधिक निवडणूक म्हणता येणार नाही. पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान झालेल्या सर्वच मतदारसंघात मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी लोकशाहीवादी कार्यकर्त्यांनी जागरूकतेने प्रयत्न केले पाहिजेत. १९६७ पेक्षा १९७१ च्या निवडणुकीत कमी मतदान होणे, ही एक प्रकारे लोकशाहीची पीछेहाटच म्हटली पाहिजे.

स्त्रियांच्या मतदानाचे सरासरी प्रमाण गोवा केंद्रशासित प्रदेशाचा अपवाद वगळता १९७१ च्या निवडणुकात सर्वच राज्यांत व केंद्रप्रदेशांत ९० टक्क्यांपेक्षा कमी होते. गोवा, दीव, दमणमध्ये ते ५०·४२ टक्के आणि त्या खालोखाल केरळमध्ये ४९·३४ टक्के होते. आपल्या घटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मतदानाचा हक्क दिला, पण बहुतेक सर्वत्र त्यांच्या मतदानाचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमीच आहे. स्वातंत्र्यातल्या पाचव्या लोकसभा निवडणुकीत सुद्धा बहुसंख्य महिलांनी मतदानाचा हक्क बजावू नये, ही घटना आमच्या स्त्रियांमध्ये मतदान–हक्काबद्दलची जागरूकता अजून फार कमी आहे, याचीच निदर्शक आहे. येत्या लोकसभा निवडणुकीत पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त स्त्रियांना आम्ही मतदानासाठी आणूच, अशा निर्धाराने प्रयत्न करायला हवेत.

मतदान सक्तीचे करावे अशी सूचना केली जाते. कायद्याने मतदान सक्तीचे केले तर कमी मतदान व त्यातून निर्माण होणारे प्रश्नच उपस्थित होणार नाहीत. पण कोणत्याही प्रकारची सक्ती लोकशाहीच्या मूलभूत कल्पनेशीच विसंगत आहे. मतदान हा घटनेने आपल्याला दिलेला हक्क तर आहेच, पण लोकशाही राज्यातील जबाबदार नागरिक या नात्याने आपले ते कर्तव्यही आहे. हक्क आणि कर्तव्याचा संघर्ष येथे येत नसून, ती दोन्ही एकरूप झाली आहेत, ही वृत्ती अंगी बाणवून मतदारांनी स्वेच्छेने मतदान करण्यातच खरी लोकशाही आहे.

## निवडणूक पद्धतीत सुधारणा

मतदानाची कायद्याने सक्ती केली नाही तरी परिपूर्ण लोकशाहीचे अंतिम उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने सध्याच्या निवडणूक पद्धतीत काही सुधारणा करणे आवश्यक आहे, मतदारसंघातील बहुसंख्य मतदारांनी ज्याला मते दिलेली आहेत त्यालाच खऱ्या अर्थाने त्या मतदारसंघाचा प्रतिनिधी म्हणता येईल, केवळ सर्वांत जास्त मते पडलेल्या उमेदवाराला नव्हे. किंवा झालेल्या मतदानापैकी पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त मते पडलेल्या उमेदवाराला सुद्धा नव्हे तर मतदारसंघातील एकूण मतदारांच्या निम्म्यांपेक्षा अधिक मते ज्याला पडली आहेत त्यालाच विजयी उमेदवार मानले पाहिजे. सध्याच्या निवडणुकातील किती विजयी उमेदवार या कसोटीला उतरतील, हा एक संशोधनाचा आणि अभ्यासाचा विषय आहे. येथे फक्त काही उदाहरणे देत आहे.

१९५२ मधील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी लोकप्रियतेच्या शिखरावर असलेले भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू सुद्धा या कसोटीला उतरू शकले नाहीत. अलाहाबाद जिल्हा (पूर्व) आणि जोनपूर जिल्हा (पश्चिम) या द्विसदस्य मतदारसंघातून ते लोकसभेला उभे होते. त्यांच्या मतदारसंघात एकूण मतदार ७,४९,७५० होते, मतदान ४० टक्के झाले आणि पंडित नेहरूंना २,३३,५७१ म्हणजे ३८ टक्के मत मिळाली.

सध्याच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधीही या कसोटीस उतरत नाहीत. १९७१ च्या निवडणुकीत रायबरेली मतदारसंघातून त्या निवडून आल्या. या मतदारसंघात एकूण मतदार ५,१५,७११, त्यांपैकी २,८४,७५२ मतदारांनी मतदान केले. म्हणजे ५५ टक्के मतदान झाले. त्यात वैध मते २,७६,२७४ होती. इंदिरा गांधींनी त्यापैकी १,८३,३०९ म्हणजे ६६·३५ टक्के मते मिळविली. हे प्रमाण एकूण मतदारांच्या ३५ टक्के आहे.

पंडित नेहरू, इंदिरा गांधींसारखे नेते ज्या कसोटीत उतरू शकत नाहीत तेथे इतर उमेदवार काय उतरू शकणार? ही कसोटी लावली तर लोकसभेवर एकही उमेदवार निवडून येऊ शकणार नाही. तेव्हा ही कसोटीच अव्यवहार्य आहे, असा आक्षेप त्यावर

पृष्ठ २७ वर

# सोलकढी

## □ अनंतराव : मॅन ऑफ द इयर !

मी किती संकोची, लाजरालुजरा, प्रसिद्धिपराङमुख माणूस आहे, याची कल्पना 'सोलकढी'च्या वाचकांना आहेच. स्वतःबद्दल काही बोलणे म्हणजे मला मोठे संकट वाटते. त्यात स्वतःबद्दल काही बरे बोलायचे असले म्हणजे मीच माझा वैरी होतो. अशी माणसे आजकाल दुर्मिळ झाली आहेत. आज जो उठतो तो पुढे घुसतो. आपल्या जन्मलग्नकुंडल्यांचे ध्वज फडकवतो. आपल्या नावाची, थुंकी लावून बोंब ठोकतो आणि एखाद्या चकचकीत बिल्ल्यासारखा झळकझळाळत राहतो. आपल्याकडच्या अभिनव लोकशाहीत हे तंत्र आवश्यकही असेल कदाचित; मला ठाऊक नाही.

मला एवढेच ठाऊक आहे की, आमच्या चाळकऱ्यांनी माझा जो बहुमान केला तो उत्स्फूर्त प्रेमाचा आविष्कार होता. वाचकहो, एकदम असे चपापून जाऊ नका. कलिंगडाची एक खापटी निघालीच आहे; आता सगळे कलिंगड फोडून तुमच्यासमोर ठेवतो. (बिया काढून आणि साली टाकून) हवे तेवढे खा. मुंबईत आमची एक चाळ आहे. 'आमची' म्हणजे चक्क आमच्या मालकीची. आता दुसऱ्याच्या मालकीच्या चाळीचे अभिवर्णन आपण जसे करतो तसे आमच्या चाळीचे करायला जाल तर फसाल. आमच्याही चाळीचा पाया आणि कळस मालक-भाडेकरू संबंधावरच उभे आहेत. पण प्रकार असा विलोमनीय आहे की, चाळीचा मालकच भाडेकरूंचा नेता आणि मित्र आहे.

दोन वर्षांखाली असे नव्हते. मालक-भाडेकरू संबंधांबद्दलच्या काही गंजलेल्या गैरकल्पना भाडेकरूंच्या मद्दड मस्तकात साचून होत्या. व्हरांड्यात आणि जिन्यांवर दिवे नाहीत, या क्षुल्लक कारणासाठी भाडेकरू धूधूत्कार करायचे. पाणी कमी म्हणून आक्रोश करायचे. (त्यामुळे घशाला कोरड पडली की जादा पाणी लागणारच. हे त्यांच्या निदर्शनास आणले की, मालक एकदम नादिरशहा ठरायचा. भिंतीभिंतीवर, 'दूध-कॉफी-कोको-चहा / आमचा मालक नादिरशहा' अशा घोषणा भगभगायच्या.) चाळीला रंग नाही म्हणून त्यांचे अंतरंग प्रक्षुब्ध व्हायचे. चाळीत इतस्ततः पडझड झाली होती; पण पायाकळसासकट उभे राहायचे म्हणजे अशी पडझड होणारच, हे काही त्यांना कळायचे नाही. चाळीत, इतर कोणत्याही चाळीत असते तितपत, घाण होती. पण घाण करणे, हा भाडेकरूंच्या मूलभूत हक्कांपैकी एक आहे, असे ते मानायचे; मात्र घाण साफ न करणे, हा मालकांच्या मूलभूत हक्कांपैकी एक आहे, हे त्यांना मान्य नसायचे.

थोडक्यात सांगायचे म्हणजे चाळीय भाडेकरूंनी माझे मालकी अस्तित्वच धोक्यात आणले होते. ते टिकवण्यासाठी मला कडक्कठोर व्हावे लागले. मी उठलो आणि भाडेकरूंचे हक्कच रद्दबातल करून टाकले. सगळ्या चाळीत मग स्मशानशांतता पसरली आणि चाळीतले जीवन सुरळीत चालू झाले! आणि आता तर चाळभाडेकरूंनी चाळीचा 'मॅन ऑफ द इयर' असा माझा बहुमान बहुमताने केला आहे. (कोठे नादिरशहा आणि कोठे 'मॅन ऑफ द इयर!' आँ ?) 'मॅन ऑफ द इयर' ठरवण्यासाठी खुले मतदान झाले. इतरांना डावलून आपण अमुकतमुकढमुकाची निवड का केली ते मतदानाने सांगावे, अशी कल्पना होती. ते सांगताना बहुसंख्य भाडेकरूंनी माझ्या अंगच्या धैर्य, निडरपणा, तत्परता, कृतिप्रवणता इत्यादी गुणांचा निर्देश केला होता. मी बोलतो तसा चालतो, या गुणामुळे एकजण भारावून गेला होता. आईचा आदर्श लेक, अशी दुसऱ्याने भलावण केली होती. तिसऱ्या एकाने मी हुंडाविरोधक म्हणून माझी निवड केली होती. एकाने माझे देखणेपण अचूक ओळखले होते. दुसऱ्याने तर माझी मांजर देखणी आहे, यासाठी मला मत बहाल केले होते. मी श्रम हाच परमेश्वर मानतो, असे कारण आणखी एकाने दिले होते.

आजपर्यंत माझे काही कमी बहुमान झालेले नाहीत. पण अंगभूत संकोचामुळे ते मी आपण होऊन कोणाला कधी सांगितले नाहीत. हासुद्धा बहुमान मला कोणाला सांगायचा नव्हता. परंतु 'सोलकढी'च्या समजूतदार (आणि समजदारही) वाचकांना तो न सांगणे, ही बांधिलकीशी मोठी प्रतारणा ठरली असती. शिवाय सदर 'सोलकढी'चे सरवाचक, नीरक्षीरविवेकाने, लक्षात ठेवतील तो अनंतरावांचा बहुमान नव्हे, तर त्यांचा संकोची, लाजरालुजरा, प्रसिद्धिपराङमुख स्वभाव. (स्वभावाला औषध नाही,' असे आमच्या युवक कॉंग्रेसच्या अध्यक्षा अंबिका सोनी नेहमी सांगत असतात.)

*

## □ निश्चल राहण्याचा विक्रम

माणसाच्या मनात काही तरी अखंड खदखदत असते, असे मानसशास्त्र सांगते. आपल्या मनातली खदखद मिटवू शकणारा निपटनिरंजन एखादाच. मनाचे सोडा; माणसाला त्याचे साडेतीनहाती शरीरसुद्धा निचळे ठेवता येत नाही. ते सारखे काही ना काही गंमती करत राहते. कधी मुद्दाम करते. कधी उगाचच करते. विशेषतः दाटूनदामटून त्याला स्थिर ठेवायला लागलो म्हणजे ते नानाप्रकारे वाकुल्या दाखवते : अशा वेळी कानात कुठेतरी गिचमिडते; नाकात काही तरी हुळहुळते; हात पुरणार नाही अशा, पाठीच्या, नेमक्या चिचोक्याएवढ्या, जागी खाज सुटते; घशात कसे तरी खवखवते; गैरनेहमीच्या भलत्या जागांमध्ये टकमक चालू होते.

लहानपणी, शाळेत आणि घरी वेळोवेळी मिळणाऱ्या, देवासारखे स्वस्थ बसण्याच्या शिक्षेचे पालन, इच्छा असूनही, धड कधी मला करता आले नाही. सामान्यपणे जे चंचलवलन माझ्या शरीराकडून झाले नसते ते शिक्षेच्या अंमलाखाली अगदी सहज होऊन जाई. पुढे मोठेपणी, योगाच्या फॅशनेबल साधनेचे यमनियम अंगी निग्रहाने बाणवायचे प्रयत्न मी निकराने केले. योगासनात शवासन नावाचा एक प्रकार आहे. त्यात शरीर उताणे ठेवायचे आणि त्याचे ताण हलके करत नाहीसे करायचे आणि त्याच वेळी मन शून्यशून्य करायचे, अशी

पृष्ठ २८ वर



# अशी चौकशी, अशी फाशी !

**लेखांक तेरा । र. धों. घाणेकर**

इजिप्शियन राजांनी वैभवाचे द्योतक म्हणून आपल्या पाठीमागे भव्य पिरॅमिडस ठेवले आणि अमेरिकेचा सदतिसावा राष्ट्रपती निक्सन याने भावी इतिहासकारांच्या साठी आपल्या अंतःकरणातील गलिच्छ आणि किळसवाण्या मनोवृत्तीचे प्रतिबिंब अचूक अजमावता यावे म्हणूनच जणू काय आपल्या संभाषणाचे टेप्स काढून ठेवून दिले.

वॉटरगेट प्रकरणातील सर्व आरोपींनी गुन्हा कबूल केला होता, आणि २३ मार्च १९७३ ला जज्ज सिरिकांनी प्रत्येकाला जास्तीत जास्त शिक्षा दिल्याचे निकालपत्र दिले. हंटला ३५ वर्षे, बार्कर, गोंझालेझ, मार्टिनेझ आणि स्टर्गिस यांना ४० वर्षे व लिडीला २० वर्षे.

आरोपींच्या कुटुंबांच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी हस्ते-परहस्ते निक्सनने उचललेली होती. आणि काही काळानंतर सरकारची मेहेरनजर म्हणून त्यांची शिक्षा एकदम कमी केली जाईल, असे त्यांना आश्वासन देण्यात आले होते.

वॉटरगेट प्रकरण मिटलं. आता काळजी करायचे काहीही कारण नाही, असा विचार करून निक्सनच्या व्हाईट हाऊसमधील त्याचे धूर्त व चलाख हस्तक निराळ्या मार्गाला लागले होते. अशा परिस्थितीत न्यू सिनेट ऑफिस बिल्डिंगच्या तळघरांतील भव्य दिवाणखान्यात काम करीत बसलेल्या सिनेट-कमिटीपुढे सोमवार दि. १६ जुलै १९७३ ला दुपारी २ वाजता अॅलेक्स बटरफील्ड ह्याने सांगून टाकले की, १९७० सालापासून राष्ट्रपती निक्सन वॉशिंग्टन येथील लिंकन रूम व कॅम्प डेव्हिड येथे आपले स्वतःचे आपल्या सहकाऱ्यांबरोबर झालेले प्रत्येक भाषण (प्रत्यक्ष आणि टेलिफोनवरून) टेप करून ठेवीत असे.

हा बॉम्बगोळा व्हाईट हाऊसवर पडला आणि सगळीकडे एकच हाहाकार उडाला. सगळे व्हाईट हाऊस, चिंता, भीती, काळजी ह्यांनी काळेठिक्कर पडले.

अलेक्झांडर बटरफील्ड, अमेरिकेच्या वायुदलातील पूर्वीचा कर्नल, हल्डमनचा हस्तक, व्हाईट हाऊसमध्ये हल्डमनच्याच कार्यालयात बाहेरून आलेले कागदपत्र निक्सनच्या कार्यालयात पुढे ढकलावयाचे व निक्सनच्या चेम्बर्सची आंतरिक बंदोबस्त व सुव्यवस्था ठेवायची, हे त्याचे मोठे काम. वागण्यात शांत, वृत्तीने उमदा, सगळ्यांशी मिळून मिसळून वागणारा, पण आता ह्या वेळी तो असा काही कैंचीत सापडला गेला होता की, सिनेट कमिटीपुढे स्वतःला माहीत असलेली सर्व हकीकत सांगून टाकून मन मोकळे करावे, असे त्याला फार दिवसांपासून वाटत होते.

भ्रमाचा भोपळा फुटला. वॉटरगेट राहिले बाजूला आणि आता हे टेप्स प्रकरणच रंगणार, आणि प्रत्येकाचा जीव घेणार, हे जाणून प्रत्येकजण हवालदील झाला होता.

CREEP मधील पूर्वीचा निक्सन–निवडणूक–मंडळाचा डायरेक्टर व व्हाईट हाऊसमधील निवेदन व माहिती खात्यातील उपडायरेक्टर जेब मॅगरूडर ह्याने आपल्या १९७६ साली प्रसिद्ध केलेल्या 'One man's Road to Watergate' ह्या पुस्तकातील २७८ पानावर स्पष्ट लिहून टाकले आहे की, बटरफील्डच्या जबानीनंतर त्याला कळले की, निक्सनच काय पण कॉलसन, हल्डमन, डीन, एहरलिचमन व मिचेल हे देखील आपआपल्या कार्यालयात झालेली बोलणी टेप करून ठेवीत असत. त्याची खात्री झाली की, आपले बोलणे आपल्या ह्या मित्रांनी जरूर टेप करून ठेवले असणार; व ते सर्वजण आप-

त्याला एक दिवस खड्डयात टाकून मोकळे होणार! तो एकदम बेचैन झाला.

## TAPES–टेप्स

स्वतःच्या बोलण्याचे टेप्स काढून ठेवण्याची कल्पना फार पूर्वी म्हणजे उपराष्ट्रपती म्हणून १९५३ सालात निवडून आल्यानंतर निक्सनच्या डोक्यात घुमत होती. पण त्याच्या विचाराला तितकीशी साथ त्यावेळी मिळाली नाही.

जो मॅकॉर्थीच्या प्रकरणात जोडीने काम केलेले निक्सन व जेम्स बॅसेट हे दोघेजण सिनेट बिल्डिंगच्या ५५ नंबरच्या खोलीत १२ मार्च १९५४ ला गप्पा मारीत बसले होते. त्यावेळी पहिल्या प्रथम निक्सनच्या बोलण्यात राष्ट्रपती आयसेन हॉवरच्या चेंबर्समध्ये त्यांची संभाषणे टेप करून ठेवावीत; असे आले. भावी इतिहासकारांना ते एक फार मोठे साधन निर्माण करून ठेवल्यासारखे होईल, असे दोघांनाही वाटले. कल्पना डोक्यात घर करून राहिली, हातून काहीच घडले नाही.

पूर्वीचे राष्ट्रपती फ्रॅंकलिन रुझव्हेल्ट, हॅरी ट्रुमन, जॉन केनेडी व लिंडन जॉन्सन, ह्यांनी अशा प्रकारची योजना करून ठेवली होती व त्यांनी त्यांची काही भाषणे व संभाषणे टेप करून ठेवल्याचे आढळून आले. आता ते सर्व टेप्स प्रत्येक राष्ट्रपतीने आपल्या नावे उभारलेल्या ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयातून जमा करून ठेवले गेलेले आहेत.

राष्ट्रपती म्हणून निवडणूक झाल्यानंतर मात्र निक्सनने व्हाईट हाऊसमधून सहज फेरफटका मारला असताना १२ नोव्हेंबर १९६८ ला जॉन्सनची टेप्स काढून ठेवण्याची अंमलबजावणी कशी होती, ती निक्सनने नीट समजावून घेतली आणि १५ फेब्रुवारी १९६९ ला आर्मी सिग्नल युनिटकडून टेप काढण्याची यंत्रे ओव्हल कार्यालयातून काढून टाकविली.

पुढे जवळजवळ वर्षभर आपल्या दोन्ही कार्यालयांतून भेटावयास येणाऱ्या व्यक्तींच्या बरोबरची संभाषणे टिपून घेण्यासाठी लघुलेखक ठेवलेले असत व ते काम व्यवस्थितपणे उरकून घेत.

सप्टेंबर १९६९ मध्ये पॅसिफिक किनाऱ्यावरील सा-क्लेमंटी ह्या ठिकाणी निक्सनने नवीन विस्तीर्ण जागा विकत घेऊन त्या ठिकाणी Nixon Foundation ही संस्था स्थापन केली. कमिटीमध्ये कोटयाधीश व्यापारी लिओनार्ड फायरस्टोन, डोनाल्ड कॅंडेल, रॉस पॅरोट, टॅफ्ट श्रीबेर हे बाहेरचे व मिचेल, हल्डमन, कामबाच, एहरलिचमन, गार्मेंट, व फिंच हे व्हाईट हाऊसमधले अशी निवडक मंडळी होती. कॅलिफोर्नियातील सॅनफोर्ड येथील इन्स्टिटयूटसारखी निक्सन–फाऊंडेशन ही संस्था ऐतिहासिक वास्तू म्हणून नावारूपास आली पाहिजे; हे निक्सनने पहिल्याच भेटीत सर्वांना पटवून दिले. संशोधकांना आपल्या कार्यापासून सतत स्फूर्ती मिळत राहून ह्या संग्रहालयातील प्रत्येक वस्तू राष्ट्राला उपयुक्त ठरावी, असा प्रत्येकाचा विचार. काही महिन्यांनंतर कमिटीच्या सभासदांनी स्मिथसोनिअन व व्हूव्हर इन्स्टिटयूट्स, लिंडन जॉन्सन लायब्ररी, नॅशनल आर्चिव्हज ह्या संस्थांचे निरीक्षण करण्यासाठी दौरा काढला. दौरा झाला आणि प्रत्येकाचे म्हणणे पडले की, या थोर व्यक्तींचे संवाद–परिसंवाद जर 'टेप' करून ह्या संस्थांतून दाखल झाले असते तर किती बहार उडाली असती. मिचेल, एहरलिचमन व हल्डमन यांनी तेवढीच कल्पना उचलली. त्यांनी विचार करून शेवटी निर्णय घेतला की, राष्ट्रपती निक्सन ह्यांचे प्रत्येक बोलणे व संवाद टेप करून ठेवून ते निक्सन फाऊंडेशनमध्ये एकत्रित ठेवले जावेत.

१६ फेब्रुवारी १९७१ ह्या दिवशी व्हाईट हाऊसच्या ओव्हलमधील निक्सन कार्यालयात व पुढे दोन महिन्यांनंतर एक्झिक्यूटिव्ह ऑफिस–बिल्डिंगमधील कार्यालयात गुप्तचर विभाग अधिकाऱ्याकडून 'टेप्स' काढण्याची यंत्रे बसविली गेली.

१८ मे १९७२ ला कॅम्प डेव्हिड व सा-क्लेमंटी येथील निक्सनच्या निवासस्थानी देखील ही योजना अंमलात आणण्यात आली.

फ्रेड बुझार्ट, निक्सनचा व्हाईट हाऊस कायदेकानू सल्लागार हा पहिल्यापासूनच ह्या टेप प्रकरणाशी निगडित होता. त्याने स्वतःला कोठेही गुंतून घेतले नव्हते; कारण त्याला परिस्थितीची पूर्ण कल्पना होती. टेप्सविषयी वर्णन करताना फ्रेड बुझार्टनी एके ठिकाणी सांगितले आहे.

'The voice–activated tapes were technical solutions to a human problem. They did not want to lose anything, as previous Presidents had done with Switch–system. As soon as the President entered the hideway the reels started with spining of the sound of the footsteps. They would pick up the squeaking of the pen, they would pick up the moving of the chair. When it was decided to have the tapes copied to be transcribed the secret assignment was given to the National Security Agency, with the superlation listening devises, cryptographic experience and audio technology.'

सगळयात आश्चर्याची गोष्ट म्हणजे निक्सनच्या मागोमाग १९७१ च्या मध्यापासून मिचेल, डीन, एहरलिचमन, कॉल्सन ह्या व्यक्तींनी देखील आपापल्या कार्यालयातून कोणाला पत्ता लागू न देता, तशाच प्रकारची टेप्स काढून घेण्याची यंत्रे बसवून घेतली,

१३ जून १९७१ पासून न्यूयॉर्क टाईम्सने अत्यंत गुप्त असलेले व्हिएटनाम युद्धावरील माहितीचे पेंटॅगॉन पेपर्स छापण्यास सुरुवात केली.

२३ जुलै १९७१ ला न्यूयॉर्क टाईम्सने आण्विक शस्त्रास्त्रांविषयींचा करार करण्यास रशिया तयार नाही, ही दुसरी अत्यंत महत्त्वाची गुप्त बातमी छापली.

३ सप्टेंबर १९७१ ला ज्याने पेंटॅगॉन पेपर्स पळविले त्या डॅनियल एल्सबर्गच्या डॉक्टरच्या निवासस्थानावर एहरलिचमनने सल्ला दिल्याप्रमाणे लिडीने घातलेला दरोडा–प्रकरण वॉशिंग्टन पोस्टने छापले.

९ डिसेंबर १९७१ ला वॉशिंग्टन पोस्टने फोडलेले आय. टी. टी. प्रकरणातील ४ लाख डॉलर्सच्या लाच देण्याचे प्रकरण आणि अखेरी...

२० डिसेंबर १९७१ ला बांगला देश निर्मिती प्रकरणात निक्सन व किसिंजर ह्यांची झालेली छी:थू व त्यावरील न्यूयॉर्कमधील गुप्त माहितीचे लेख.

जून १९७१ ते डिसेंबर १९७१ ह्या काळात वरील महत्त्वाच्या

घडलेल्या घटना व त्या घटनांना दिली गेलेली प्रसिद्धी ह्यामुळे निक्सन त्रासिक व अधिक संतापी बनला. टेप्स काढून ठेवण्यांची त्याची वृत्ती बळावत चालली.

नियतीचा हा नियमच आहे की, मनुष्य वेडेवाकडे कृत्य करावयास प्रवृत्त होऊ लागला की, ते झाकण्यासाठी तो अधिकाधिक वेडीवाकडी कृत्ये करीतच राहतो. ते कोठपर्यंत ? तर, त्याचा सर्वंकष नाश होईपर्यंत. कारण त्याचा बुद्धिभ्रंश झालेला असतो. तो अधिकाधिक वाह्यातासारखा वागावयास लागतो. तेच निक्सनचे झाले. CIA, FBI, ह्या जुन्या संस्थांच्या विषयी निक्सनला अविश्वास वाटू लागला आणि अस्सल बदमाशांची एक नवीनच संस्था 'Plumber's Unit' निर्माण करून त्याने स्वत:वरच एक आपत्ती ओढवून घेतली. तो उपद्व्याप म्हणजे माकडाच्या हातात कोलित दिल्याचाच एक प्रकार. क्रोम्, लिडी, हंट व यंग हे सगळीकडे आग लावत सुटले आणि त्यात अखेरी व्हाईट हाऊस देखील जमीनदोस्त झाले.

Power corrupts not only to those who abuse it but whole the Nation as well, when they tolerate this abuse.

१७ जून १९७२ ला पहाटे १॥ वाजता वॉटरगेट–दरोडा पडला. त्या दिवशी निक्सन वॉशिंग्टनमध्ये नव्हता. २० जूनला निक्सनने हल्डमनशी टेलिफोनवरून वॉटरगेट प्रकरणाची सर्व चौकशी केली. हे निक्सनचे टेलिफोनवरील बोलणे 'टेप' केले गेलेले होते व तो टेप जाणूनबुजून खोडखाड करून खराब केलेला असा निक्सनला जज्ज सिरियाकडे धाडावाच लागला आणि निक्सनने छी:थू करून घेतली. 'मला वॉटरगेट प्रकरण २१ मार्च १९७३ ला जॉन डीन-कडून कळले,' अशी सरळ थाप मारून निक्सन काढता पाय घेत होता, पण त्याला ते जमले नाही. कारण आडवे आले ते २० जून व २३ जूनचे दोन टेप्स. तेवीस जूनला तर निक्सनने मिचेलला सरळ सांगून टाकले की, सी. आय. ए. मार्फत एफ. बी. आय. ला ताबड-तोब कळविण्यात यावे की, वॉटरगेट दरोडा प्रकरणी अधिक चौकशी करू नये. तेव्हा हे प्रकरण २० जून किंवा जास्तीत जास्त २३ जूनला कळले असताना देखील वेड पांघरून पेडगावला जाण्याचाच निक्सनचा प्रकार चालला होता. २० जूनचा महत्त्वाचा टेप दडपून टाकण्यासाठी अनंत प्रकारच्या युक्त्या–प्रयुक्त्या निक्सनने केल्या. नको ती वक्तव्ये बाहेर पाडली आणि आपले हसे करून घेतले. ह्या प्रकरणात आपला हात नव्हता ना, मग सरळ २० तारखेलाच आपले वक्तव्य बाहेर पाडून खऱ्या गोष्टी जनतेसमोर ठेवावयाच्या. गुन्हे-गारांना न्यायालयात खेचावयाचे आणि राष्ट्रपतिपदाला काळिमा लागणार नाही, हे प्रथम पाहावयाचे. मिचेल, हल्डमन, एहरलिचमन, मॅगरूडर, डीन अशा बदमाश व्यक्तींना वाचविण्याचा तो जो जो प्रयत्न करू लागला, तो तो तेच बदमाश लाथेच्या ठोकरा मारीत त्यालाच तुडवीत होते.

गुन्हेगारांना पाठीशी घालून राज्ययंत्रणा कशी आणि किती वेळ टिकाव धरू शकणार ?

निक्सनला हे कळत नव्हते असे नाही. तो असामान्य बुद्धिमत्तेचा मनुष्य होता, परंतु बदमाशांच्या जाळ्यात पुरता अडकून गेला होता. वाईट व घातुक सवयीत गुरफटलेला होता. त्यांतील एक वाईट घृणास्पद सवय म्हणजे स्वत:च्या संवादांचे टेप्स काढून ठेवणे ही होय.

ह्या २० जून १९७२ च्या टेप्सची गंमत मोठी बहारीची झाली. ह्या टेप्सविषयी पुढे १४ नोव्हेंबर १९७३ ला जे वक्तव्य निक्सनने बाहेर काढले, त्यात तो म्हणतो –

First, there are no missing tapes. These are two conversations requested by the courts which WERE NOT RECORDED. The first is a four minute conversation with the former Attorney General John Mitchell on 20th June 1972. This conversation was NEVER RECORDED. In fact, there is no affirmative evidence o the contrary.

I believe that when the Court concludes its evaluation of the testimony and documentary evidence, public doubt on this issue will be completely & satisfactorily removed.

पुढे १७ नोव्हेंबर १९७३ च्या बातमीदारांच्या मेळाव्यात 'लुई-व्हिल कोरिअर–जर्नलच्या' जॉर्ज मिलने ह्या २० जून १९७२ च्या टेपविषयी प्रश्न विचारला असताना निक्सनने दुसरी थाप मारली.

With regard to the tape of 20th June 1972, it was a five minute telephone conversation with John Mitchell. On that particular day, I happended to have dictated a dictabelt for June 20th which I found, it has already been offercd to the courts and eventually it will be made public. It said that I called John Mitchell to cheer him up because I knew he was terribly disheartened by what had happened to the so called Watergate matter.'

वास्तविक इतर टेप्सबरोबर हा २० जून १९७२ चा टेप जॉन सिरिकाच्या कोर्टात येऊन पडला होता, पण तो ५ ठिकाणी खोडून टाकलेला होता. २७ नोव्हेंबर १९७३ ला निक्सनची सेक्रेटरी रोझ मेरी वुडस हिची सिरिकाच्या कोर्टात जबानी झाली. त्यात तिने सांगितले की, २० जूनचा टेप तिच्यापुढे जो कोर्टाने दाखविला, त्यावरील पाच मिनिटे बोलण्याचा मजकूर माझ्याकडून चुकभुलीने खोडला गेलेला होता. परंतु साडेअठरा मिनिटे झालेले बोलणे माझ्याकडून खोडले गेलेले नाही.

ह्या तिच्या बोलण्यावर जज्ज सिरिकाचा विश्वास बसला नाही व इतरांचा तर मुळीच नाही.

सगळे श्राद्ध उरकल्यानंतर निक्सनची भाषणे लिहून देणारा पॅट बुचानन पुढे, १९७४ सालात ह्या २० जूनच्या टेप्सविषयी म्हणाला,

## आता निक्सन जाळ्यात पूर्ण अडकला होता...

' रोझ मेरी वुडस हिला हे माहीत होते की, तिने स्वत: २० जूनचा टेप खोडून टाकला आहे. परंतु तिने ते घाणेरडे कृत्य केलें ते निक्सन-साठी केले. तिचा स्वत:चा त्यात काहीही स्वार्थ नव्हता.'

जज्ज सिरिकाने पाच Electronic Experts बोलावून घेऊन त्यांना तो २० जूनचा टेप तपासण्यासाठी दिला आणि ३० नोव्हें-बरला त्यांची जबानी सुरू झाली. पण त्या दिवशी कामकाज न होता १३ डिसेंबर १९७३ ला त्यांनी आपला अहवाल कोर्टापुढे ठेवला. त्यात त्यांनी सांगितले की, ' It is improbable that 18½ minute gap had accured when Rose Mery Woods transcribed the tape and the gaps are not probably retrievable.'

१८ जानेवारी १९७४ ला जज्ज सिरिकाने ह्या २० जूनच्या टेप्सविषयी सिनेटच्या ग्रॅन्ट ज्यूरीने संशोधन करावे असा निर्णय दिला. कारण वॉटरगेट गुन्ह्यातील पुरावा मारून टाकण्याचा वेगळाच गुन्हा एक किंवा अनेक व्यक्तींनी एकत्र येऊन केलेला असावा, असे त्यांचे म्हणणे पडले.

रोझ मेरी वुडसची जबानी झाल्यावर ओव्हल ऑफिसमध्ये निक्सन, डीन, एहरलिचमन, हल्डमन विचारविनिमय करण्यासाठी २ तास जमले होते व त्या बोलण्याच्या देखील टेप्स होतच होत्या !

दुसरा अत्यंत महत्वाचा ' टेप ' की, ज्यामुळे पुढे मोठे वादंग माजले तो २१ मार्च १९७३ चा टेप. ह्या दिवशी सकाळी १० वाजून १२ मिनिटे ते ११ वाजून ५५ मिनिटे निक्सन, डीन, हल्डमन ओव्हल ऑफिसमध्ये वॉटरगेट प्रकरणाचा खल करीत बसले होते. डीन निक्सनला म्हणाला, ' There is cancer growing on the Presidency ' आणि त्याने नंतर हळूहळू मिचेल, हल्डमन, स्ट्रेचेन कामबाच, मॅगरूडर आणि आपण स्वत: वॉटरगेट प्रकरणात कोणता भाग घेतला होता व नंतर गुन्हा दडवून टाकण्यासाठी काय काय कृत्ये केली, हे निक्सनला स्पष्टपणे सांगून टाकले.

१७ मार्च १९७३ ते २६ मार्च १९७३ हे दहा दिवस निक्सनच्या कारकीर्दीत अत्यंत चमत्कारिकपणे गेले. त्याला कल्पना नव्हती अशा विचित्र व भीतिदायक घटना घडल्या.

१३ मार्च ह्या दिवशी सिनेट ज्युडिशिअरी कमिटीने डीनवर समन्स काढून त्याला साक्षीसाठी बोलाविले.

डीनने नकार दिला. Executive Privilege हा मुद्दा उपस्थित करून निक्सनने न्यायालयात जाऊन हे प्रकरण हाताळावे, असा त्याने सल्ला दिला.

बातमीदारांच्या प्रश्नाला उत्तरे देताना १५ मार्चला निक्सनने सांगितले, ' Break-in was the espionage by one Political organization againsr another. The Senate Committee has no authority to subpoena Dean, because there is executive privilege, and lawyer-client relationship.'

दुसऱ्याच दिवशी टी. व्ही. वर Meet the Press ह्या कार्यक्रमात सिनेटर एर्विन म्हणाला की, सिनेट कमिटीला कोणालाही, केव्हाही व कोणत्याही कारणासाठी कमिटीपुढे साक्ष देण्यासाठी बोलावण्याचा अधिकार असून वेळकाळ पडली तर अमेरिकेच्या राष्ट्रपतीला देखील बोलावण्यात येईल व त्याला यावेच लागेल. कमिटीपुढे साक्ष देण्यासाठी जर कोणी नकार दिला व सबबी सांगावयास लागला तर त्याला बेड्या घालण्यात येऊन पोलिसांच्या ताब्यात देण्यात येईल.

१९ मार्च ह्या दिवशी हंट याने डीनकडे ' चूप बसण्यासाठी लाच ' ह्या सदराखाली १ लाख २० हजार डॉलर्सची रक्कम मागितली, आणि जर रक्कम २२ तारखेच्या आत दिली गेली नाही तर जज्ज सिरिकाच्या न्यायालयात तो वॉटरगेट-प्रकरण उघडे करून सांगील, अशी धमकी दिली.

१९ मार्चला वॉटरगेट प्रकरणातील एक आरोपी मॅकॉर्ड ह्याने जज्ज सिरिकाला पत्र लिहून कळविले की, आपण न्यायालयापुढे सर्व सत्य हकीकत सांगायला तयार आहोत; ते पत्र २३ मार्चला कोर्टाने वकिलाला दाखविले.

वरील सांगितलेला २१ मार्चचा टेप ह्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा, कारण सकाळी डीन-निक्सन गाठ झाली, त्यात हे सर्व बोलणे झाले व दुपारी ७५००० डॉलर्स हंटच्या वकिलाकडे पोहोचते झाले.

आणि इतके असून देखील निक्सन पुन्हा पुन्हा मुलाखती देत होता, टेलिव्हिजनवर भाषणे करीत होता, वक्तव्ये बाहेर फेकीत होता. त्याचे सांगणे एकच !

' I am not a Crook ! I am an honest man !'

मी काही लुच्चा-लफंगा नाही ! अत्यंत सचोटीचा मी माणूस आहे !

वारे वा अमेरिकेचा ३७ वा राष्ट्रपती !

७५००० डॉलर्स हंटला पोहोचते झाले, बाकीच्यांची तोंडे बंद करून टाकली, आता घाबरण्याचे कारण मुळीच नाही, असे सांगून निक्सनची स्वारी शीण घालविण्यासाठी गुरुवारी २२ मार्चला संध्याकाळच्या विमानाने फ्लोरिडामधील की-बिस्कायनें येथे निघून गेली.

एक आठवड्याची अखेर सा-क्लेमंटी आणि दुसऱ्या आठवड्याची अखेर की-बिस्कायनें असे निक्सनचे हवा खाण्याचे प्रकार चालूच होते. तो २६ मार्चला वॉशिंग्टनला परतला आणि जेब मॅगरूडरचे निवेदन वाचनात आले.

जेब मॅगरूडरने आपल्या जागेचा राजीनामा दिला आणि व्हाईट हाऊसला रामराम ठोकला.

३० मार्चला निक्सन सा-क्लेमंटी येथे, गरम झालेले डोके थंड करण्यासाठी गेला तो ८ एप्रिलला वॉशिंग्टनला परतला. तो त्याला सर्व ठिकाणी आगीचा डोंब उसळल्याचे दृष्टीस पडले.

त्याला समजले की, डीन फुटला आणि तो २ एप्रिलपासून सरकारी वकिलांच्याकडे आपली सर्व हकीकत सांगू लागला. ८ एप्रिल-पर्यंत त्याने निक्सन, हल्डमन, मिचेल, एहरलिचमन ह्यांच्या पाप-कर्मांचा पाढा वाचून आपले आख्यान संपविले. १४ एप्रिलपर्यंत मॅगरूडर आपली हकीकत सरकारी वकिलांना सांगतच होता.

आताच्या घटकेला वॉटरगेट प्रकरण उरलेच नव्हते. गुन्हा कोण व कसा दडपून ठेवीत होता, त्याची छाननी चालू होती.

थोडक्यात म्हणजे डीन व मॅगरूडर यांनी निक्सन – हल्डमन – मिचेल – एहरलिचमन – कामबाच – क्रोन – मर्डियन – स्टान्स – स्ट्रेचेन – ह्या सर्वांचा ' राम बोलो – भाई – राम ' करावयास सुरुवात केली.

१४ एप्रिल १९७३ च्या दिवशी सकाळी ११·२२ ला एहर-

लिचमनबरोबर झालेल्या निक्सनच्या टेलिफोन – संभाषणाचा जो टेप बाहेर पडला आहे, त्यात निक्सन म्हणतो —

'I do not wish to see the Presidency tarnished but at the same time. I am the law-enforcement man'.

एहरलिचमन ह्यांच्याबरोबर १५ एप्रिलला निक्सन टेलिफोन वरून जे बोलत होता ते पाहा –

निक्सन : बॉबी, सबंध रात्रभर जवळजवळ मी अंथरुणावर तळमळत पडलो होतो. माझ्या डोळ्यापुढे सारखे न्यायालयातील ते अडथळे, त्या व्यक्ती, जणू काय पिंगा घालीत होत्या. पुष्कळच व्यक्ती ह्यांच्यात अडकल्या जाणार आहेत नाही ......

एहरलिचमन : होय ना !

निक्सन : चॅपिन.

एहरलिचमन : बरोबर.

निक्सन : मिचेल.

एहरलिचमन : बरोबर.

निक्सन : मॅगरूडर – डीन – मर्डिमन – ला रु....

एहरलिचमन : अगदी बरोबर.

निक्सन : हंट – गोल्ड बॉट – बिटमन.

एहरलिचमन : तो गोल्ड बॉट नव्हे साहेब. रोथबॉल्ट वकील. तो तर खासच.

निक्सन : हो हो, बरोबर, रोथबॉल्ट !

एहरलिचमन : पण बिटमन आपल्या विरुद्ध जबानी देईल असे नाही मला वाटत.

निक्सन : नाही, तसे नाही. न्यायदानात अडथळा प्रकरणात त्याला गुंतविलाच पाहिजे.

टेप्सवरील हे संभाषण निक्सनच्या क्षुद्र मनोवृत्तीचे यथातथ्य चित्रण आहे.

१६ एप्रिलच्या सकाळच्या बैठकीत निक्सन – हल्डमन – एहरलिचमन ह्यांच्यात असे ठरले की, डीनकडून नोकरीच्या राजीनाम्याची २ निरनिराळी पत्रे लिहून घ्यावीत. एक चालू तारखेचे, एक बिनतारखेचे. सकाळी ९-५९ ला निक्सनच्या चेंबरमधून हल्डमन-एहरलिचमन निघून गेले. काही मिनिटांतच डीन तेथे आला. त्यांच्यातील झालेल्या संवादाचा टेप न्यायालयात प्रविष्ट झाला होता.

दोन निरनिराळी पत्रे लिहून देण्यास डीनने नकार दिला.

'खोटे बोलू नका – खरं काय ते एकदाच सांगून टाका.'

निक्सन हा मानभावीपणाचा उपदेश करण्यात बाकबगार अन् तरबेज होता. डीनला तो उपदेशाचे घुटके पाजत होता, त्यातील एक नमुना.

'Thank God ! Dont ever do it John. Tell the truth. That is the this thing I have told everybody around here. You know Hiss would be free today if he had not lied. If he had said, 'yes, I know Chambers and as a young man I was involved with communist authorities but I broke it off a number of years ago.'

'If you are going to lie-you go to jail for the lie rather than the crime. So believe me, you don't lie.'

दुसऱ्याला खोटे बोलू नका, खरं काय ते सांगून टाका, हा उपदेश करण्यात निक्सन अत्यंत चतुर होता. डीन उलटया काळजाचा मनुष्य नव्हता म्हणून ठीक, नाहीतर त्याने जर २० जून १९७२ ची हल्डमन-मिचेलबरोबरची निक्सनची बैठक, निरनिराळ्या वेळी दिली-घेतलेली लाच–प्रकरणे ह्याच्या अगोदर उघडी करून टाकली असती तर निक्सनचा केव्हाच केरकचरा झाला असता. पण तो थांबला.

१५ जूनचा दिवस उजाडला. निक्सनची बेचैनी वाढतच चालली. तो पूर्ण गांगरला. ह्या एकच दिवसाच्या हकीकतीचे एकंदर ९ टेप्स पुढे जज्ज सिरिकाच्या न्यायालयात दाखल झाले, त्यावरून निक्सनच्या मनाचा तोल कसा सुटत चालला होता, हे स्पष्ट दिसते.

पहिली बैठक सकाळी १० – ३५ ते ११ – १५
निक्सन – एहरलिचमन
दुसरी बैठक दुपारी १ – १२ ते २ – २२
निक्सन – क्लेंडिन्स्ट.
पहिला टेलिफोन दुपारी ३ – २७ ते ३ – ४०
निक्सनचा हल्डमनला.
दुसरा टेलिफोन दुपारी ३ – ४८ ते ३ – ५९
निक्सनचा क्लेंडिन्स्टला.
तिसरा टेलिफोन दुपारी ४ – ३७ ते ४ – ४५
निक्सनचा हल्डमनला.
चवथा टेलिफोन रात्री ८ – ०४ ते ८ १०
निक्सनचा पॅटरसनला.
पाचवा टेलिफोन रात्री ८ – ३३ ते ८ – ४६
निक्सनचा पॅटर्सनला.
सहावा टेलिफोन रात्री ९ – ३८ ते ९ – ४१
निक्सनचा पॅटर्सनला.
सातवा टेलिफोन रात्री ११ – ४५ ते ११ – ५३
निक्सनचा पॅटर्सनला.

गुन्हेगार मनुष्य जितका अधिक बेचैन तितका तो सैरावैरा धावत असतो. अविचारीपणाचे चाळे करीत राहतो. आपण होऊन दुसऱ्यांना सारखे टेलिफोन करीत असतो. आपलेच म्हणणे दुसऱ्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करीत असतो.

परंतु त्याचा काहीच उपयोग होत नाही, हा व्यवहारातला सिद्धान्त आहे.

१९७३ मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात डीन व मॅगरूडर फुटले त्यावेळेपर्यंत 'टेप्स' ची भानगड, जज्ज सिरिका किंवा सिनेट कमिटीला मुळीच माहीत नव्हती. पत्ता लागला तो १६ जुलै १९७३ ह्या दिवशी बटरफिल्डनी न्यायालयात विधान केले त्यावेळी. तेव्हा खरो-

## १५ जूनला निक्सनची मनःस्थिती कशी होती ?

खरीच जर निक्सन हुशार व चतुर असता तर त्याने डीनची साक्ष झाल्याबरोबर सगळे टेप्स नाश करून टाकले असते व प्रकरण वाढू दिले नसते. 'टेप्स' मुळेच सर्व घाण उपसली गेली आणि ती लक्तरे स्वतःच्या डोळ्यांनी निक्सनला पाहावी लागली. डीन काय, मॅगरूडर काय किंवा इतर कोणी – ह्यांच्या नुसत्या बोलण्यावर न्यायालयांनी विश्वास ठेवला नसता, कारण विवक्षित दिवशी निक्सनशी बोलणे काय झाले होते ह्याचा लिखित पुरावा कोठेच नव्हता. टेप्समुळे तो भक्कम पुरावा न्यायालयात येऊन दाखल झाला.

रोज गाठीभेटी चालल्याच होत्या. पण हल्डमन, एहरलिचमन, मिचेल निक्सनपासून आता दूरदूर सरकत होते. त्यांच्यातील मन-मोकळेपणा पार निघून गेला होता. त्यांचे चेहेरे काळवंडलेले होते. चित्तात अस्थिरता आलेली होती. कामाकडे ध्यान नव्हते. नवीन दिवस उजाडला की, नवीन काहीतरी वाईटसाईट बातमी ऐकावयास मिळणार ह्या विवंचनेत सगळेजण होते.

२७ एप्रिल शुक्रवार उगवला. निक्सनला कोठून तरी सकाळीच वर्दी लागली की, एक–दोन दिवसांत New York Times डीनची साक्ष छापणार असून, डीनने आपल्या जबानीत सर्वांत मोठा वॉटर-गेट–गुन्हेगार निक्सन असे स्पष्टपणे सांगितलेले आहे.

ते ऐकल्यावर निक्सनचे कंबरडेच मोडले. दुय्यम अॅटर्नी जनरल हेरी पॅटर्सन ह्याला बातमी खरी की खोटी हे तपासून घेण्यास धाडले. पॅटर्सन हा देखील एक लुच्चाच प्राणी. तो गेला आणि अर्ध्या तासाने परत आला. त्याने अर्धे खरे–अर्धे खोटे व बनावट निक्सनला सांगितले.

जाजावलेल्या मनःस्थितीत निक्सन त्याला म्हणाला.–

"If there is one thing you got to do, you have got to maintain Presidency out of this. I have got many things to do for this country and I am not going to have...... now ... ... this is personal..... I sometimes feel like ...... I would like to resign. Let Agnew be President for a while. He would look it."

आपण अमेरिकेचे ३७ वे राष्ट्रपती आहोत, आपण कोणाजवळ काय बोलतो आहोत, कसे बोलतो आहोत, आपल्या बोलण्याचा 'टेप' होतो आहे, हे निक्सन पूर्णपणे विसरला. तो बरळतच सुटला.

शनिवार २८ एप्रिलला सर्वजण निक्सन, गार्मेंट, रोजर्स, रे, प्राइस, रोझ मेरी वुडस, हल्डमन, एहरलिचमन कॅम्प डेव्हिडला विचारविनिमयासाठी निघून गेले. वॉरेल लॉजमध्ये गार्मेंट आणि प्राइस हे उतरले व बाकीच्यांनी अॅस्वेन लॉजमध्ये तंबू ठोकला.

सोमवारी वॉशिंग्टनला परत आल्यावर कॅम्प डेव्हिडला ठरविल्या-प्रमाणे निक्सनने हल्डमन, एहरलिचमन व क्लेंडिन्स्ट ह्यांच्याकडून आपल्या पदांचे राजीनामे लिहून घेतले आणि डीनला कामावरून काढून टाकण्याची घोषणा केली.

सोमवारी ३० एप्रिलला निक्सनने राष्ट्राला उद्देशून टी. व्ही. वर भाषण केले. ते अत्यंत महत्त्वाचे झाले. त्यात निक्सनने सरळ सरळ कबुली दिली. त्यांच्या हाताखालच्या व्यक्तींनी जे जे केले होते ते ते त्यांना त्या त्या वेळी योग्य वाटले म्हणून केले. वॉटरगेट प्रकरणाची हकीकत आपल्याला पहिल्या प्रथम २१ मार्च १९७३ ह्या दिवशी कळली. त्यात व्हाइट हाऊसमधील काही व्यक्ती निगडित होत्या, हे ध्यानात आल्यानंतर मी त्यावर आता रीतसर उपाय करणार आहेच.

हे वक्तव्य निखालस खोटे, कारण २० जून १९७२ चा जाणून-बुजून खराब करून ठेवलेला १८½ मिनिटांचा टेप हेच दर्शवितो की, १७ जूनचे वॉटरगेट प्रकरण त्याच्या हाताखालच्या व्यक्तींनी २० जूनलाच त्याच्या कानावर घातले होते. आणि समजूनउमजून व्हाइट हाऊसमधील दोषी व्यक्ती तो पाठीशी घालीत होता. २० जून ७२ ते ३० एप्रिल १९७३ पर्यंत त्याचे डावपेच चालूच होते. पण केवळ जनता आणि जबाबदार वर्तमानपत्रे त्याच्यावर एकसारखा मारा करीत होती, म्हणूनच उशीरा का होईना, पण सर्व भानगडी बाहेर पडल्या आणि व्हाईट हाऊसमधील सर्वांच्या सर्व गुन्हेगार प्लेगच्या उंदराची लागण व्हावी, तसे टपटप जमिनीवर कोसळून पडले.

आणि अशा प्रकारच्या निक्सनच्या कारवाया चालत असतानाच ह्या प्रकरणाच्या सुरुवातीला लिहिल्याप्रमाणे १६ जुलै १९७३ ला बटरफील्डने पहिला प्रभावी बॉम्ब टाकला. व्हाईट हाऊस हादरून गेले.

बटरफील्डने हे गुपित उघडे केले मात्र, ताबडतोब दुसऱ्याच दिवशी स्पेशल प्रॉसिक्युटर आर्चिबाल्ड कॉक्स ह्याने निक्सनला खास पत्र पाठवून सर्व टेप्स त्याच्याकडे पाठवून देण्याची व्यवस्था करण्यास सांगितले.

आणि एर्विन कमिटीने देखील ताबडतोब व्हाईट हाऊसमध्ये टेप्स हजर करण्याची मागणी केली.

२३ जुलै १९७३ ला निक्सनने दोघांचीही मागणी धुडकावून लावली.

२४ जुलैला ज्या ज्या ठिकाणी व्हाईट हाऊसमध्ये टेप्स काढण्याची व्यवस्था होती ती बंद केली गेली. २५ जुलैला निक्सनने जज्ज सिरिकाला कळविले की, वॉटरगेट स्पेशल प्रॉसिक्युटर आर्चिबाल्ड कॉक्स ह्यांच्या मागणीनुसार टेप धाडता येणार नाहीत. कारण फक्त त्याने एवढेच दिले, "It will Jeoparedise the independence of the three branches of Gorenment."

कॉक्सने ताबडतोब जज्ज सिरिकाकडून हुकूम घेतला की, निक्सन टेप्स का देता येत नाहीत ह्याची कारणे ७ ऑगस्टपूर्वी दाखल करावीत. ७ ऑगस्टला निक्सनच्या वकिलांनी निक्सनची ३२ पाने कैफियत दाखल केली.

९ ऑगस्टला एर्विन कमिटी वॉशिंग्टनमधील फेडरल कोर्टाकडे निक्सनला त्यांच्यापुढे सर्व टेप्स दाखल करण्यासंबंधी हुकूम मिळविण्याचा अर्ज करते. २९ ऑगस्टला जज्ज सिरिकाने निकाल दिला की, निक्सनच्या वकिलांनी त्यांच्या कोर्टात टेप्स हजर करून तो ते स्वतः ऐकेल व योग्य वाटले तरच एर्विन कमिटीकडे पाठविण्याचा हुकूम देईल, नाहीतर ते परत केले जातील. व्हाईट हाऊसने नकार दिला व जज्ज सिरिकाच्या हुकुमावर ६ सप्टेंबरला अपील केले. अपिलात मुख्य मुद्दा हाच घेतला गेला होता की, राष्ट्रपती निक्सनने काढून ठेवलेले टेप्स हे खाजगी संभाषणाचे असल्या कारणाने न्यायालयाला ते मागण्याचा अधिकार नाही.

मिळतेजुळते घेण्याच्या दृष्टीने अपेलेट कोर्टाच्या सातही न्याया-

घीशांनी असे सुचविले की, कॉक्स, राइट व निक्सन ह्यांनी एकत्र बसून कोणते टेप्स ज्यूरीपुढे ध्यावयाचे हे ठरविल्यास मार्ग सुकर होईल.

निक्सन हट्टाला पेटला. त्याही सूचनेला त्याने नकार दिला. अखेर १२ ऑक्टोबरला सातही जज्जांनी निर्णय दिला की, निक्सनने जज्ज सिरिकांच्या हुकुमाप्रमाणे ताबडतोब त्यांच्या न्यायालयात मागितलेले टेप्स दाखल करावेत.

१९ ऑक्टोबरला निक्सनने आपल्या वकिलांच्या मार्फत कोर्टापुढे कैफियत दिली की, मूळ टेप्स न देता त्याचा सारांश सादर केला जाईल. कॉक्सने पूर्ण नापसंती दर्शविली. मूळ टेप्स कोर्टापुढे सादर केले गेलेच पाहिजेत हे त्याचे म्हणणे होते.

१९ ला च रात्री ८ वाजून १५ मिनिटांनी निक्सनने वक्तव्य बाहेर पाडले. 'सरकारी अंमलबजावणी खात्याचा एक नोकर ह्या नात्याने अर्चिबाल्ट कॉक्स हा न्यायालयातून काम पाहत आहे. हे ध्यानांत घेता मी असे म्हणतो की, माझ्या संभाषणाचे टेप्स मागण्याचा त्याला कोणताही अधिकार नाही व त्याने तसा प्रयत्न करू नये हे उत्तम.'

'घटनाबाह्य असे वर्तन माझ्याकडून मुळीच झालेले नाही व मी प्रत्येक गोष्ट ही घटनेला धरूनच करीत असतो.'

वर्तमानपत्रांतून वक्तव्याला फार मोठी प्रसिद्धी दिली गेली. वॉशिंग्टन पोस्टचा वार्ताहार कॉक्सला भेटला. त्याच्याजवळ कॉक्स चिडून म्हणाला : 'कोर्टाचा हुकूम मानला गेला पाहिजे, मग ती व्यक्ती कोणी का असेना!'

शनिवार दिनांक २० ऑक्टोबर १९७३. ह्या दिवशी व्हाईट हाऊसमध्ये निक्सनने कत्तलखाना उघडला.

परस्पर काटा काढावयाचा, हे निक्सनचे नेहमीचेच धोरण. त्यात तो अगदी दर्दी. वॉटरगेट स्पेशल कौन्सिल अर्चिबाल्ट कॉक्स ह्यालाच डच्चू द्यावयाचा निक्सनने ठरविले. पण ते त्याचे काम नव्हते. त्याला काढावयाचे म्हणजे अॅटर्नी जनरलनेच ते करावयाचे. निक्सनने रीचर्डसनला बोलावून घेऊन कॉक्सला काढून टाकण्यासंबंधी त्याला सांगितले. विचार करतो म्हणून सांगून तो निघून गेला. दुय्यम अॅटर्नी जनरल वुइल्यम रूकेलशॉस ह्याला बोलावून घेऊन निक्सनने तो मुख्य अॅटर्नी जनरल राहण्यास तयार होईल किंवा कसे ह्याचा अंदाज घेतला. दरम्यानच्या काळात रीचर्डसनला रूकेलशॉस भेटला. रीचर्डसनने सर्व हकीकत त्याच्या कानावर घातली. दोघांनीही आपल्या पदाचा राजीनामा देण्याचे ठरविले. काही वेळाने रीचर्डसनने निक्सनला टेलिफोनवरून आपणास कॉक्सच्या बाबतीत काही करता येणार नाही म्हणून कळविले आणि आपला राजीनामा धाडला.

निक्सनने रूकेलशॉस ह्याला अॅटर्नी जनरल केला व त्याला कॉक्सला काढून टाकण्यास सांगितले. त्यानेही आपल्या पदाचा राजीनामा दिला.

रिचर्डसन गेला. रूकेलशॉस गेला : निक्सनने Solicitor-General रॉबर्ट बोर्थ ह्याला काही दिवस अॅटर्नी जनरलचे पद सांभाळण्यास सांगितले. त्यांनी ते मान्य केले.

काही वेळाने निक्सनने बोर्थला आपल्या अधिकारात कॉक्सला कामावरून काढण्यास सांगितले.

बोर्थने त्यांचे म्हणणे ऐकले व कॉक्सला काढून टाकले.

एफ. बी. आय. ने ताबडतोब कॉक्सच्या चेंबरचा ताबा घेतला व चेंबर आणि कार्यालयाला सिले ठोकली व पहारा बसविला.

सर्व जगभर कॉक्स प्रकरण दुसऱ्या दिवशीच माहीत झाले. वर्तमानपत्रे निक्सनवर तुटून पडली.

२२ ऑक्टोबरला कॉक्सच्या जागी पेटर्सनची नेमणूक करण्यात आली. ९ टेप्स कोर्टात हजर करावयाचे, त्यापैकी २० जून १९७२ व १५ एप्रिल १९७३ चे टेप्स सापडत नसल्याचे बुझार्टनी कोर्टाला कळविले.

दुसऱ्याच दिवशी निक्सनने सिनेटर सॅक्सबी ह्याला अॅटर्नी जनरल पदावर नेमले आणि वॉटरगेट स्पेशल प्रॉसिक्युटर म्हणून हुस्टनचा वकील लिऑन जोव्हॉस्की ह्याची नेमणूक केली.

रशियाहून नुकताच परतलेला किसिंजर दुःखित अंतःकरणाने उद्गारला...

'There must be a real dirt on tapes, and so Nixon is fighting very hard.'

१९ डिसेंबर १९७३ ला व्हाईट हाऊसकडे एकंदर पाचशेच्या वर काढून ठेवलेल्या टेप्सची मागणी एरव्हिन कमिटीने केली. निक्सनने ५ जानेवारी १९७४ ला उत्तर दिले.

'I refuse to camply with the demand of fiive hundred tapes as they would enguestion ably destroy any vestige of confidentiality of Presidential communications.'

जज्ज सिरिकांनी २० जून १९७२ च्या टेपविषयी पाच तज्ज्ञांची कमिटी नेमली होती; तिने आपले म्हणणे कोर्टापुढे सादर केले. त्यात म्हटले होते की, ह्या टेपवर पाच निरनिराळ्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जाणूनबुजून हेतुपुरस्सर खाडाखोड केलेली असून त्याच्यावर Re–recoading केलेले स्पष्ट दिसत आहे; असे आढळून आले. हे मत प्रदर्शित केल्यावर जज्ज सिरिकाने आपल्या अधिकारात निराळे २२ टेप तपासण्यासाठी त्या पाच तज्ज्ञांच्या कमिटीकडे सोपविले.

६ मार्च १९७४ ला निक्सनने कबुलीजबाब दिला. त्याने स्पष्टपणे निवेदन केले.

'The tape of 21st March 1973, discussion with Haldeman and Dean might imply that I considered promises of elemency for Watergate defendents or authorised the payment for hush money.'

## २० ऑक्टोबरला व्हाईट हाऊसमध्ये निक्सनने कत्तलखाना उघडला

मागितलेले टेप्स न देता ह्या मुदतीमध्ये निक्सन त्या निरनिराळ्या टेप्सच्या नकला करून घेण्यात गुंतला होता.

२९ एप्रिलला निक्सनने सर्व टेप्सवरील मजकुराची छापून घेतलेली १३०८ पाने एर्विन कमिटीकडे धाडली. अशी छापलेली पाने किंवा नकला चालणार नाहीत, मूळ टेप्स हजर केले पाहिजेत असे कमिटीने सांगितले. मे १९७४ धामधुमीतच गेला, कारण निक्सन परदेशगमनाच्या तयारीत होता.

ठरल्याप्रमाणे १० जून ते १९ जून निक्सन मध्यपूर्वेत दौरा करून आला व पुन: २५ जून ते ३ जुलै त्याचा रशियामध्ये दौरा झाला.

२४ जुलै १९७४ ला टेप्स हजर करण्यासंबंधी सुप्रीम कोर्टाने निक्सनवर हुकूम बजावला.

सर्व टेप्स पाच ऑगस्ट १९७४ ला कमिटीकडे पाठवले गेले. आणि ८ ऑगस्ट १९७४ रोजी निक्सनने आपल्या पदाचा राजीनामा दिला.

खून झालेल्या राष्ट्रपती केनेडीचा भाऊ टेड केनेडी, ह्याचे ज्या वेळी चप्पाक्विडिक प्रकरण झाले, त्यावेळी निक्सन म्हणाला होता : 'A man is not finished when he is defeated; He is finished when he quits.' स्वत: पदत्याग करून निक्सनने वरील म्हणणे आपल्याच वागण्याने सिद्ध करून दिले!

सा-क्लेमंटी येथे निक्सनने 'निक्सन फाऊंडेशन' ही संस्था सप्टेंबर १९६९ मध्ये स्थापन करून ठेवली. विश्वस्त मंडळ नेमले. इच्छा ही की, आपले सर्व कागदपत्र, टेप्स व इतर वस्तू त्या ठिकाणी ठेवल्या जाव्यात. फाऊंडेशनमध्ये ह्या वस्तू जमा झाल्या नाहीत तर सिनेटच्या ज्युडिशिअरी कमिटीच्या ताब्यात राहिल्या व पुढेही त्या वस्तूंना फाऊंडेशनमध्ये स्थान मिळणे कठीण आहे!

दैव विचित्र असते हेच खरं! त्याच्यापुढे कोणाला जाता येत नाही! □

# प्रकरण पंधरा । बेअब्रू आणि राजीनामा

१९७३ चा जुलै महिना. साधारणत: नेहमीच ह्या महिन्यात अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन येथील हवा फारच लोभनीय असते. ना उकाडा, ना थंडी, मधूनच झुळझुळ वाहणारा वारा, पावसाच्या तुरळक सरी, कधी लख्ख सूर्यप्रकाश, तर कधी ढगाआडून सूर्याचा अंधुक प्रकाश.

बाहेरील हवा उत्तम, परंतु व्हाईट हाऊसमधील हवा मात्र अगदी एकदम गरम झालेली होती.

नुकताच कम्युनिस्ट पक्षाचा ब्रेझनेव्ह अमेरिकेला भेट देऊन गेलेला. वातावरण काही दिवस शांत होते, पण १६ जुलैला बटरफील्डने जहरी बॉम्ब टाकला आणि व्हाईट हाऊस हादरले.

मॅसॅच्युसेटसमधून निवडून आलेला डेमोक्रेट काँग्रेसमन रॉबर्ट ड्रीनान ह्याने पहिल्या प्रथम ठराव मांडून, भयंकर गुन्हे केल्याबद्दल शासन का करू नये, अशा तऱ्हेची निक्सनवर नोटीस पाठवावी, अशी मागणी केली.

१ ऑगस्टला जपानचा पंतप्रधान काकेव्ही टनाका ह्याचे व्हाईट हाऊसच्या हिरवळीवर स्वागत करताना निक्सन म्हणाला : प्रत्येक देशातच अगदी किरकोळ स्वरूपाच्या गोष्टीला प्राधान्य देऊन, महत्त्वाच्या बाबी दूर सारल्या जातात, हे खरे म्हणजे अतिशय वाईट व असमर्थनीय आहे. आपण दोघेजण मात्र जगाची नवीन घडण कशी बसवावयाची व त्याला भव्य मूर्त स्वरूप कसे द्यावयाचे, ह्याचाच फक्त विचार करू या.

जपानच्या पंतप्रधानांनी मंद हास्य करून संमती दर्शविली. जणू काय अमेरिकेतील जगभर डंका पिटीत राहिलेले वॉटरगेट प्रकरण त्यांच्या कानावर गेले नव्हते. ह्याच वेळी दोन्ही राष्ट्रांत लॉकहीड लाच प्रकरणे भरमसाठ मोठ्या प्रमाणावर चाललेली होती व ती पंतप्रधान टनाका ह्यांच्या पूर्ण परिचयाची होती. जपानमधील ते एक वॉटरगेटच होते. प्रकरण दडपून टाकण्याचा दोन्ही देशांकडून अट्टाहासाने प्रयत्न चालू होता. १९७५ च्या अखेरपासून प्रकरण रंगत चालले. धरपकडी सुरू झाल्या आणि काहींनी गळफास लावून आत्महत्त्या केली. पंतप्रधानांनी राजीनामा द्यावा, म्हणून वर्तमानपत्रे धारेवर धरू लागली. सर्व ठिकाणी जाहीर फलक फडकू लागले. १९७६ मध्ये जपानच्या पंतप्रधानांना लॉकहीड प्रकरणात लाच खाल्ल्याबद्दल न्यायालयात खेचण्यात आले व तो खटला चालू आहे.

वा रे वा राष्ट्रपती अन् वा रे वा पंतप्रधान!

राष्ट्रपती म्हणून निक्सनची कारकीर्द ५ वर्षे ५ महिने आणि १८ दिवस झाली. ही कारकीर्द म्हणजे एक भीषण अन् महाभयंकर नाटचच होते. ह्या नाटचातील प्रमुख खलनायक राष्ट्रपती निक्सन आणि त्याचे गुन्हेगार हस्तक एकंदर पंधरा.

| | |
|---|---|
| १. जॉन एहरलिचमन | व्हाईट हाऊस गृहखाते सांभाळणारा मंत्री. |
| २. एच. आर. हल्डमन | व्हाईट हाऊस चीफ ऑफ स्टाफ. |
| ३. जॉन मिचेल | अॅटर्नी जनरल. |
| ४. चार्लस कॉल्सन | निक्सनचा कायदे-सल्लागार. |
| ५. हर्बर्ट कामबाच | निक्सनचा वकील व निक्सन निवडणूक मंडळ-सभासद. |
| ६. अलेक्झांडर बटरफील्ड | निक्सनचा एक सेक्रेटरी व हल्डमनचा हस्तक. |
| ७. ड्वाईट चॅपीन | व्हाईट हाऊस नेमणुका करणारी व्यक्ती. |
| ८. एजिल क्रोग | गृहखाते सचिव. |
| ९. गॉर्डन लिडी | निक्सन निवडणूक मंडळ अधिकारी. |
| १०. डोनॉल्ड सिग्रेटी | निक्सनचा वकील. |
| ११. जॉन डीन | निक्सनचा वकील. |
| १२. हॉवर्ड हंट | व्हाईट हाऊस सल्लागार, सी. आय. ए. एजंट. |

१३. चार्लस कॉल्सन — निक्सनचा वकील.
१४. जेब मॅगरूडर — डायरेक्टर, दळणवळण खाते, व्हाईट हाऊस.
१५. मॉरिस स्टॉन्स — सेक्रेटरी, व्यापार खाते.

१९६८ ते १९७३ ह्या पाच वर्षांच्या काळात ह्या पंधरा व्यक्तींनी अमेरिकेच्या राजकारणात इतका बेसुमार धुमाकूळ घातला व निक्सनच्या भोवती इतक्या गुंतागुंतीची खेकटी निर्माण करून ठेवली की, निक्सनला त्या भोवऱ्यातून बाहेर पडणे कठीण होऊन बसले.

'प्रिन्स 'मध्ये मॅचिव्हेली म्हणतो...

'The first impression that one gets of of a Ruler and of his brain is from seeing the men around him.'

राज्यकर्त्याची लायकी ठरविण्याचे गमक म्हणजे त्यांनी आपल्या हाताखाली नेमलेले जबाबदार लोक.

एहरलिचमन, मिचेल, हल्डमन व डीन ह्या अट्टल बदमाशांच्या कैचीत सापडलेला निक्सन स्वभावाने उमदा व धडाडीचा असूनसुद्धा त्यांच्या जाळ्यात अडकला. त्याचे सर्व सामर्थ्य लुळे पडले. अत्यंत सावकाशपणे व हळूहळू ह्या भोवतालच्या वर्तुळाने अशा काही कौशल्याने निक्सनचा गळा आवळला की, त्याचे त्याला देखील ते कळले नाही.

१९६९ ते १९७२ ह्या चार वर्षांतील निक्सनची राजवट इतकी गलिच्छ व घृणास्पद होती की, दुसऱ्यांदा राष्ट्रपती म्हणून निवडून आल्यानंतर त्याने मंत्रिमंडळात व इतर महत्त्वाच्या हुद्द्यांवर नेमणुका करण्यासाठी कर्तबगार व सचोटीच्या व्यक्ती धुंडाळण्यास सुरुवात केली, पण त्याला कोणीच साथ दिली नाही.

डेमोक्रेटिक पक्षाचा प्रमुख व राजकारणधुरंधर ह्युबर्ट हंफ्रे ह्याला निक्सनने युनायटेड नेशन्समध्ये अमेरिकेचा प्रतिनिधी म्हणून जाण्याची विनंती केली, त्याने ती अमान्य केली.

सिनेटर हेन्री जॅक्सन ह्याला संरक्षण खाते सांभाळण्याची विनंती केली, परंतु प्रकृती ठीक नसल्याचा बहाणा करून त्याने नकार कळविला.

गव्हर्नर डेव्हिड रॉकफेलर ह्याला खजानची होण्यास सांगितले. आपण मॅनहाटीन ह्या बँकेचे नुकतेच अध्यक्षपद स्वीकारले असल्याकारणाने खजानचीचे पद सांभाळण्यास नकार दिला.

पेनसिल्व्हानियाचा गव्हर्नर स्क्रँटन ह्याने सेक्रेटरी ऑफ स्टेट हे पद स्वीकारणे धोक्याचे वाटल्यावरून नकार दर्शविला.

नेल्सन रॉकफेलर तयार होईना. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. आर्थर बर्न्स व डॉ. मोयनी हेन हे आत गेले आणि व्हाईट हाऊसमधील झब्बूशाही बघून थोड्याच दिवसांत बाहेर पडले.

२८ वर्षांचा तरुण उमदा, शुद्ध वर्तनाचा कर्तबगार वकील जॉन सीअर्स आपण राज्यकारभार हाकण्यास असमर्थ आहोत, असे कळवून बाजूला राहिला. केंटुकीचा सिनेटर जॉन शेरमन कूपर, माईक मॅन्सफील्ड ह्यांनीही मंत्रिमंडळात भाग घेण्यास नकार दर्शविला.

ह्या नकारांमधून तरी सावध होऊन निक्सनने धडा घ्यावयाचा आणि व्हाईट हाऊस स्वच्छ करून टाकावयाचे. पण त्याला काहीच करता आले नाही आणि अखेरी त्याच बदमाषांच्या वर्तुळात तो गिरक्या घेत राहिला.

१९७१, १९७२ व १९७३ मध्ये अमेरिकेतील महत्त्वाची जबाबदार वर्तमानपत्रे निक्सनवर टीकेचा भडिमार करीत होती. वॉटरगेट धरण फुटलेले होते. व्हिएटनाम युद्धाचा बट्ट्याबोळ उडालेला होता. आय. टी. टी. व दूध प्रकरणातील लाच दिले–घेतलेले प्रकार चव्हाट्यावर आलेले होते. देशात बेसुमार महागाई, तरुण विद्यार्थी वर्गामध्ये पसरलेली वैफल्यतेची भावना, निग्रोंचे आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठी होत असलेले उठाव ह्या सर्वांमुळे निक्सनची राजवट जरी आमजनतेमध्ये पसंत नव्हती तरी देखील ८ नोव्हेंबर १९७२ च्या राष्ट्रपतिपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीत निक्सन ६१ टक्के मते पडून निवडून आला. ह्याला २ महत्त्वाची कारणे होती व ती म्हणजे राजकारणातील इतर पक्ष जवळजवळ नामशेष करून टाकले गेलेले होते व लाचलुचपतीचे प्रमाण खालच्या थरापर्यंत जाऊन भिडलेले होते.

एवढ्या प्रचंड मतांनी निक्सनने विजय मिळविला तरी देखील वर सांगितल्याप्रमाणे सुबुद्ध व विचारवंत राजकारणी पुरुष निक्सनच्याबरोबर राज्यकारभार हाकण्यास तयार होईनात. पैशाचा नाद आणि सत्तेचा कैफ काही विलक्षणच प्रभावी असतो. ती धुंदी माणसाला पशू बनविते व अखेर त्याचा सर्वंकष नाश होतो. निक्सनच्या बाबतीत तेच झाले.

१७ नोव्हेंबर १९७३ ला व्हाईट हाऊसमध्ये निक्सनचा 'पत्रकारांबरोबर मुलाखत व प्रश्नोत्तरे' हा कार्यक्रम होता. स्तंभलेखक राठेर ह्याने निक्सनला त्याच्या सांपत्तिक परिस्थितीविषयी प्रश्न विचारला असता निक्सनने मोठ्या दिमाखात उत्तर दिले : 'राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीस आपल्या राष्ट्राध्यक्षास त्याची सांपत्तिक परिस्थिती कशी आहे व त्याने संपत्ती कशी मिळविली हे विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे. मी एवढेच सांगतो की, मजजवळ आता असलेल्या संपत्तीपैकी पै न पै मी स्वतः मिळविलेली आहे. ती माझी स्वकष्टार्जित संपत्ती आहे.'

'मी काही लुच्चा नाही, मी काही लफंग्या नाही,' अशा तऱ्हेचे बेछूट व बेजबाबदार विधान, अमेरिकेतील मोठमोठ्या नावाजलेल्या बातमीदारांच्यापुढे की, ज्यांनी १९७२ व १९७३ मध्ये त्याची लक्तरे त्याच्यासमोर उभी करून ठेवली होती, त्यांच्यासमोर करतांना निक्सनला काहीही वाटले नाही. यत्किंचितही वेदना झाल्या नाहीत. कारण : कारण एकच व ते म्हणजे तो बदमाषांच्या जाळ्यात गुरफटलेला व भोवऱ्यात सापडलेला एक सत्तालोलुप राजकारणी पुरुष होता.

परस्पर लाच देणे–घेणे ह्या गोष्टी त्याच्या अंगवळणी पडलेल्या होत्या. तो त्याच्या हातचा मळ होता.

ॲटमबॉम्बचा शोध ओपेनहीमर ह्या संशोधकाने लावला. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष ट्रूमन ह्याच्याकडून ओपेन-

## माझी संपत्ती ही स्वकष्टार्जित संपत्ती आहे

हीमरला भेटीसाठी निमंत्रण आले. त्यावेळी अर्थातच जपानच्या दोन बेटांवर अॅटमबॉम्ब टाकले जाऊन एका मिनिटात दोन्ही बेटे उद्ध्वस्त होऊन त्याचा चक्काचूर उडाला होता.

कर्करोगाने पछाडला होता; तरी देखील ओपेनहीमरने ट्रूमनचे निमंत्रण स्वीकारले आणि ठरल्यावेळी तो ट्रूमनला भेटण्यासाठी व्हाईट हाऊसमध्ये गेला. परंतु तेथे गेला तो अत्यंत दुःखित अंतःकरणाने !

आपण संशोधन केले ते मानवी जीवनाच्या कल्याणासाठी केले, निर्घृण मनुष्यहानीसाठी नाही. जपानवर बॉम्ब टाकण्यात अमेरिकेने फार मोठी चूक केली, हे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाच्या कानावर घालावे, ही ओपेनहीमरची इच्छा होती.

भेटीत ट्रूमनने विचारले, 'ओपेनहीमर, तू इतका दुःखीकष्टी का दिसतोस ?'

ओपेनहीमर काहीच बोलला नाही. त्याने स्वतःचे तळहात ट्रूमनला दाखविले म्हटले, 'पाहा, पाहा हे दोन्ही तळहात कसे रक्ताळलेले आहेत !'

ट्रूमन काय ते उमगला. खिशातला हातरुमाल काढून ट्रूमनने तो त्याच्यापुढे केला आणि सांगितले, 'ह्या रुमालांनी तुझे हात पुसून टाक. मी अमेरिकेचा राष्ट्रपती, ६ ऑगस्ट १९४५ ला जपानच्या हिरोशिमा बेटावर मी बॉम्ब टाकवले. तुझा त्यात काय दोष ? खरा दोषी मी आहे; तू नव्हेस.'

राष्ट्रपती निक्सनचे रक्ताळलेले हात शेवटपर्यंत तसेच राहिले. ९ ऑगस्ट १९७४ नंतर देखील ते कोणी पुसले नाहीत. रक्ताळलेल्या हातांनीच खाली मान घालून व्हाईट हाऊसमधून तो सा–क्लेमंटीला निघून गेला.

सत्तेचा दुरुपयोग केल्यावर काय होते; दुष्ट, नीच, स्वार्थी, मतलबी व बदमाष व्यक्तींना आपल्या भोवती गोळा करून राज्य करावयास निघालेल्या राष्टपतीचे सन्मान्यपद कसे अपवित्र होते; कसा कालिमा फासला जातो; ह्याची साक्ष निक्सनचे ते रक्ताळलेले हात त्याला त्याच्या पुढील आयुष्यात देत राहतील.

१२ सप्टेंबर १९७४ ला निक्सनने आपले शेवटचे वक्तव्य बाहेर काढले. तो म्हणतो :

One thing I can see clearly now is that I has clearly wrong in not acting more decisively and more forth rightly in dealing with Watergate.

No words can describe the depths of my regrets and pain at the anguish my mistakes over Watergate have caused the Nation and the Presidency.

That the way I tried to deal with Watergate was a wrong way is a borden I shall bear for every day of the life that is left to me.'

१९७४ मध्ये पुन्हा पुन्हा आपल्याशीच विचार करीत बसला असताना निक्सन स्वतःलाच विचारी, हे असे का घडले ? माझ्याच वाट्याला का आले ? ह्या पतनाला कारणीभूत तरी कोण ?

खरे म्हणजे हा प्रश्न दुसऱ्याला कोणी विचारूच शकला नाही. विचारलेच तर त्याची साद मिळत नाही. उत्तर तर नाहीच नाही. आपले आपणच उत्तर शोधायचे असते. आयुष्यभर वणवण केल्यावरच ध्यानात येते की, ही वाटचाल अटळ होती, अन् त्या वाटचालीचा शेवटही अटळच होता.

१७ जून १९७२ ला वॉटरगेट दरोडा पडला. सर्व गुन्हेगारांनी गुन्हा कबूल केला. २० जूनला म्हणजे नंतर ३ दिवसांनीच निक्सनला सर्व हकीकत कळली. दरोड्यामध्ये व्हाईट हाऊस किंवा निक्सन निवडणूक मंडळाचे अंग नाही; असे मिचेल व हल्डमनने १९ जूनलाच सांगून टाकले. मग वॉटरगेट प्रकरण दडपून टाकण्याचे निक्सनला काय कारण होते ? पण खरी वस्तुस्थिती वेगळीच होती. जे त्याने १९७३ च्या मध्याला सांगितले की, वॉटरगेट प्रकरणात जो दोषी असेल त्याला न्यायालयात खेचावे व सजा द्यावी. तेच जर त्याने २० जूनलाच सांगून टाकले असते तर वॉटरगेट प्रकरण जगापुढे आलेच नसते. ही पहिली संधी निक्सनने गमावली. तो गुन्हेगारांना पाठीशी घालू लागला. एफ. बी. आय. ने वॉटरगेट प्रकरणाची चौकशी करू नये; असा आदेश निक्सनने मिचेलमार्फत धाडला.

येथून पापकर्माला सुरुवात झाली.

७ फेब्रुवारी १९७३ ला सिनेटनी एर्विनच्या अध्यक्षतेखाली सात सिनेटर्सची कमिटी नेमून वॉटरगेट प्रकरणाची चौकशी करून अहवाल सिनेटला सादर करण्याची व्यवस्था केली. कमिटीला सहकार्य देण्याचे राहिले बाजूला; उलट त्यांच्या चौकशीत विघ्ने आणण्याचे कारस्थान निक्सन, एहरलिचमन, डीन, मिचेल, हल्डमन, व मॅगरूडर ह्यांनी चालू केले.

ही दुसरी संधी निक्सनने गमावली.

१४ फेब्रुवारी १९७३ ला कॉल्सनने निक्सनला मुद्दाम भेटून त्याच्या कानावर घातले की, मिचेल, अॅटर्नी जनरल ह्याचे वॉटरगेट प्रकरणात अंग होते, असे जर कळलेले आहे तर निक्सननी मिचेललाच न्यायालयात खेचावे, म्हणजे राष्ट्रपतिपदाला धक्का लागणार नाही. निक्सन स्वस्थ बसला. ही तिसरी संधी निक्सनने गमावली.

१९ मार्च १९७३ला दरोडेखोर मॅकॉर्ड ह्याने जज्ज सिरिकाला पत्र लिहून कळविले की, तो न्यायालयापुढे अंतःकरण उघडे करून सर्व सत्य हकीकत सांगू इच्छितो. निक्सनला पूर्ण माहीत होते की, मॅकॉर्ड फुटला की भांडे फुटले. सर्व गोष्टी बाहेर पडणार व सर्वजण फासावर लटकावले जाणार. हे कळून देखील निक्सनने काही केले नाही. स्वस्थ बसला.

ही चौथी संधी निक्सनने गमावली.

२१ मार्च १९७१ ला निक्सनच्या सांगण्यावरून डीनने कामबाच वकिलामार्फत हॉवर्ड हंट ह्या बदमाशाला ७५,००० हजार डॉलर्स केवळ चूप बसण्यासाठी लाच दिली आणि निक्सनचे ते वर्तन पाहून चिडून गेलेला डीन म्हणाला : राष्ट्रपतिपदाला कर्करोग लागल्यासारखे वाटायला लागले आहे ! निक्सननी त्या दिवशी तरी जागे व्हायचे. तो स्वस्थ बसला.

ही पाचवी संधी निक्सनने गमावली.

१४ एप्रिल १९७३ ला जॉन डीन व जेब मॅगरूडर फुटले अन् त्यांनी सरकारी वकिलांना सत्य परिस्थिती सांगावयाचे ठरविले.

ह्या दिवशी तरी सावध होऊन निक्सनने घणघण वाजणारी धोक्याची घंटा ध्यानात घ्यावयाची......तो स्वस्थ बसला.

अखेरची ही सहावी संधी निक्सनने गमावली.

३० एप्रिल १९७३ ला टेलिव्हिजनवरून भाषण करून निक्सनने एहरलिचमन, डीन क्लिंडस्टन व हल्डमन ह्यांच्या राजीनाम्यासंबंधी उल्लेख करून राष्ट्रपती ह्या नात्याने वॉटरगेट प्रकरणाची सर्व जबाबदारी आपणावर पडते, असे घोषित केले.

आता हळूहळू टेप्स प्रकरण फुटणार आणि ते फुटले की, सर्व खलास, हे समजून देखील निक्सनने टेप्सचा नाश केला नाही. ते आपल्या खाजगी संभाषणांचे टेप्स आहेत, त्याला न्यायालये हात लावू शकत नाहीत, ह्या मगरूरीमध्ये तो राहिला आणि अखेरी व्हायचे तेच झाले.

१६ जुलै १९७३ ला बटरफील्डने सांगून टाकले की, निक्सनने आपल्या बोलण्याचे व टेलिफोनवरील संभाषणाचे टेप्स काढून ठेवलेले आहत.

निक्सन पुरता अडकला.

दुसऱ्याच दिवशी जज्ज सिरिकाने व सिनेट कमिटीने निक्सनवर नोटीस बजावून मूळ टेप्स हजर करण्याची आज्ञा केली.

आता कोणतीच पळवाट शिल्लक राहिली नव्हती.

१९७२ जानेवारीच्या अगोदर व्हाईट हाऊसमध्ये बेकायदेशीर, हास्यास्पद, मत्सरी, द्वेषभरी कृत्ये करणाऱ्यांची एक लाटच आली होती. गॉर्डन लिडी, हंट, डीन, पोर्टर, डोनॉल्ड सिग्रेटी, कॉल्सन, ह्या एकापेक्षा एकेक सवाई, मूर्ख व नालायक व्यक्ती राज्यकारभारात ढवळाढवळ करीत धुडगूस घालीत होत्या आणि सर्वांत आश्चर्यकारक घटना म्हणजे २७ जानेवारी १९७२ ला अॅटर्नी जनरल मिचेलनी आपल्या कार्यालयात लिडी, मॅगरूडर व जॉन डीन वकील ह्यांच्याबरोबर दरोडे टाकणे, कार्यालये लुटणे, वगैरे उपद्व्यापांचा केलेला कट. अमेरिकेतील अॅटर्नी जनरल म्हणजे केवढी सत्ताधारी व्यक्ती व मानमरातबाची जागा. मिचेलनी सगळ्यांवर बोळा फिरविला. परतंत्र देशांतून राष्ट्र स्वतंत्र करण्याच्या उद्देशाने केलेल्या भूमिगत चळवळी ह्या राष्ट्र खडबडून जागे करण्यासाठी केल्या जातात व त्या समर्थनीयच ठरतात, परंतु अमेरिकेसारख्या स्वतंत्र लोकशाही राष्ट्रात मिचेल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेक भूमिगत चळवळी करून लोकशाहीची मूलभूत तत्त्वे पार झुगारून दिली, उखडून टाकली. १९६९ पासूनच ह्या भूमिगत चळवळीचा प्रादुर्भाव अमेरिकेत झाला व अनेक नालायक व दुष्ट व्यक्ती व्हाईट हाऊसमध्ये घुसल्या. नाना प्रकारची कृष्णकृत्ये त्यांनी केली आणि करविली. व्हाईट हाऊसला काळे ठिक्कर बनविले. राष्ट्रपतिपदाला बट्टा लावला. लोकशाहीला सुरुंग लावला. जगात शांततेचा संदेश पोहोचविणाऱ्या निक्सनला स्वतःच्या राष्ट्रात चाललेले भयानक व भीषण अत्याचार, जाळपोळ, लुटालूट, खून व दरोडे दिसत नव्हते.

मिचेल, हल्डमन व एहरलिचमन या तिघांनी Berlin Wall निर्माण करून ठेवल्यामुळे चांगल्या व्यक्तींना निक्सनला परस्पर भेटणे हेदेखील कठीण होऊन बनले.

सिनेट बिल्डिंगमधील 'किंग्ज रो' ह्या भागात आतापर्यंत सतत नामांकित व्यक्ती, राजकारणातील पुढारी, अर्थशास्त्रज्ञ, संस्थानांचे गव्हर्नर्स, शहरांचे मेयर्स, मंत्री, उपमंत्री, सिनेटर्स, काँग्रेसमेन जमा होऊन विचारविनिमय करीत असत, ते निक्सन दुसऱ्यांदा राष्ट्रपती म्हणून निवडून आल्यानंतर दूरदूर जाऊ लागले आणि हळूहळू बदमाश, स्वार्थी, कपटी, दुष्ट आणि नादान लोक किंग्ज रो ह्या भागात मोठ्या रुबाबात संचारू लागले. लाचलुचपत व वशिलेबाजीला ऊत आला आणि अशा व्यक्ती मिचेल, हल्डमन, एहरलिचमन ह्यांच्याकडून निरनिराळ्या जागी नेमल्या जाऊ लागल्या. ह्या तिघांच्याविषयी आपले मत प्रकट करताना मेल लायर्ड म्हणतो :

'These guys behaved the way they did not, becauce they did not understand politics and the difference between right and wrong.'

ह्या तिघांच्या खालोखाल ज्या हुशार परंतु राजकारणातील काहीही अनुभव नाही, अशा आणखी तीन व्यक्ती १९६९ मध्ये व्हाईट हाऊसमध्ये आल्या, त्या जेब मॅगरूडर, जॉन डीन व चार्लस कॉल्सन.

जॉन डीन अत्यंत हुशार, चलाख, देखणा असा ३१ वर्षांचा तरुण वकील. १९७० मध्ये निक्सननी बऱ्याच वरच्या लोकांच्या बदल्या केल्या, त्या वेळी ह्या जॉन डीनला न्यायखात्यात घेतले गेले. हल्डमनच्या मनात मात्र डीनला घेण्याचे नव्हते. तो स्वतः अशा व्यक्तींना वरच्या जागांवर नेमण्याच्या वेळी तीन गोष्टी तपासून पाही. Initiative, intelligence and integrity. ह्या तिन्ही परीक्षांत उतरल्याखेरीज तो होकार देत नसे. Integrity संबंधी त्याच्या मनात डीनविषयी संशय निर्माण झाला होता. पण मिचेलच्या संमतीवर त्याने शिक्कामोर्तब केले व डीनला राष्ट्रपतींचा सल्लागार म्हणून नेमण्यात आले. त्याने आपले कार्यालय किंग्ज रो च्या जवळ १०६ नंबरच्या खोलीत थाटले. ही खोली Plumbers Unit तळमजला खोली नं. ६ ह्याच्या बरोबर वर होती. १९६५ साली डीनची वार्षिक कमाई ७,५०० डॉलर्स होती, ती १९७० मध्ये ४२,५०० डॉलर्स सुरू झाली. निवडणुकांसाठी जमविले जाणारे फंडस ह्याविषयी नवीन कायदे करणे आणि निवडणुकांच्या खबरीवर देखरेख ठेवणे, ही दोन कामे त्याला देण्यात आली.

जॉन डीन हा शिकलेला, परंतु वाईट गोष्टींकडे कल असून, दुसऱ्या दोषी व्यक्तींनाही प्रोत्साहन देणारा, तर चार्लस कॉल्सन हा धटिंगण आणि दुसऱ्यांच्या खिशातून त्याला यत्किंचितही वेदना होऊ न देता, पैसे काढून घेण्यात हुशार असा वाकबगार. हाही हल्डमन आणि मिचेल ह्यांचा हस्तक. राजकारणी डावपेच टाकण्यात अतिशय चलाख. बोस्टनचा राहणारा आणि तेथेच वकिली करणारा हा धूर्त व कावेबाज मनुष्य १९७० मध्ये व्हाईट हाऊसमध्ये दाखल झाला. १९६८ साली मिचेलबरोबर निक्सन-निवडणूक-मंडळात तो होताच. दळणवळण खात्याचा मुख्य हरबर्ट क्लीन ह्याच्या खात्यात पहिल्या प्रथम ह्याची नेमणूक झाली. आत शिरल्यानंतर त्याने काहीच करावयाचे शिल्लक ठेवले नाही. सरकारी गुप्त दस्तऐवजातील बातम्या

## आता कोणतीच पळवाट शिल्लक राहिली नव्हती

फोडल्या, खोटे कागदपत्र तयार केले, लावालावीचे धंदे केले. परंतु अतिशय नम्र व गोड, आर्जवी आणि मार्दवी बोलण्यामुळे बिशाद काय की, कोणी त्यांचा संशय घेईल.

जेब मॅगरूडर आपल्या पुस्तकात लिहितो...

'Colson was one of the men among Nixon's advisors, most responsible for creating the climate that made Watergate possible, perhaps inevitasle.'

कॉल्सनच्या अगोदर काही दिवसच मॅगरूडर व्हाईट हाऊसमध्ये दाखल झाला होता. वास्तविक राजकारणाचा त्याचा काडीमात्रही संबंध नव्हता. ज्युवेल टी कंपनी : नंतर ब्रॉडवे हेल ह्या कंपन्यांतून मालाचा विक्रेता म्हणून काम करीत असलेला हा तरुण १९६० च्या निवडणुकीच्या वेळी काम करत होता. पुन्हा १९६८ च्या निवडणुकीच्या वेळी नोकरीत होता, तरी देखील एक आवड म्हणून तो दक्षिण कॅलिफोर्निया भागात निवडणुकीचे काम करीत राहिला. त्याची हल्डमनशी ओळख झाली. आणि निक्सन राष्ट्रपती झाल्यावर मागे सांगितलेल्या 'Intelligence, Integrity and Initiative.' ह्या चाळणीमध्ये हल्डमनच्या दृष्टीने तो उतरला आणि त्यास व्हाईट हाऊसमध्ये क्लीनच्या कार्यालयात कामाला ठेवले.

सगळेच शहाणे त्यामुळे क्लीन, मॅगरूडर, व कॉल्सन ह्यांच्यात लाथाळी सुरू झाली आणि ह्याच्यातूनच १४-४-७१ ला मॅगरूडर, कॉल्सन, डीन ही युती कामाला लागली. मॅगरूडरच्या हाताखालचे तिघेजण : रॉबर्ट ओडले, हरबर्ट पोर्टर व गार्डन स्ट्रेचन. डीनच्या खाताखालचे कॉल्डफिल्ड व उलासेव्हिटस आणि कॉल्सनच्या हाताखाली हॉवर्ट हंट हे सर्व बदमाष चढाओढीने कृष्णकृत्ये करावयास बाहेर पडले.

आणि २३ जून १९७१ ला न्यूयॉर्क टाईम्सने पेंटॅगॉन पेपर्समधील पहिला हप्ता छापला आणि व्हाईट हाऊसमध्ये निक्सन, मिचेल, हल्डमन, किसिंजर, एहरलिचमन आग पाखडू लागले. इतके गुपित ठेवलेले असे हे व्हिएटनाम युद्धावरील माहितीचे कागदपत्र न्यूयॉर्क टाईम्सच्या हातात कसे जाऊन पडले ह्याचाच सर्वांना अचंबा वाटला. पुढील लेख न छापण्याचा हुकूम सुटला. प्रकरण सुप्रीम कोर्टात गेले. सुप्रीम कोर्टाने ३१ जूनला निकाल दिला की, कायद्याने पेंटॅगॉन पेपर्स छापण्यावर निर्बंध घालता येणार नाहीत.

सगळीच अब्रू चव्हाट्यावर आली. निक्सनच्या अगोदरचे चार राष्ट्रपती जनतेला फसवून दहा हजार मैल लांब असलेल्या व्हिएटनाममध्ये युद्ध लढत होते व मार खात होते. जनतेची दिशाभूल कशी केली गेली ह्याचे समग्र वर्णन ह्या पेंटॅगॉन पेपर्समधून जनतेपुढे ठेवले जाणार होते.

निक्सनच्या अंगात सूडाची भावना निर्माण झाली. सैतानाच्या अंगात पिसाट वृत्ती शिरली. पेंटॅगॉन पेपर्स ज्याने चोरून आणून न्यूयॉर्क टाईम्सच्या बातमीदारांजवळ दिले होते. त्या एल्सबर्गचा काटा काढावयाचा ठरले आणि Plumbers Unit जन्माला आले.

राज्यकर्त्यांच्या हातातील नेहमीच पाजळून ठेवलेले अस्त्र म्हणजे National security. ह्याच्याखाली राज्यकर्ते अनेक अत्याचार करीत आलेले आहेत व करीत आहेत. निक्सनने ते अस्त्र वापरण्याचे ठरविले.

सी. आय. ए. व एफ. बी. आय. ह्या अशा व्यक्तींच्या बाबतीत स्वतंत्र काम करणाऱ्या संस्था असतात. त्यांच्यावर हे काम न सोपविता, त्यांच्यावर अविश्वास प्रकट करून, नवीनच Plumber's Unit सारखे एक भिकार युनिट निर्माण करणे व त्याच्याकरवी एल्सबर्गच्या-डॉक्टरच्या घरावर दरोडा टाकण्याचे भयंकर कृष्णकृत्य एहरलिचमन व निक्सन यांनी केले. त्यात थोडेफार यश आल्याचे दिसल्याबरोबर डेमोक्रेटिक पक्षाच्या वॉटरगेट बिल्डिंगमधील कार्यालयावर छापा टाकणे, दुसऱ्यांचे टेलिफोन्स कोर्टाच्या परवानगीवाचून टेप करणे, भाषणांचे व टेलिफोनवरील संभाषणाचे टेप्स काढणे : एका पाठोपाठ अशा वाईट गोष्टी करण्याकडे निक्सन चटावला गेला. वाईट गोष्टी करण्याची एकदा लूच लागली की, मग त्यात काही वाटेनासे होते. जपावयाचे असते ते सुरवातालाच, नंतर तो त्याच्या आहारी जातो आणि स्वनाश करून घेतो.

ह्याच वेळी व्हाईट हाऊसमध्ये नालायक व्यक्तींच्या जोड्या एकत्र होऊन काम करू लागल्या. चॅपिन-सिग्रेटी हे वकील धुमाकूळ घालीतच होते. निक्सनचे निवडणूक मंडळ लाचखाऊ कसे बनवावयाचे, त्यांच्यातील नालायक व्यक्ती व्हाईट हाऊसमध्ये कशा पेरून ठेवावयाच्या ह्याचे तंत्र हे वकीलद्वय चांगले जाणत होते.

निक्सनचा वकील म्हणून नेमणूक झाली असताना ते काम सांभाळण्याचे सोडून डीन हा निक्सन-निवडणूक मंडळात शिरला. आणि त्यावेळी लिडी ही व्यक्ती त्याने हाताशी धरली. लिडी अत्यंत धोकेबाज मनुष्य. वेडर, बेरड आणि निर्लज्ज.

ह्याच लिडीला हाताशी धरून मिचेलनी आपल्या कार्यालयात डीन व मॅगरूडर यांच्यामार्फत २७ जानेवारी १९७२ ला तोंडी करार केला की, वॉटरगेटमधील डेमोक्रेटिक पक्षाच्या कार्यालयातील टेलिफोन्स टेप करावयाचे व कागदपत्र चोरून आणावयाचे.

त्यानंतर लगोलग तरुण केनेथ रिटझ ह्याला व्हाईट हाऊसमधील पोर्टर ह्या व्यक्तीमार्फत लाच देऊन महाविद्यालयांतून सुरू झालेली हेरगिरी, डेमोक्रेट मस्की ह्याच्या मोटार ड्रायव्हरला लाच देऊन त्याच्यामार्फत मस्कीच्या निवडणूक चळवळी व तंत्रे काढून आणणे व कागदपत्र चोरून आणणे, ह्युबर्ट हंफ्रे याच्या कार्यालयातील गुप्त कागदपत्र चोरून आणणे, अशी कृष्णकृत्ये निक्सन, एहरलिचमन, मिचेल व हल्डमन यांची चालूच होती.

लोकशाही तत्त्वावर स्वच्छ राजकारण करावयास निघालेले निक्सनचे व्हाईट हाऊस सुव्यवस्थितपणे राज्य न करता, नको त्या गलिच्छ गोष्टी करीत राहिले ते थेट १९७२ अखेरपर्यंत.

आणि त्याच्यातूनच वॉटरगेट दरोडा प्रकरण उद्भवले. तो हादरा सहन करण्याची कोणाच्यातच ताकद राहिली नव्हती.

२० जून १९७२ चा खोडून टाकलेला टेप, २३ जून १९७२ चा निक्सनचा हल्डमनशी बोलण्याचा व २१ मार्च १९७३ ला निक्सनचा डीनशी बोलण्याचा टेप हे सिनेट कमिटीपुढे हजर केले. त्यावरून हे स्पष्ट होते की, निक्सनला वॉटरगेट प्रकरण पूर्ण माहीत होते, त्याने ते दाबून टाकण्याचा जिवाचा आटापिटा केला होता. निक्सनचे मन निष्पाप असते तर त्याने खबर मिळाल्याबरोबर मिचेलसकट सर्व गुन्हेगारांना पोलिसांच्या ताब्यात दिले असते, पण त्याचे स्वतःचेच हात रक्ताळलेले होते, त्याला तो काय करणार ?

२३ जूनचा निक्सन–हल्डमन संभाषणाचा टेप काय सांगतो ते तर पाहा...

Haldman : And yon seem to think the thing to do is get them (the FBI) to stop ?

Nixon : Right fine.

Haldman : They say that the only way to do that, is from White House instructions. And Its got to be HELMS CIA Chief and to WALTERS... and the proposal would be that Ehrlichmen and I call them in and say .

Nixon : All right, fine work... well we had protected HELMS from one hell of a lot of things— play it tough.'

काही वेळाने निक्सन पुन्हा म्हणतो.

Well-what the Hell ? Did Mitchell know about it ?'

Haldman : I think so.

हे संभाषण सरळ दाखविते की, हा दरोडा घालण्यात मिचेलचे अंग होते व मिचेलला आणि इतर गुन्हेगारांना पाठीशी घालण्याची जबाबदारी ह्या २३ जून १९७२ ला निक्सनने आपल्या अंगावर घेतली.

२० ऑक्टोबर १९७३ मध्ये निक्सनने कत्तलखाना उघडला व भरांमर ॲडव्होकेट जनरल व सरकारी वकील कामावरून काढून टाकले. तोच कत्तलखाना जर हचा २३ जून १९७२ ला निक्सननी उघडला असता तर निक्सन शहाणा ठरला असता व राष्ट्रपतिपद धोक्यात आले नसते.

पण तो तसे करू शकत नव्हता, कारण त्याचे मन पापी होते. त्या वेळी कत्तलखाना उघडला असता, तर हचा जातेजात दुष्ट, नीच व बदमाश व्यक्तींनी निक्सनलाच गिळून टाकले असते. कारण त्या उलटचा काळजाच्या व्यक्ती होत्या. २० ऑक्टोबरला काढून टाकलेल्या तिन्ही व्यक्ती अत्यंत सचोटीच्या होत्या.

हचा २३ जूनला संध्याकाळीच हल्डमन, डीन मिचेल यांनी पुढे काय करावयाचे ह्याचा आराखडा तयार करण्यास सुरवात केली. डीनने सी. आय. ए. चा मुख्य वॉल्टर्स ह्याला बोलावून घेतले व एफ. बी. आय. वॉटरगेट प्रकरणी चौकशी चालू झाली होती, ती बंद करण्यास सांगितले.

वॉल्टर्सनी स्पष्ट नकार दिला.

१ जुलैला मिचेलनी निवडणूक मंडळाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आगीत तेल ओतले गेले. आता गुन्हा दडपून टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लाचलुचपत, खोट्या साक्षी आणि खोट्या शपथा ह्यांना सुरुवात झाली.

८ नोव्हेंबर १९७२ ला राष्ट्रपतिपदाच्या निवडणुका होत्या, तेव्हां त्याच्या आधी सर्व प्रकरण दडपून टाकावयाचे, असा प्रत्येकजण अट्टाहासाने प्रयत्न करीत होता. न्यायालयातील कामकाज पुढे ढकलले जात होते. वॉटरगेट प्रकरणाच्या बातम्या वर्तमानपत्रांतून दाबून टाकल्या जात होत्या. बातम्या आल्याच तर त्या अगदी त्रोटक व कोणत्याही आतल्या पानांवर, अगदी कोपऱ्यात, अशी व्यवस्था चालू झाली. निक्सन–निवडणूक–मंडळाकडे पैसा हाती होताच अन् आणखी जमा होत होता. मग काय ? 'मृदंग मुखलेपन करोति मधुर ध्वनिम्' ह्या सुभाषिताप्रमाणे वॉटरगेट ही अगदी किरकोळा-तील किरकोळ बाब असून, निक्सन व त्यांचे व्हाईट हाऊट ह्यांचे हात मुळीच अडकलेले नाहीत, हा मथितार्थ सगळ्या वर्तमानपत्रांत ठरीव साच्याचा छापला जात होता. चार-दोन जबाबदार वर्तमान-पत्रांनी मात्र निक्सनचा आणि त्याच्या गोतावळ्यांचा पिच्छा सोडलाच नाही.

ठरल्याप्रमाणे निक्सन निवडून आला. कारण सगळीकडे सर्व प्रकारचा पूर्ण बंदोबस्त करून ठेवलेला होता. २० जानेवारी १९७३ या दिवशी निक्सन अमेरिकेचा ३७ वा राष्ट्रपती म्हणून गादीवर बसला आणि ३० जानेवारीपासून वॉटरगेट प्रकरणाने पेट घेतला.

जज्ज सिरिकाने लिडी व मॅकॉर्ड हे पूर्ण दोषी असल्याचा ज्यूरीचा निर्णय मान्य केला, परंतु निकालपत्र २३ मार्चपर्यंत रोखून ठेवले.

१२ मार्चला निक्सननी 'Executive Privilege' ह्या सदरा-खाली व्हाईट हाऊसमधील कोणाही व्यक्तींनी एर्विन समितीपुढे साक्ष देण्यास जाऊ नये, असे फर्मान काढले.

प्रकरण चिघळतच होते.

२० ऑक्टोबरच्या कत्तलीनंतर दुसऱ्याच दिवशी मोठमोठाल्या जबाबदार वर्तमानपत्रांनी स्वच्छ लिहून टाकले :

'अधिक बेअब्रू करून घेण्यापेक्षा निक्सननी ताबडतोब राजीनामा देणेच योग्य.'

२२ ऑक्टोबरला हाऊस स्पीकर कार्ल अर्बर्ट याने जबाबदार काँग्रेसमनना बोलावून घेतले व निक्सनविरुद्ध Impeachment Proceedings घेण्याचे ठरविले. लगेच समिती नेमली जाऊन काँग्रेसमन रेडिनो ह्याला अध्यक्षपद देण्यात आले.

आता प्रकरण तीन ठिकाणी चालू होते. जज्ज सिरिकाच्या पुढे, काँग्रेसमन रेडिनो समितीपुढे व सिनेटर एर्विन समितीपुढे.

पीटर रेडिनोच्या समितीमध्ये ३८ व्यक्ती सभासद होत्या. २१ डेमॉक्रेटस व १७ रिपब्लिकन्स.

पीटर रेडिनो–एक खुशालचेंडू व्यक्ती, पण सरळमार्गी आणि बेडर. अंतःकरण स्वच्छ. कोणाची भीडमुर्वत त्याने कधी बाळगलीच नाही. १९४९ साली पहिल्या प्रथम निवडून येऊन तो काँग्रेसमध्ये शिरला व गेली २४ वर्षे काँग्रेसमन म्हणून त्याने चांगलाच नाव-लौकिक संपादन केलेला होता. २० ऑक्टोबरच्या निक्सननी केलेल्या कत्तलीचे वर्णन त्याने टेलिव्हिजनवरून पाहिले, त्या वेळी त्याला धक्काच बसला व निक्सनच्या वागण्याचा तिटकारा आला. रेडिनोनी स्वतःला मदतनीस म्हणून फ्रान्सिस ओब्रायन ह्या नावाचा तरणाबांड हुशार मनुष्य न्यूयॉर्क टाईम्सच्या कार्यालयामधून आपल्याजवळ

घेतला. पुढे जानेवारी–फेब्रुवारी रोज रात्री दोन–दोन वाजेपर्यंत रेडिनोच्या घरी, रेडिनो, ओब्रायन व डोर वकील एकत्र बसून खल करीत होते.

२० ऑक्टोबरच्या प्रकरणाने अमेरिकन जनता फारच प्रक्षुब्ध झाली. पहिल्याच दिवशी रिपब्लिकन पक्षाच्या कार्यालयावर व व्हाईट हाऊसवर दीड लाख तारा येऊन आदळल्या व पुढील दहा दिवसांत तारांची संख्या ४॥ लाखांपर्यंत पोहोचली. मथितार्थ एकच :

' निक्सनने राजीनामा द्यावा ! '

कायदा शिकविणाऱ्या महाविद्यालयातील डीन्सनी काँग्रेसकडे पत्र पाठवून निक्सनवर Impeachment Proceedings घ्यावीत, असे लिहून टाकले. ज्या ठिकाणी निक्सनने कायद्याचे शिक्षण घेतले होते, त्या शिक्षणसंस्थेतील विद्यार्थ्यांनी दिवाणखान्यातील निक्सनचा फोटो काढून फेकून दिला.

न्यूयॉर्क टाईम्सने लिहिले :

' The one last great service that Mr. Nixon can now perform for his country is to resign and go. '

स्तंभलेखक स्टेवॉर्ट अलसॉपने तर चक्क लिहून टाकले :

In the last few weeks Nixon had both acted the lion and played the fox, But there is in him same thing of still another symbal animal-An Ass.

डिसेंबर १९७३ मध्ये निक्सनने दोन्ही वकील–गार्मेंट व बुझार्ट निक्सनच्या पाठीमागे लागले होते की, त्याने राजीनामा द्यावा. निक्सन ऐकत नाही, हे पाहून त्या दोघांनीही जानेवारी १९७४ मध्ये आपले राजीनामे व्हाईट हाऊसकडे पाठवून दिले.

पीटर रेडनो समितीचे कामकाज फेब्रुवारी १९७४ मध्ये सुरू झाले. सुरुवातीलाच डोर वकिलाने आपल्या भाषणात सांगितले की, अमेरिकेची राज्यघटना असे स्पष्ट बजावून सांगते की, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, किंवा कोणीही सनदी नोकर यांनी घटनाबाह्य वर्तन केले, फितुरी, विश्वासघात आणि लाचलुचपत असे गर्हणीय प्रकार करीत असल्याचे नजरेस आले तर त्याच्यावर योग्य तो कायदेशीर इलाज करावा. आणि गुन्ह्यांची छाननी करण्याचा पूर्ण अधिकार काँग्रेस व सिनेट या दोघांनाही दिला गेलेला आहे.

आपल्या भाषणात डोर वकिलाने पुढे इंग्लंडच्या इतिहासातील काही दाखले दिले. १३८६ सालात इंग्लंडमध्ये दुसऱ्या रिचर्डला पार्लमेंटच्या न्यायासमोर खेचून आणण्यात आले. १६२० ते १६४० ह्या वीस वर्षांच्या काळात कमीत कमी शंभर व्यक्तींना पार्लमेन्टपुढे उभे करण्यात येऊन शिक्षा दिल्या गेल्या. अर्ल ऑफ स्टॅफोर्ड ह्याचा ह्याच कारणाकरिता शिरच्छेद करण्यात आला होता आणि पहिला चार्लस राजा ह्याचसाठी फासावर लटकावला गेला. ह्या बाबतीत राजांना व सनदी नोकरांना गुन्ह्याबद्दल, लाच खाण्याबद्दल, लाच दिल्याबद्दल, राष्ट्रद्रोही कृत्ये केल्याबद्दल जर फाशी दिले नाही, तर राष्ट्रच नामशेष होईल; असेही डोर म्हणाला. म्हणूनच अमेरिकन राज्यघटनेने असे लिहून ठेवले आहे की, भयंकर गुन्ह्याबद्दल राष्ट्राध्यक्षांची आणि सनदी नोकरांची चौकशी झालीच पाहिजे व योग्य ते शासन दिले गेले पाहिजे.

२६ डिसेंबरला निक्सन वॉशिंग्टनहून सान्क्लेमंटीला विश्रांतीकरिता गेला व १७ दिवसांनी परत आला. जनतेशी त्याचा संपर्क तुटल्यासारखाच झाला होता. ह्यावेळी ॲटर्नी जनरल वुईल्यम सॅक्सबी व वकील जेम्स क्लेअर होते.

सगळीकडे छी:थू होत राहिल्यामुळे निक्सन आता एकलकोंडे जीवन जगण्याकडे वळला होता. त्याच्या वागण्यात लहरीपणा व अस्थिरता येत चालली होती. कॅम्प डेव्हिडला गेल्यावर तो पुन:पुन्हा पूर्वीचे टेप लावून पाही. तासन्‌तास टेप्स ऐकण्यात घालवी, मोठमोठ्यांदा टाळ्या पिटी, आपल्याशीच हातवारे करीत बडबडत बसे, मधेच मद्याचे चार घुटके घेई, पेटविलेल्या सिगरेटचा हवेत धूर सोडी. पुन्हा तेच तेच कार्यक्रम त्याचे चालू होते. त्याच्या लाडक्या दोन कन्यका, जावई, रेवेझो मित्र व घरातील परिवारच त्याच्या अवतीभोवती असे.

बाहेरचे कोणी देखील त्याचे हे स्वत:शीच हसणे, बोलणे, दिवाणखान्यात रुबाबदार फेऱ्या मारणे पाहावयास नसे. अगदी तो अशा रंगात आला त्यावेळीच बरोबर त्याच्याकडे ट्रिशिया किंवा ज्युली त्याच्यापुढे आली की तो म्हणणारच, ' अग, आता फिरून मी तो टेप वाजवून पाहिला. खरोखरच त्याच्यात काही देखील नाही. लोक मला लुच्चा, लफंगा का समजतात, तेच मला कळत नाही. वास्तविक मी अमेरिकेचा राष्ट्रपती आहे. '

' होय पपा, तुम्ही राष्ट्रपती आहात ' ट्रिशिया उत्तर देत असे.

वुइल्यम शेक्सपियरने ' किंग लियर ' या नावाचे उत्कृष्ट नाटक लिहिले आहे. राजाला तीन मुलीच असतात, मुलगा नसतो. राजाच्या मरणानंतर मुली आणि जावई राज्याला वारस होणार हे नक्कीच होते. पण जिवंतपणीच ह्या तीन मुली राजाला नरकयातना भोगावयाला लावतात आणि तो वेडापिसा झालेला राजा लियर म्हणत असतो, I am still a king. '

निक्सन आपल्या मुलींच्या पुढे तेच म्हणत होता,

' I am still the President ! '

क्लेअर वकिलाजवळ निक्सनने आपले अंत:करण उघडे केलेच नाही. विचारलेल्या प्रश्नांना खरी उत्तरे दिलीच नाहीत खरी परिस्थिती सांगितलीच नाही. नेहमीच उडवाउडवीची उत्तरे. त्यामुळे हुशार असून देखील क्लेअर नाराज झाला होता.

प्रकरण चिघळत चालले. फेब्रुवारीत क्रोग, पोर्टर, कामबाच ह्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांना शिक्षा झाल्या. हॉवर्ड ह्यूजेसकडून रेबेझो व जॉन निक्सन ह्यांच्यामार्फत घेतलेल्या पैशाचे निक्सनने काय केले ते प्रकरण बाहेर पडले. चॅपिन, क्लिंडिन्स्ट व कॉल्सन ह्यांच्यावरील खटले सुरू झाले.

मार्च उगवला आणि ग्रॅन्ड ज्युरीने हल्डमन, एहरलिचमन, मिचेल, बार्कन्सन, मार्डियन ह्यांच्यावर देखील आरोप ठेवले.

१६ मार्चला मॉरिस स्टान्स व जॉन मिचेल ह्यांच्यावरील खटला सुरू झाला.

१९ मार्चला न्यूयॉर्कच्या सिनेटर जेम्स बकले, की ज्याने १९७२ च्या रिपब्लिकन पक्षाच्या मेळाव्यात निक्सनच्या निवडणुकीत दुजोरा दिला होता त्याने, टी. व्ही. वर भाषण करून सांगितले की, चाललेल्या घटनांचा इतिहास ध्यानात घेता असेच म्हणावे लागेल की, निक्सनने ताबडतोब राजीनामा देणेच उचित !

निक्सन काय संतापला-विचारायची सोय नाही. आंधळ्या कोशिंबिरीचाच खेळ खेळत होता तो. अजूनही त्याच्या अंगात रग आणि मस्ती होती. आजूबाजूच्या परिस्थितीचे मूल्यमापन न करताच त्याने जेम्स बकलेच्या मुलाखतीतील बोलण्यावर टोला हाणण्याचा प्रयत्न केला आणि वक्तव्य बाहेर पाडले :

' While it might be an act of courage to run away from a job that you were elected to do, it also takes courage to stand and fight for what you believe, is right and that's what I intend to do. '

एप्रिल उगवला आणि निक्सनच्या वर ४,७६,४३१ डॉलर्स उत्पन्न-कर चुकविल्याबद्दल नोटीस बजावली गेली. १९६९ मध्ये ७२,६८२ डॉलर्स, १९७० मध्ये फक्त ७९२ डॉलर्स, १९७१ मध्ये ८७८ डॉलर्स व १९७२ मध्ये ४,२९८ डॉलर्स इतकाच आयकर निक्सनने भरला होता. खाणीतला मजूर, कारखान्यातील कारागीर, शाळामास्तर किंवा सलूनमध्ये केस कापणारी स्त्री देखील निक्सनपेक्षा जास्त आयकर भरत असावी.

निक्सनने कर्ज काढून आयकर भरला. न्यूयॉर्क टाइम्सने ७ स्तंभी मथळा देऊन ही बातमी छापली आणि जनतेने ती बातमी इतक्या आतुरतेने वाचली की, जी आतुरता १९६३ मधील केनेडीचा खून किंवा १९४१ मधील पर्ल हार्बरवरील जपान्यांची मुसंडी–ह्या विषयीच्या बातम्या फिक्या पडाव्यात !

टेप्स दाखल करण्यासंबंधीचे हुकूम बाहेर पडू लागले. शेवटी निक्सनने टेप्स सादर करण्याचे अभिवचन न्यायालयाला व एर्विन कमिटीला दिले.

२९ एप्रिल १९७४ ला निक्सनने टी. व्ही. वर लांबलचक भाषण करून मोठ्या रुबाबात सांगितले की, वॉटरगेट प्रकरणातील टेप केलेली बोलणी ह्यांच्या छापील नकला तयार झालेल्या आहेत व ती सर्व १३०८ पाने न्यायालयात व सिनेट आणि काँग्रेस समित्यांच्याकडे लवकरच धाडून देण्यात येतील. त्यावरून सर्वांची खात्री होईल की, राष्ट्रपती हा पूर्ण निर्दोषी असून लुच्चा व लबाड मनुष्य नाही. दुसऱ्या दिवशी त्या पानांचे छापलेले गठ्ठे एर्विन-कमिटीकडे पाठविले गेले.

सिनेट कमिटीने कळविले की, छापील प्रती चालणार नाहीत. मूळ टेप्स हजर करावेत.

बरोबर १ वर्षापूर्वी ३० एप्रिल १९७४ ला टी. व्ही. वर भाषण करताना निक्सन म्हणाला होता की, 'वॉटरगेट प्रकरणाच्या अगदी तळाशी जाऊन तपास करण्याचा हुकूम दिला गेलेला आहे आणि दोषी असेल त्याला फाशी दिले जाईल. '

आज वर्षानंतर आम जनता, जबाबदार वर्तमानपत्रे, न्यायालये, सिनेट व काँग्रेसच्या कमिट्या डांगोरा पिटून सांगत होत्या की, वॉटरगेट–प्रकरणाच्या बुडाशी स्वतः राष्ट्रपतीच होता.

टेप्सवरील मजकुराची खरी–खोटी बुके ( छापलेल्या १३०८ पानांची) न्यायालयातून प्रविष्ट झाली आणि चारच दिवसांत न्यूयॉर्क टाईम्सने ती छापून White House Transcripts ह्या नावाने विक्रीसाठी ठेवली. एक आठवड्याच्या आत ३७ लाख प्रती खपल्या.

आता तर निक्सनविरुद्ध सबंध अमेरिका उठली. कोणाच्याच मनात त्याच्याविषयी सहानुभूती राहिली नाही. डेमोक्रेटस, रिपब्लिकन्स, सिनेटर्स, काँग्रेसमन जाहीरपणे आज आपले मत प्रकट करू लागले.

२१ मार्च १९७३ च्या निक्सन–डीन वक्तव्याचा टेप जनतेला वाचावयाला मिळाला. राष्ट्रपतिपदावरचा विश्वास साफ उडाला. एका बदमाषाने राष्ट्रपतीला दमदाटी द्यावी आणि त्याला गुप्तपणे ७५,००० डॉलर्स दिले जावे, ही गोष्ट वाचल्यानंतर सर्वांच्याच अंगाचा तिळपापड उडाला.

मे महिना संपला. जून महिन्याच्या ९ तारखेला पूर्वेकडील देशांना भेटी देण्यासाठी निक्सन गेला. १० दिवस तिकडे घालविल्यावर पुनः परत येऊन रशियाचा दौरा २५ जून पासून सुरू झाला. ८ दिवसांनी परत आल्यावर ताबडतोब बिस्कायने, नंतर ४–६ दिवस वॉशिंग्टनमध्ये व पुन: १६ दिवस १२ जुलै १९७४ पासून विश्रांतीसाठी सा–क्लेमंटी.

१९६९ पासून वैभवाच्या शिखरावर रुळणारी सा–क्लेमंटी नगरी आता सुस्त, मृतवत् दिसत होती. सुटीच्या काळात हॉटेलचा धंदा करणारांनी आपले हात धुऊन घेतले होते. त्या नगरीला निक्सनच्या सारख्याच वाऱ्या होत राहिल्यामुळे तो तेथे गेला की, जत्रेचेच स्वरूप यावयाचे. निरनिराळी मोठी हॉटेल्स बांधली गेली होती, ती आता ओस पडू लागली. कोणी तिकडे फिरकेनासे झाले. लागूना हॉटेलमध्ये गेली चार वर्षे निक्सनचा गोतावळा जमा होत होता, कायमचे सेक्रेटरिएट तेथे स्थापन झाले होते. मे महिन्याच्या सुरुवातीपासूनच तेथील मंडळींनी आपले चंबूगबाळे आटोपून रामराम ठोकण्यास सुरुवात केली होती. ज्या मॉटेलसमधून शेकडो वार्ताहर येऊन राहत होते व ज्या ठिकाणी बातमीदारांच्या बैठकी भरल्या जात होत्या, ते मोठमोठाले दिवाणखाने आता ओस पडले.

जुलै महिन्याच्या मध्याला निक्सन सा–क्लेमंटीला गेला, त्यावेळी सगळीकडे सामसूम, सगळी हॉटेल्स व मॉटेल्स रिकामी. सगळ्या खोल्या खाली. चिटपाखरूदेखील दिसेना.

वॉशिंग्टनला तर काय प्रेतकळाच आलेली होती. एक्झिक्युटिव्ह ऑफिस बिल्डिंग नेहमी गजबलेले, आज सगळीकडे शांत शांत. रेबर्न ऑफिस बिल्डिंग, व्हाईट हाऊसचा पूर्वभाग, किंग्ज रो, प्रेस गॅलरी–कोठे माणूसही दिसेना !

रेडिनो कमिटीपुढे जॉन डोर वकिलाने आपले ३०९ टंकलिखित पानांचे म्हणणे सादर केले. डोरला आपले म्हणणे मांडावयाला ५ दिवस लागले. विवेचनाच्या अखेरीस डोर म्हणाला की, समितीच्या अध्यक्षांनी व सभासदांनी निक्सनचे ३० एप्रिल १९७४ चे भाषण ध्यानात घ्यावे. त्यानंतर निक्सनला त्याच्या गोतावळ्याने फसविले, हा मुद्दा नीट तपासला जावा. समितीच्या प्रत्येक सभासदापुढे एरव्हिन

## निक्सनने कर्ज काढून इन्कमटॅक्स भरला

कमिटीपुढे दाखल झालेला पुरावा आहे. निक्सनच्या बाबतीत आयकर कमिटीचा रिपोर्ट आहे. एफ. बी. आय. ह्यांनी जमविलेली माहिती आहे. टेप्सची तयार केलेली बुके आहेत आणि ह्या कमिटीपुढे झालेल्या जबान्या व इतर कागदपत्रे आहेत. एकाच व्यक्तीला हे सर्व नजरेखालून घालून मत बनविणे जरा कष्टाचेच आहे, हे निश्चत.

२४ जुलै १९७४ ला सुप्रीम कोर्ट व २५ जुलैला ज्युडिशियअरी कमिटी 'राष्ट्रपतीची सत्ता व हक्क' ह्यासंबंधी आपले मत जाहीर करणार होती. ३८ सभासदांची समिति विचार करण्यासाठी २१४१ नंबरच्या दिवाणखान्यात रात्री ८ वाजता भरली. सर्व सभासद आपाआपल्या जागी स्थानापन्न झाल्यावर अध्यक्ष पिटर रेडिनोनी आजच्या परिस्थितीत सभासदांचे कर्तव्य काम ह्याची जाणीव आपल्या सुरुवातीच्या भाषणात करून दिली. प्रत्येक सभासद आपाआपले म्हणणे थोडक्यात मांडत होता. डेमोक्रेट ब्रुक म्हणाला: आपल्या समितीने आतापर्यंत सरकारमध्ये चाललेले लाचलुचपतीचे प्रकार ऐकलेच. अत्यंत गर्हणीय गुन्हे, टेलिफोन्स टेप करण्याचे किळसवाणे प्रकार, बेकायदा दुसऱ्याच्या घरावर घातलेले छापे, बदमाश व नीच गुन्हेगारांना संरक्षण देण्याचे प्रयत्न–ह्या गोष्टींना अमेरिकेच्या गेल्या १९८ वर्षांच्या राजकीय जीवनात तोड सापडणार नाही.

त्या दिवशीचे कामकाज संपले. २७ जुलैला शनवारी समिति पुन: बसली. आर्टिकल नं. १ : 'न्यायदानाला अडथळा' ह्या गुन्ह्याबद्दल मतदान झाले. २७ सभासदांनी अडथळा आणला, असे मत दिले व बाकीच्या ११ जणांनी अडथळा आणला नाही असे मत नोंदविले.

२९ जुलै सोमवारी समिति पुन: बसली. आर्टिकल नं. २ : 'सत्तेचा दुरुपयोग' ह्यावर मते घेतली. २८ विरुद्ध १० असे मतदान झाले. आणि मंगळवार ता. ३० जुलैला 'समितीकडे मूळ टेप्स दाखल करण्याचे हुकूम दिले असताना ते मानले नाहीत,' ह्या तिसऱ्या आर्टिकलवर मतदान दिले गेले ते २१ विरुद्ध १७ असे होते.

ह्या तिन्ही कलमांवर काय काय निकाल लागला तो लिहून झाल्यावर पीटर रेडिनोनी शेवटी शेरा मारला–

'Wherefore, Richard M. Nixon by such conduct, Warrants impeachment and trial and removal from office.'

अमेरिकेच्या इतिहासात राष्ट्रपतीवर Impeachment proceedings घेतल्या गेल्या त्या १८६८ साली अॅन्ड्र्यू जॉन्सनवर. अॅब्रॅहॅम लिंकनचा खून झाल्यावर राष्ट्रपती झालेला हा अॅन्ड्र्यू जॉन्सन.

सन १९५२ पासून 'प्रेस व निक्सन यांच्यात श्रेष्ठ कोण' ह्याविषयावर घनघोर युद्ध चालू होते ते ८ ऑगस्ट १९७४ ला संपले. निक्सन जीवनातून उठला. प्रेसची ताकद मात्र चौपटीने वाढली,

'Who is Powerful? President or the Press?'

ह्या प्रश्नार्थक चिन्हाचे उत्तर आज मिळाले.

निक्सन ९ ऑगस्ट १९७४ ला सा–क्लेमंटीला निघून गेला.

मॅगरूडर, कॉल्सन, डीन, कामबाच, क्रोग, सिग्रेटी ह्यांना शिक्षा लागल्या व दया दाखवून थोडी माफी दिली गेली, म्हणून ते तुरुंगातून लवकर बाहेर पडले.

गॉर्डन लिडीने माफी मागितली नाही.

मिचेल, एहरलिच्मन व हल्डमन १ ऑक्टोबर १९७४ ला कोलंबियाच्या न्यायालयात दाखल झाले. १५५ ज्यूरर्सची नावे वाचली गेली, त्याच्यापैकी त्यांना पसंत पडतील ते नेमण्यास न्यायाधीशाने त्यांना सांगितले. ज्यूरींपैकी ९० टक्के निग्रो होते.

न्यायालयाने ८ वर्षेपर्यंत तिघांनाही निरनिराळ्या गुन्ह्याकरिता शिक्षा दिल्या.

सा–क्लेमंटीला गेल्यानंतर तेथूनही निक्सनचे व्हाईट हाऊसमधील व्यक्तींशी संबंध ठेवण्याचे प्रयत्न चालूच होते. सुरुवातीला टेलिफोन ऑपरेटर्स विवक्षित व्यक्तीला टेलिफोन जोडून देत असत, पण नंतर त्या व्यक्तींनाच निक्सनशी बोलणे हितावह वाटेना. त्यांनी बरेच वेळा टाळाटाळ करावी, सबबी सांगाव्या असे चालले होते. एकावेळी तर आपण कोण आहोत ह्याची ओळख न देताच निक्सनकडून आलेल्या टेलिफोनला एकाने उत्तर देऊन टाकले.

'Those who served you best, hate you most!'

निक्सनचे नळकांडे फिरविणे बंदच पडले.

१९६९ पासून १९७४ पर्यंत सतत निक्सन हेच म्हणत राहिला की, जगात शांतता नांदावयास पाहिजे असेल तर चीन व रशिया ह्यांना आपण जवळ केलेच पाहिजे. परराष्ट्रीय राजकारणात अगदी झपाटलेली व्यक्ती आणि खुद्द अमेरिकेत विकृतीतून सौंदर्याचे क्रेणे उभे करू पाहणारा एक विचित्र व चमत्कारिक माणूस! सगळीकडे काटेरी अन् विषारी अशी दुःखाची फुलबाग फुलवून पंचवीस तरुण, कर्तबगार, हुषार अशा व्यक्तींच्या आयुष्याची राखरांगोळी करून आयुष्यातून पुरा उठलेला–असा हा अमेरिकेचा ३७ वा राष्ट्राध्यक्ष रिचर्ड मिलहस निक्सन!

प्राध्यापक फ्रान्सिस समिट ह्यांनी लिहून ठेवले आहे.

'If a man could understand himself, he might not destroy himself.'

# समाप्त

## मतपेटीचे शस्त्र : पृष्ठ ९ वरून

घेतला जाईल. पण वास्तविक या कसोटीत अव्यवहार्य असे काय आहे? मतदारसंघातील एकूण मतदारांच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते विजयी उमेदवारास मिळावी एवढीच अपेक्षा त्यात केलेली आहे. ही अपेक्षा आटोक्याबाहेरची आहे का? मतदान मोठ्या प्रमाणावर झाले तर ही कसोटी गाठणे अशक्य नाही. महाराष्ट्रात माजी केंद्रीय मंत्री कै. आनंदराव चव्हाण यांनी १९७१ च्या निवडणुकीत मिळविलेले यश या कसोटीत उतरणारे आहे. कऱ्हाड मतदारसंघातून ते निवडून आले. या मतदारसंघात एकूण मतदार ५,०३,७१०. त्यापैकी मतदान ३,१४,६०५ म्हणजे सुमारे ६२ टक्के झाले. वैध मते ३,०५,३०७ होती. आनंदराव चव्हाणांना त्यापैकी २,६३,३५६ म्हणजे ८६·२६ टक्के मते मिळाली. हे प्रमाण एकूण मतदारांच्या सुमारे ५२ टक्के आहे.

केंद्रीय परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाणांनीही ही कसोटी जवळ जवळ गाठली होती. सातारा मतदारसंघातून ते निवडून आले. तेथे एकूण मतदार ४,९५,७६०, मतदान ३,२९,१३३ म्हणजे ६६ टक्के झाले. वैध मते ३,१८,६९५. यशवंतराव चव्हाणांना त्यापैकी २,४६,१६० म्हणजे ७७·२२ टक्के मते मिळाली. मतदारसंघातील एकूण मतांशी हे प्रमाण ४९·६८ टक्के आहे. आनंदराव चव्हाणांपेक्षा यशवंतराव चव्हाणांच्या मतदारसंघात अधिक टक्के मतदान होऊनही यशवंतरावांना एकूण मतदारांच्या ५० टक्के मतापेक्षा फक्त काही अंश मते कमी पडली, याचे कारण मते मिळविण्याच्या दृष्टीने आनंदरावांचे प्रतिस्पर्धी यशवंतरावांच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा दुबळे होते. आनंदरावांच्या नजीकच्या प्रतिस्पर्ध्यास फक्त ६·५२ टक्के मिळाली तर यशवंतरावांच्या प्रतिस्पर्ध्याला २१·७४ टक्के मते मिळाली. स्वाभाविकच यशवंतरावांच्या मतांचे प्रमाण त्यामुळे थोडे कमी झाले. अमरावती मतदारसंघात काँग्रेसचे श्री. के. जी. देशमुख यांनी १९७१ च्या निवडणुकीत एकूण मतदारांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळविली आहेत. त्यांच्या मतदारसंघात ५,३९,८९७ मतदार होते. मतदान ३,६०,४४२ म्हणजे सुमारे ६६ टक्के झाले, त्यापैकी वैध मते ३,४९,१९० होती. श्री. देशमुख यांना २,७१,८०२ म्हणजे ७७·६१ टक्के मते मिळाली. हे प्रमाण एकूण मतदारांच्या ५०·२८ टक्के आहे.

वर्धा मतदारसंघात काँग्रेसचे श्री. जगजीवनराव गणपतराव कदम यांनीही एकूण मतदारांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळविली. त्यांच्या मतदारसंघात ५,४९,४८० मतदार होते. मतदान ४,०८,०१४ म्हणजे ७४·२५ टक्के झाले. वैध मते ३,९६,९९७. श्री. कदम यांना त्यापैकी ७५·७३ टक्के मते मिळाली. एकूण मतदारांशी हे प्रमाण सुमारे ५४ टक्के आहे.

नेहरू व श्रीमती गांधींना एकूण मतदारांच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी मते मिळाली याचा अर्थ त्यांना लोकांचा पाठिंबा कमी होता असे नव्हे. सबंध देशाच्या निवडणूक प्रचार मोहिमेत गुंतल्याने स्वतःच्या मतदारसंघाकडे लक्ष द्यायला त्यांना वेळच झाला नाही. महाराष्ट्राच्या ४५ जागांत फक्त तिघांनाच एकूण मतदारांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळाली आहेत. एवढे मोठे यश मिळविण्यासाठी मतदान साधारणपणे ६५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक व्हावे लागते, असे वरील उदाहरणांवरून दिसते. १९६७ च्या लोकसभा निवडणुकात सरासरी मतदान ६१·३३ टक्के झाले होते. हे लक्षात घेता, थोडा अधिक प्रयत्न केल्यास ६५ टक्क्यांचे प्रमाण गाठणे अशक्य आहे असे नाही. येत्या निवडणुकात त्या दृष्टीने जास्तीत जास्त प्रयत्न झाल्यास खऱ्या अर्थाने प्रातिनिधिक लोकमत व्यक्त होईल आणि निवडणूक निकालांचे चित्र बरेच बदललेले दिसेल. काँग्रेस आपल्या बाजूने जास्तीत जास्त मतदान घडवून आणण्याचा प्रयत्न करतेच; त्यासाठी सत्तारूढ पक्षाजवळ पैसा आणि प्रचारसाधनेही भरपूर आहेत. विरोधी पक्ष त्यांच्याशी स्पर्धेत टिकूच शकत नाहीत. पण जनतेत सरकारविरुद्ध तीव्र असंतोष असेल तर सत्तारूढ पक्षाजवळ सत्ता आणि प्रचारसाधने कितीही विपुल असली तरी त्यांचा उपयोग होऊ शकत नाही. १९६७ च्या निवडणुकीत या असंतोषामुळेच काँग्रेसने आठ राज्यांत सत्ता गमावली. आठ राज्यात काँग्रेसचा पराभव करता येतो तर थोडया अधिक प्रयत्नाने केंद्रात तो का करता येऊ नये? वास्तविक १९६७ पेक्षाही आज जनतेत काँग्रेस राजवटीविरुद्ध अधिक असंतोष आहे. आणीबाणीत शेतमजुरांना जमिनी, बेकारांना घरे, कर्जमुक्ती यांसारख्या उपाययोजनांनी दलित व दुर्बल घटकांच्या परिस्थितीत सुधारणा झाली आहे. या वर्गाची मते आपण निश्चित मिळवू अशी काँग्रेस नेत्यांना खात्री वाटते. आणीबाणीतील उपाययोजनांनी या वर्गाची परिस्थिती काही प्रमाणात सुधारली हे खरे, पण त्यासाठी आणीबाणी पुकारून नागरी स्वातंत्र्याची आणि मूळ हक्कांची मुस्कटदाबी करण्याची, तसेच विरोधकांचा आवाज दडपून टाकण्याची काही आवश्यकता नव्हती. आणीबाणी न पुकारता नेहमीच्या परिस्थितीत परिणामकारक उपाय योजूनही हे साधता आले असते. आपली परिस्थिती, राहणीमान सुधारावे यासाठी सर्वांचीच धडपड चालू असते. पण त्यासाठी आणीबाणी कशाला? नागरी स्वातंत्र्याची आणि मूलभूत हक्कांची गळचेपी कशासाठी? नेहमीच्या परिस्थितीत परिणामकारक उपाय योजून सरकारला हे साधता येत नसेल तर त्याचा दोष सरकारच्या अकार्यक्षमतेकडे जातो. विरोधी पक्षांनी या उपाययोजनांना विरोध केलेला नाही. उलट काही विरोधी पक्षांनी काँग्रेसच्याही आधीपासून या कार्यक्रमाबद्दल आग्रह धरलेला आहे. हे सारे जनतेला समजून सांगितले पाहिजे. विरोधी पक्षांना अवधी थोडा, साधने अपुरी, संघटना बांधण्यालाही फुरसत नाही, अशा सर्व दृष्टींनी प्रतिकूल परिस्थितीत हा लोकशाहीचा लढा त्यांना लढावयाचा आहे. पण त्यांचा प्रामाणिकपणा, तळमळ, लोकांच्या हक्कासाठी झगडण्याची व वाटेल त्या हालअपेष्टा सोसण्याची जिद्द याबद्दल जनतेची खात्री पटली तर तिचा पाठिंबा त्यांना निश्चित मिळेल. तीव्र अन्याय झाला असेल तर मतपेटीतून जनतेचा आवाज व्यक्त झाल्याशिवाय राहत नाही. १९५७ साली संयुक्त महा-

राष्ट्राच्या प्रश्नावर कॉंग्रेसचा दणदणीत पराभव करून जनतेने हे दाखवून दिले. त्यानंतर १९६७ च्या निवडणुकीत आठ राज्यांत कॉंग्रेसचा झालेला पराभव म्हणजे मतपेटीच्या न्यायालयात कॉंग्रेसला मिळालेली शिक्षाच होती. आणीबाणीला विरोध आणि लोकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण हाच या निवडणुकीतील मुख्य प्रश्न आहे. लोकांना हे पटविण्यात विरोधी पक्षांना यश आले तर विजय निश्चित त्यांचा आहे. जास्तीत जास्त संख्येने मतदान घडवून आणणे ही त्यासाठी पहिली आवश्यक गोष्ट आहे.

### बाद मतांचे प्रमाण

मतदान जास्तीत जास्त हवे तसेच ते अचूक हवे. बाद मतांचे प्रमाण फार कमी हवे. मतदारांची जागरूकता याबाबतीत काही वाढली आहे का? १९६७ व १९७१ या लोकसभा निवडणुकातील बाद मतांचा तुलनात्मक विचार केला तर बाद मतांचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. १९६७ मध्ये ४·६८ टक्के मते बाद झाली होती. १९७१ मध्ये हे प्रमाण ३·२५ टक्क्यांपर्यंत खाली आले. बहुतेक सर्व राज्यांत बाद मतांचे प्रमाण कमी झाले आहे. केरळमध्ये ते ३·७८ वरून ०·९७ पर्यंत, बिहारमध्ये ४·५० वरून १·९१ पर्यंत महाराष्ट्रात ५·०७ वरून ३·३२ पर्यंत याप्रमाणे घटले आहे. पण एक विशेष म्हणजे पश्चिम बंगालमध्ये बाद मतांचे प्रमाण ३·८० वरून ४·३० पर्यंत, मध्य प्रदेशात ५·८९ वरून ६·०२ पर्यंत आणि काश्मीरमध्ये ३·३८ वरून ४·२९ पर्यंत वाढले. या तीन राज्यांत बाद मतांचे प्रमाण का वाढावे? मतदान वाढल्यामुळे बाद मतांचे प्रमाण वाढले असे म्हणावे तर तशी परिस्थिती फक्त काश्मीरमध्ये आहे. तेथे मतदान १९६७ मध्ये ५५·१६ टक्के होते, ते १९७१ मध्ये वाढले. पश्चिम बंगाल व मध्य प्रदेश या दोन्ही राज्यांत ते पाच टक्क्यांनी कमी झाले आहे. अचूक मतदान कसे करावे याचे शिक्षण नव्या मतदारांना विशेषतः ग्रामीण भागातील मतदारांना देण्याच्या बाबतीत दुर्लक्ष झाल्यामुळेच या तिन्ही राज्यांत बाद मतांचे प्रमाण वाढले. तेथील राजकीय कार्यकर्त्यांना ही गोष्ट भूषणावह नाही. प्रत्येक निवडणुकीत बाद मतांचे प्रमाण कमी कमीच व्हायला हवे.

बाद मतांचे प्रमाण राज्यांमध्ये नागालँडमध्ये आणि केंद्र प्रदेशात अंदमान–निकोबारमध्ये सर्वांत कमी आहे. नागालँडमध्ये १९६७ मध्ये निवडणूक नव्हती. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत तेथे १,४६०२५ मतदान झाले. त्यांपैकी शंभर मते बाद झाली. एक हजारामागे ६ मते बाद असे हे प्रमाण आहे. अंदमान–निकोबारमध्ये १९६७ च्या निवडणुकीत ३६,७३३ म्हणजे ७८·०५ टक्के मतदारांनी मत नोंदविले. त्यांपैकी एक मत बाद झाले. १९७१ च्या निवडणुकीत ४४,५३१ म्हणजे ७०·५४ टक्के मतदारांनी मते नोंदविली, त्यांपैकी फक्त ६ म्हणजे हजारामागे फक्त एक मत बाद झाले. मतदान बरोबर कसे करावे याचे शिक्षण मतदारांना दिले तर बाद मतांचे प्रमाण फार कमी करता येईल, हेच या दोन उदाहरणांवरून दिसून येते.

प्रत्येक निवडणुकीत काही मते बाद व्हावयाचीच, निवडणूक निकालावर काही त्याचा परिणाम होत नाही, मग त्याला एवढे महत्त्व कशासाठी द्यावयाचे? असा प्रश्न यासंबंधात उपस्थित केला जाईल. पण बाद मतांचा निकालावर काही परिणाम होत नाही ही समजूत चुकीची आहे. १९७१ च्या लोकसभा निवडणुकात बाद मतांचे प्रमाण ३·२५ टक्के होते. साधारणपणे पाच लाखांचा मतदार-संघ धरला तर या प्रमाणानुसार बाद मतांची संख्या १६,२५० होते. ही मते बरोबर पडली तर अटीतटीच्या निवडणुकीत निकाल फिरविण्याएवढी ही संख्या मोठी आहे. निवडणुकीत मतदारांचे मत व्यक्त व्हावे, या दृष्टीने तसेच निवडणूक जिंकण्याच्या दृष्टीनेही बाद मतांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

( पुढील अंकी चालू )

---

## सोलकढी : पान १० वरून

प्रक्रिया असते. एरवी जर्दाळूतल्या कवचीदार कोशातल्या बदामबीसारखे निपचित असलेले योग्याचे (पक्षी : माझे : अनंतरावांचे) मन, शवासनाच्या खटाटोपात, खवळून उठते आणि नको तेथे मर्कटू लागते. ही गोष्ट माझ्यासारख्या संयमी, स्थितप्रज्ञ माणसाला मोठी अपमानास्पद वाटते. मग मी एक तरकीब निकालतो. शरीरालाच भर्कवटतो (ते बेटे त्यासाठी टपलेलेच असते) आणि मन अलगदपणे शून्यशरीर झाले आहे, असे स्वतःला पटवून टाकतो.

असे माझे शरीर मला पूर्ण अवगत झाले असल्यामुळे कु. मेलडी स्कीक या मुलीबद्दल माझ्या मनात कौतुकाचा कल्लोळ उसळला आहे. अहो, ही मुलगी म्हणजे निव्वळ अचंबा आहे. एके दिवशी ही बया तब्बल पाच तास, आणखी वर त्रेचाळीस मिनिटे नुसती आपली बसून राहिली. नुसती म्हणजे अगदी नुसती : देवीसारखी किंवा बैठ्या शवासनातल्यासारखी. या काळात तिच्या मनाने काय आणि किती आणि कोठे आणि कशी भिर्‌भिरन्ती केली, हे नमूद केलेले नाही. मात्र तिच्या चोवीस वर्षांच्या शरीराने, सलगपणे जास्तीत जास्त वेळ अगदी निश्चल राहण्याचा जागतिक विक्रम केला, असे गिनेस–विश्वउच्चांककोशात नमूद झाले आहे. या वेळात हलले ते फक्त तिचे डोळे. पण त्याला गिनेसची हरकती नाही.

माझी पण नाही. आता या पाच तास त्रेचाळीस मिनिटांत, अवघ्या दोन डझन वर्षांच्या या पोरीचे डोळे असे आणि इतके हलले असतील की, तसे आणि तितके कधीच कोणाचे हलले नसतील, असे म्हणत जे खोल समाधान मिळवणे शक्य आहे, ते अनंतराव थोडेच सोडणार?

—अनंतराव

# साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

१२।२।७७ ते १८।२।७७

### काँग्रेस पक्षाला प्रतिकूलतेच्या झळा

आज आठवडा कुंभ लग्नावर सुरू होत आहे व लग्नातच रवी आरूढ झाला आहे. तरी पण चंद्र वृश्चिक राशीत असून, तो राहूने ग्रासला आहे. शिवाय रवी–शनीचा षडाष्टक तर मंगळ–शनीचा प्रतियोग असे विचित्र ग्रहमान आहे. मकर, कुंभ या राजकारणी–राजकारणाच्या कारक असून, वृश्चिक रास ही सत्तेची लालसा धरणारी रास आहे. रवी कुंभ राशीत आहे तो राजकीय वादळाला अत्यंत अनुकूल आहे, तो आपले कार्य केल्याशिवाय राहणार नाही. काँग्रेस व त्या पक्षाचे वरिष्ठ सत्ताधारी या राजकीय वादळात हेलकावल्याशिवाय राहणार नाहीत. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्यासारखे समर्थ नेतृत्व त्या पक्षाकडे असले तरी काँग्रेस पक्षातील व बाहेरचे राजकीय वादळ आटोक्यात ठेवणे त्यांना अशक्य होईल. गेल्या आठवड्यात बाबू जगजीवनराम 'हिरो' बनले आहेत. आणखीही एखादी उच्च पदस्थव्यक्ती हिरो बनू शकेल. निवडणुकांना रंग चढणार आहे. काँग्रेससह सर्व पक्षांनी आचारसंहिता पाळण्याच्या शपथा घेतल्या असल्या तरी त्या विसरल्या जाण्याची शक्यता आहे. आरोप–प्रत्यारोपांचा धुरळा–धुलवडीइतका नसला तरी–उडणार आहे. महाराष्ट्रात अंतर्गत असंतोष धुमसू लागेल व त्याचा कोठे कोठे धूरही निघेल.

---

### मेष : नोकरीत प्रमोशन

यावेळी तुम्हाला अनेक ग्रह अनुकूल आहेत. रवी–गुरू व मंगळ–गुरू योग उत्तम आहेत. म्हणूनच यावेळी जे प्रयत्न कराल ते सफल होतील. नोकरीत तुम्ही जास्त प्रयत्न करा. कारण तुमचा पिंड प्रामुख्याने नोकरीचाच आहे. राशिस्वामी दशमस्थानी आहे. त्यामुळे यावेळी तुमचे सारे प्रयत्न तुमचे मनोरथ पूर्ण करतील. प्रमोशन मिळेल. हवी तेथे बदली मिळेल. नको असलेले काम बदलले जाईल. धंद्याच्या नव्या तंत्राचा वापर करा. इंजिनीयरिंग व शेती हे उद्योग उत्तम चालतील. मंदी भासणार नाही. प्रवासास हा आठवडा सुखकारक आहे. तुमच्यापैकी एखादा भाग्यवान परदेशी जाण्याची शक्यता आहे. शुभ दिनांक १२-१४.

**महिलांना :** नोकरीत अधिकार मिळतील. पैसाही बरा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** सर्व अडचणी निवारण होतील.

### वृषभ : यशाची चाहूल

बारावा गुरू हीच काय ती तुमच्या बाबतीत उणीव आहे. पण या गुरूचा तुम्हाला फार प्रतिकूल परिणाम भोगावा लागणार नाही. पत्रकार, वार्ताहर, लेखक यांनी लेखनात कुणाची बदनामी होणार नाही, याची काळजी घ्यावी. बाकी सर्व बाबतीत शनीचा वरदहस्त असताना काहीच मुश्किल भासणार नाही. अर्थविषयक नव्या योजना सफल होतील. व्यापारात मोठा नफा होईल. शेअर्समध्ये पैसे गुंतवायला हरकत नाही. अचूक अंदाज हे यावेळेचे वैशिष्ट्य आहे नवा धंदा स्थिर होईल. मागील पैसा वसूल होईल. नोकरीत प्रमोशन–बढती मिळेल. अन्याय दूर होईल. प्रतिष्ठा वाढेल. लोकांत वजन निर्माण होईल. शुभ दिनांक १२–१३.

**महिलांना :** विवाहेच्छूंना थोडे थांबावे लागेल. नोकरीत अनुकूलता आहे.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत मोठे यश मिळेल.

### मिथून : सुधारणेला वेग

साडेसातीचा शेवटचा टप्पा चालू आहे. गुरू असेपर्यंत तुमची सारी महत्त्वाची कामे उरकून घ्या. पुढच्या पंधरवड्यात गुरू बदलणार आहे. यावेळी तुमच्या अनेक महत्त्वाकांक्षा सफल होतील. आशाआकांक्षा पालवतील. आगामी घटनांची चाहूलही लागेल. नोकरीधंद्यातील अंदाज अचूक ठरतील. वरिष्ठांच्या मर्जीमुळे अनेक बाबतीत तुमचे मत प्रभावी बनेल. ऑफिसात तुमचे वजन वाढेल. हाताखालची माणसेदेखील तुम्हाला सहकार्य देतील. तुमच्यापैकी ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. जे बेकारीत खितपत पडले आहेत, त्यांना नोकरी मिळेल. ही नोकरी तात्पुरती असेल. धंद्यात बरकत येईल. शुभ दिनांक १३–१५.

**महिलांना :** मन उत्तम राहील. शंका दूर होतील. श्रमाचे चीज होईल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत यश मिळेल. प्रयत्न करा.

### कर्क : आर्थिक स्वास्थ्य

तुमच्या राशीच्या चंद्रासमोरच रवी मंगळ आहेत. ते तुमचे सामर्थ्य वाढवीत आहेत. गुरू दशमस्थानी असून तो तुमच्यावर खूष आहे. यावेळी कोणतेही धाडस केले तरी फलदायी होईल, यशस्वी होईल. प्रत्येक क्षेत्रात नवे काही तरी घडेल. गुणांना वाव मिळेल. वरिष्ठांवर तुमचा प्रभाव पडेल. ते खूष राहतील. राजकारणात तुमची सरशी होईल. नोकरीत आजवर केलेल्या कामाची फळे यावेळी तुम्हाला चाखायला मिळतील, प्रमोशन मिळेल. धंद्यात लक्ष घाला. दुय्यम धंदा फलदायी होईल. हातून कार्यक्षम असे काही तरी घडेल. परदेशी प्रवासाची संधी मिळेल. व्यापार सुधारेल. अंदाज अचूक ठरतील. शेअर्समध्ये पैसे गुंतवा. रेस व लॉटरीत भाग घ्यावा. शुभ दिनांक १४–१६

**महिलांना :** नोकरीत बदल होऊ शकेल. काम आवडण्यासारखे मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षा उत्तम प्रकारे पार पडेल. बुद्धी तल्लख राहील.

### सिंह : राजकारणात सरशी

भाग्यस्थानी मेष ही मंगळाची म्हणजे सत्तेची रास आहे. याच मार्गाने तुमच्या हातून अनेक महत्वाची कामे या आठवड्यात होणार आहेत. राशीकाळी रवी कुंभेत जाईल. तो तुम्हाला वाईट नाही. तुम्ही जर निवडणुकीला उभे राहिला असाल तर तुमच्या बाजूने लोकांची मते प्रसन्न होणार आहेत. सर्वसाधारणपणे हा आठवडा बराच

अनुकूल आहे. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. वरिष्ठांची मर्जी राहून तुमची अनेक कामे होतील. तुमचे मनोरथ पूर्ण होईल. पगारवाढ–प्रमोशन असेही काही होऊ शकेल. बेकारांना आता अधिक काळ रांगेत उभे राहावे लागणार नाही. यावेळी तुम्ही केलेले प्रयत्न सफल होतील. धंद्याची प्रगती चालू राहील शुभ दिनांक १४–१७.

**महिलांना :** नोकरीत तुमचे मनोरथ पूर्ण होणार आहेत.

**विद्यार्थ्यांना :** संशोधनाच्या क्षेत्रात पदार्पण करा.

### कन्या : थोडेफार समाधान

तुम्ही नोकरीत मालकाचे हित पाहता व त्याची समृद्धी कशी होईल ते अधिक लक्षात घेता. पण कन्या राशीच्या गुणांची मालकाकडून तशी फारशी दखलच घेतली जात नाही. इतके वाईट प्रत्यंतर जरी यावेळी तुम्हाला आले नाही तरी तुमच्या सर्व इच्छा-आकांक्षा पुऱ्या होतील, असे मात्र नाही; नोकरीत थोडेफार समाधान मिळेल. मात्र वरिष्ठांबरोबर तुमचे संबंध चांगले राहतील. तुमच्या काही मागण्या ते सहानुभूतीने मान्य करतील. दुय्यम धंदा चांगला चालेल. प्रतिष्ठा वाढेल. लेखन–भाषण लोकांवर प्रभाव गाजवील. लोकप्रियता वाढेल. नवे काही तरी करण्याचे ठरले तर त्याला अनुकूल आहे. आर्थिक परिस्थिती समाधानकारक राहील. अपेक्षित लाभ देखील होऊ शकेल. शुभ दिनांक १५–१७.

**महिलांना :** तब्येतीची तक्रार फार होईल. पैसे हवे तेवढे मिळतील.

**विद्यार्थ्यांना :** तुमच्या बुद्धीचे कौतुक होईल.

### तूळ : सावधगिरी ठेवा

तुमच्या राशीला रवी एवढा अनुकूल नसतो, कारण रवी हा तूळ राशीत नीचेचा असतो. पण भाग्याची गोष्ट ही आहे की, हा रवी तुम्हाला यावेळी पाचवा होत आहे. तो तुमच्या कर्तृत्वाला व कर्तबगारीला संधी देणार आहे. उठाव आणणार आहे. तरी पण गुप्त शत्रू गुप्तपणेच तुमच्याविरुद्ध कारवाया करणार आहेत. यासाठी तुम्ही अत्यंत सावधपणे वागणे आवश्यक आहे. तुमच्या अवतीभोवती काय चालले आहे, काय काय घडत आहे, हे पाहा. नोकरीत तुम्हाला संधी व नवे काम मिळेल. त्यात तुम्हाला कर्तबगारी दाखवायला संधी मिळणार आहे. पण मिळालेल्या संधीचा तुम्ही लाभ कसा करून घेता व फायदा कसा करून घेता हे महत्त्वाचे आहे. ग्रह तुम्हाला अनुकूल आहेत. प्रवास, पगारवाढ असे काही तरी घडणार आहे. शुभ दिनांक १३–१५.

**महिलांना :** कलाक्षेत्रात प्रसिद्धी मिळेल. नोकरीत यश.

**विद्यार्थ्यांना :** आत्मविश्वास वाढेल. यश मिळेल.

### वृश्चिक : स्थावराचा प्रश्न सुटेल

राशिस्वामी मंगळ दुसरा आहे. त्याची तुमच्यावर कृपा आहेच. रवी आजच चौथा कुंभ राशीत गेला आहे. हे दोन्ही, ग्रह तुमच्याबाबतीत बरेच काही करू शकतात. प्रामुख्याने यावेळी शेती, बागायती यांसारखे तुमचे प्रश्न सुटणार आहेत. ज्यांना जागा नाही त्यांना ती मिळणार आहे ज्यांना शेतीची जमीन हवी असेल त्यांनी प्रयत्न करावा. वारसासंबंधीचे वाद यावेळी सुटतील. नोकरीत चांगल्या जागी बदली होण्याचा संभव आहे. तुम्हाला आवडत असलेले काम देखील मिळू शकेल. आर्थिक बाबतीत मोठे शेअर्सचे वायदे अगर मोठी गुंतवणूक सध्या तरी करू नका. बारावा हर्शल-राहू अचानकपणे केव्हा नुकसानीत पोचवील, हे सांगणे कठीण तब्येतीचा उत्साह जरा कमी होईल, पण आजाराची भीती नको. शुभ दिनांक १४–१६.

**महिलांना :** भांडणात रस घेऊ नका. आर्थिक बाजू सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** निवासस्थानाचा प्रश्न सुटेल.

### धनू : महत्त्व वाढेल

पहिला मंगळ व तिसरा रवी हे ग्रह तुम्हाला इतके अनुकूल आहेत की, यावेळी जी पावले उचलाल व जे निर्णय घ्याल ते आपल्याला उपकारक घटनांची नांदी ठरावी. तुम्ही तुमच्याभोवती गोड बोलणारी पण आतून कारवाया करणारी माणसे कोण हे ओळखा. वरवर ते तुमच्या बाजूने बोलत असले तरी ते बोलणे शुद्ध नाही, हे तुम्ही ओळखा व तसे तुमचे निर्णय घ्या. यावेळी ग्रह अनुकूल आहेत चालू नोकरीत प्रामुख्याने कामाचे चीज होईल. वरिष्ठांची मर्जी अधिक घट्ट होईल. बुद्धीचे, कर्तृत्वाचे फळ मिळेल. सार्वजनिक कामात प्रसिद्धी व लोकप्रियता मिळेल. तुमच्यापैकी जे कोणी निवडणुकीत भाग घेतील त्यांचा लोकात प्रभाव वाढणार आहे. त्यांचे पारडे निश्चितपणे विरोधकांपेक्षा जड होणार आहे. शुभ दिनांक १४–१७.

**महिलांना :** उत्साही वातावरण राहील. कुमारिकांचे विवाह ठरतील.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात आघाडी माराल. यश जवळ येईल.

### मकर : संघर्षातून जावे लागेल

मंगळ असामान्य कर्तृत्व देतो. अकल्पित धाडस घडवतो. पण तो मंगळ तुम्हाला बारावा आहे. रवी हा सामर्थ्य देतो. कर्तृत्व प्रकाशात आणतो. हा रवी आजच बदलला आहे. त्याचा तुमच्यावरचा प्रभाव कमी होणार आहे. इतर ग्रह कितीही अनुकूल असले तरी रवी-शनीचा षडाष्टक योग यावेळी होत आहे. हा योग जरी काटेकोर नसला तरी तो तुमच्या प्रगतीचा वेग मंदावणार आहे. तुमच्या अनेकांच्या जुन्या चुकांचे


## पांढऱ्या डागावर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**BHARAT AYURVEDASHRAM ( M ) P. O. KATRI SARAI ( GAYA )**

भांडवल करणार असून व ते वादळ जरी तुमचे नुकसान करणार नसले तरी ते तुमच्या प्रतिष्ठेवर परिणाम करणार आहे. माघारही घ्यावी लागेल. प्रत्यारोपांना तोंड द्यावे लागेल. नोकरीत पत राहणार नाही. नकोसे वाटेल. कर्ज काढावे लागेल. चैनीला यावेळी आळा घालणे श्रेयस्कर ठरेल. संयम राखणे हे यावेळी हिताचे ठरेल. शुभ दिनांक १५–१७.

**महिलांना** : तब्येतीची दुखणी कमी होतील. थोडा फार उत्साह वाढेल.

**विद्यार्थ्यांना** : संघर्षातून यश.

**कुंभ : यशाची वाटचाल**

रवी राशीत आला ही एकच गोष्ट तुमच्याबाबतीत यशाची खात्री द्यायला पुरेशी आहे. आगामी काही दिवसांत तुमच्याबाबतीत अशा काही अनुकूल घटना घडतील की, तुमची प्रतिष्ठा वाढेल, व्यक्तिमत्त्व उंचावेल. सर्व क्षेत्रांत तुमच्या नावाचा उदोउदो व दबदबा निर्माण होईल. धंद्यात तुमच्या युक्तीचा, कौशल्याचा उपयोग होऊन एक सल्लागार म्हणून तुमचे नाव होईल. हाती घ्याल ते चमकेल. संशोधनात लक्ष घातल्यास तेथेही तुमच्या हातून भरीव कामगिरी होईल. राजकारणात हातून यश हुकेल असे वाटत होते, ते पुन्हा हाती येईल. यशाची चढती कमान तुमच्या वाटचालाला येईल. नोकरीत तुम्ही बरीच मोठी मजल मारणार आहात वरिष्ठांच्या विश्वासास पात्र ठरून तुमच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात येईल. सेवानिवृत्तीच्या काठावर असणाऱ्यांना मुदतवाढ मिळेल. शुभ दिनांक १५–१६

**महिलांना** : स्वतंत्र धंदा करू शकाल. नोकरीच्या बाबतीत निरुत्साह निर्माण होईल.


**विद्यार्थ्यांना** : व्यक्तिमत्त्व चमकेल. यश हाती येईल.

**मीन : अडचणीतून मार्ग जाईल**

अकरावा मंगळ तुमच्या पदरात बरेच काही टाकील. तुम्ही रेस खेळण्यात एवढे उत्सुक असतानाही असल्या मार्गाने पैसा मिळवण्यावर तुमचा विश्वास नाही. तरी पण एकदा तरी भाग्याची परीक्षा घ्यायला हरकत नाही. तो काळ आता आला आहे. लेखक व पत्रकार म्हणून तुमची लेखणी गाजेल. सरकारदरबारी उच्चस्थान प्राप्त होईल. पण टीकाकार म्हणून मात्र तुमच्या पदरात निंदानालस्तीच येईल. म्हणून लेखणीचा वापर जपून करा. आध्यात्मिक क्षेत्रात रमलात तरी एकरूप होणे कठीण आहे. आर्थिक बाजू वाईट नाही, पण भक्कम राहणार नाही. अचानक प्रवास, अचानक खर्च असे काही तरी उद्भवेल. तुमच्यापैकी जे निवडणुकीच्या रिंगणात उतरले असतील, त्यांनी लोकमताच्या व सहकाऱ्यांच्या विश्वासावर अवलंबून राहून चालणार नाही. काय घडेल त्याकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे.

**महिलांना** : मन:स्थिती काहीशी अस्थिर-असमाधानी राहील, पण नुकसान नाही.

**विद्यार्थ्यांना** : अभ्यासाचे अतिशय परिश्रम करणे आवश्यक आहे. □




**चक्रमचक्री ... पान ६ वरून**

अशी अर्धवट कबुलीच 'केसरी'ने दिली आहे ! 'आम्हाला तिकीट मिळेल तर आम्ही राहतो, नाही तर चाललो,' असे म्हणणारा माणूस जर पक्षाचा अध्यक्ष होत असेल, तर तो पक्ष काय वकुबाचा आहे, हे स्पष्ट आहे. तेव्हा केसरीचा युक्तिवाद खुद्द काँग्रेसपक्षालाच कितपत रुचेल हे सांगवत नाही. बरे, तो युक्तिवाद अमान्य करावा तर पक्षातील कित्येक प्रमुखांना बीजभूत अपराधीपणाची टोचणी लागली आहे, असे म्हणावे लागेल. एकूण काँग्रेसची स्थिती केविलवाणी झाली, हे मात्र खरे !

या धक्क्यातून काँग्रेस कशी सावरणार ?

काँग्रेस कशी सावरणार हा मुद्दा महत्त्वाचा नाही. एखाद्या व्यक्तीच्या तालावर आणि लहरीवर पक्षाची मदार असली की, त्याच्यापुढे हे पेचप्रसंग येणारच. मुद्दा असा आहे की, साऱ्या देशापुढे असा पेचप्रसंग उभा राहता कामा नये. एखादा नेता असाधारण प्रतिभाशाली आहे, असा भरवसा बाळगून त्याचे सर्व हट्ट पुरविणाऱ्या राष्ट्राचे काय होते, हे जर्मनीवरून आपण पाहिले आहे. तो देश तर धुळीला मिळालाच, पण इतिहासातील ते पर्व अट्टाहासाने विसरण्याचा प्रयत्न तो देश अजून करीत आहे. एका महान समाजावर स्वखुशीने स्मृतिभ्रष्ट होण्याचा प्रसंग यावा, ही कल्पनाच किती शोकात्म आहे !

आपल्या देशावर असे दुर्दैव ओढवू नये, यासाठी काय केले पाहिजे ?

कोणाच्या लहरीमुळे म्हणा, किंवा गैरवाकबगार अंदाजामुळे म्हणा, राज्यकर्ते निवडून देण्याची आणखी एक संधी आपल्याला मिळत आहे. यावेळी आपण असेच लोक सत्तेवर पाठविले पाहिजेत की, पुढल्या निवडणुका त्यांच्या लहरीवर, मोहब्बतीखातर अगर गैरवाकबगार अंदाजामुळे न होता त्यांच्या लोकशाहीवरील निष्ठेमुळे, सदसद्विवेकाच्या अंमलामुळे होतील. ही माणसे कदाचित प्रतिभाशाली किंवा असाधारण कर्तृत्ववान नसतील, पण आपल्या अडचणी, प्रश्न मोकळेपणाने जनतेसमोर मांडतील आणि जनतेला विश्वासात घेऊन खुला कारभार चालवतील. □

'आपणास आपल्या राष्ट्राचा 'विराट' जागृत करण्याचे काम करावयाचे आहे. आपल्या प्राचीन संस्कृतीविषयी अभिमान धरून, वर्तमानकाळाचा नीट अभ्यास करून व भविष्यकाळात महत्त्वाकांक्षा धरून आपण या कार्यास लागावे. आपण भारतास कुठल्या तरी जुन्या जमान्याची प्रतिकृती बनवू नये. तसेच अमेरिकेची पडछायाही बनवू नये. विश्वाचे ज्ञान व आजपर्यंतची आपली परंपरा यांच्या आधारावर आपण असा भारत निर्माण करू की, जो आमच्या पूर्वजांच्या भारताहूनही अधिक गौरवशाली असेल.' **—पं. दीनदयाल उपाध्याय**

निवडणुका येतील, जातील. पण जनता पक्षरूपाने उभ्या राहिलेल्या नव्या शक्तीसमोरील कार्य हे आहे...

## ।। आपल्या राष्ट्राचा 'विराट' जागृत करणे ।।

या 'विराट' जागृतीची रूपरेषा स्पष्ट करणारा अंक

# माणूस

# जनविराट विशेषांक

या अंकातील काही लेखक :

☐ इंदुमती केळकर ☐ प्रा. राम बापट ☐ प्रा. राजेन्द्र व्होरा ☐ विनय हर्डीकर
☐ प्रकाश जावडेकर ☐ कुमार सप्तर्षी ☐ प्रा. ग. प्र. प्रधान ☐ पन्नालाल सुराणा
☐ दि. वि. गोखले ☐ सुभाष अवचट ☐ अशोक जैन आणि इतर नामवंत—नवीन.

## शिवाय

## निवडणुका आणि दिल्ली

'युक्रांद' कार्यकर्ते रत्नाकर महाजनकृत खास पुरवणी.

☐

किंमत पाच रुपये

प्रसिद्धी : ५ मार्च १९७७

☐

'मानवेन्द्रनाथ रॉय' विशेषांकानंतर निघणारा

पं. दीनदयाल – राममनोहर लोहिया – जयप्रकाश यांच्या विचारांचा, कार्यक्रमांचा, एकपक्षनिर्मितीच्या प्रयत्नांचा मागोवा घेणारा अंक....

# माणूस : जनविराट विशेषांक